संगीत मतिविकार नाटक.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए. एल्‌एल्. बी.

संगीत वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष

या नाटकांचे कर्ते यांनीं लिहिलें.

सन १९०७.

२ रुपये

किंमत [redacted].

मुंबई.

"श्रीवेङ्कटेश्वर" स्टीम् प्रेसमध्यें छापिले.

आभार.

प्रस्तुत नाटक लिहिण्याचे व सुधारण्याचे कामीं मला माझे कविमित्र **रा. रा. विठ्ठल सीताराम गुर्जर** यांचें अनेक दिशांनीं साह्य झालें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेंच **रा. रा. गोपाळ वामन बापट** यांनीं मला अनेक उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

दहा वर्षांपूर्वी स्वतंत्र नाटकें लिहिण्याचा संकल्प केला. त्यास अनुसरून मीं चार नाटकें लिहिलीं. एकाचा विषय विधुरविवाह, दुसऱ्याचा विधवाविवाह, तिसऱ्याचा विषय पुरुषांस पशुवृत्तीप्रत पोहोंचविणारें व्यसन व चवथ्याचा स्त्रियांस देवतापदाप्रत नेणारें शिक्षण हा होता. हीं नाटकें रंगभूमीवर येण्याचा संभव नसता, तर तीं मजकडून लिहिलीं गेलीं असतीं की नाहीं याची शंकाच आहे. पण **किर्लोस्कर** मंडळीनें व प्रमुखत्वेंकरून **रा. रा. नारायण दत्तात्रय जोगळेकर** व **रा. रा. शंकर बापूजी मुजूमदार** यांनीं त्यांचे प्रयोग करून मला प्रोत्साहन दिलें, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

गुणलेश वाढण्यास उत्तेजनाची जशी आवश्यकता असते, तशी दोषनिकर कमी होण्यास प्रतिकूल टीकांचीही असते. या आवश्यक वस्तूचा पुरवठाही माझ्या टीकाकारांकडून मुबलक झाला हें लिहिण्यास संतोष वाटतो. एका टीकाकारानें तर **वीरतनय** लिहिण्याचे वेळीं मला पूर्ण अज्ञात असलेल्या '**हेन्री एस्मंड**' नांवाच्या इंग्रजी कादंबरीची चोरी करून तें नाटक लिहिल्याचें माप अचुक माझ्या पदरांत घातलें ! विद्वान् व निर्भीड टीकाकारांनीं माझ्या पुस्तकांवर टीका केल्यास मला मराठी भाषेची दुप्पट सेवा केल्यासारखें वाटून आनंदच होणार आहे.

सरते शेवटीं माझी प्रस्तुत अल्पसेवा जे वाचक किंवा प्रेक्षक गोड करून घेतील त्यांचे आगाऊच उपकार मानून हा अल्प लेख संपवितों.

खामगांव.
जानुआरी १९०७.
श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

विनंति–या आवृत्तींत मुद्रणदोष बरेच राहिले आहेत, त्यांबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

संगीत

मतिविकार नाटक.

(ईशस्तुति.)

(दावरदादार०—या चालीवर)

नमित ईश पद्सरोज यदीय झणि निरसित पापपंक कुविघ्नतमासि हारि कृपेक्षणाप्रकाश ॥ ध्रु० ॥ कुंभयोनि-पति बघुनि जलनिधि । करुण होइ चित्तं । स्वीकारि जाह्नवीतें । हरिपद्सृत तारि शिरिं तिज धारि करि तदसुखविनाश ॥ १ ॥

(श्रीरामचंद्र कृपाल०—या चालीवर)

तो नीलकंठ दयाळु शुभकर हो तुम्हां भवसागरीं । भज कांसि मंगळ वितरुनी आशिवा स्वयें जो स्वीकरी॥ध्रु०॥ गजदानवा निवटोनि तद्वधदोष घेई निज शिरीं।शुभधाम गजमुख भवनकर भुवना सदा निर्मी करीं ॥१॥ मलिना विभूतिसि चर्चितो निज तनुसि सकळहि तो जरी। परि भूति दे प्रणतांमती बहु तुष्ट होउनि अंतरीं ॥ २ ॥ सुजनांसि जी आर्ति कंपदा भव ही जरी अभिधा धरी। भवमुक्त परि करुनी तयांतें भय सदा करितो दुरी॥ ३ ॥

अंक पहिला.

प्रवेश १ ला.

(मनोहर व चकोर.)

मनोहर—बाळा चकोरा, तुला भेटण्याला मी किती उत्कंठित झालों होतों म्हणून सांगूं! गलबत जसजसें किनाऱ्याजवळ येऊं लागलें तसतसा माझा आत्मा डोळयांत एकवटून माझ्या लाडक्याचें दर्शन घेण्याकरितां उत्सुक होऊन बसला! अनेक उतारू लोक आपापल्या इष्टमित्रांची भेट घेण्याकरितां गलबतावर उभे होते; ते दुरून पोळयावरील मधमाशां-प्रमाणें दिसत होते, परंतु त्या सर्वांतून तुझी मूर्ति माझ्या प्रेमानें नेमकी दाखविली. तेव्हांपासून मी तुजकडे सारखा पहात होतों. माझ्या नयनरज्जूनींच जणुं काय गलबताबरोबर तुला हळूहळू आकर्षून किनाऱ्याशीं आणिलें! माझे बाहू तुला आलिंगन देण्याला इतके उतावीळ झाले होते कीं मध्यंतरींचा वेळ त्यांना युगाप्रमाणें वाटला! व त्या अवकाशांत तुला प्रथम स्पर्श केल्याबद्दल ते डोळयांची जणुं काय स्पर्धा करीत होते! एकदां कडकडून आलिंगन दिल्यावर अतिसांनिध्य व आनंदाश्रु यांमुळें डोळयांना दिसेनासे झालेलें पाहून बाहूंना डोळयांवर विजय मिळून धन्यता वाटली! या क्षणीं तर तुझा देह नखशिखान्त पाहून डोळयांचें पारणें फेडूं कीं गाढालिंगन देऊन या शरीराला सुखवूं, असें मला झालें आहे! दोन्ही सुखांचा लाभ एकदम करून घेतां येत नाहीं हा केवळ नरदेहाचा कमीपणा आहे!

(तुने क्या किया मुजे०—या चालीवर)

मम हर्षभरें हें हृदय भरे न दिसे दुसरें तुजवीण खरें। नयनाश्रुजळें मुख हें भिजलें पुलकें खचिलें सगळें प्रचुरें ॥ ध्रु० ॥ सुखदुःख समान जगीं असती निकटीं वसवी नच भिन्नगति। हे श्वासहि दीर्घ जवें निघती हृदयांतुनि हा प्रेमौघ झरे ॥ १ ॥

चकोर-दादा, किनाऱ्यावर जमलेल्या मंडळींतून तुम्हांला अचुक शोधून काढल्यानंतर तुम्हांला भेटण्यापूर्वीची व नंतरची माझी जी स्थिति झाली, तिचें तुम्हीं इतकें हुबेहुब वर्णन केलें कीं मला त्यापेक्षां अधिक कांहींच सांगावयाचें नाहीं. आजपर्यंत तुमचें दर्शन काय तें पत्रद्वारा होत असे. तुमचें पत्र आलें कीं मी त्यास हृदयाशीं धरून प्रेमालिंगन देत असें. त्यानें मला तुमच्या भेटीपासून होणाऱ्या आनंदाचा अल्प अंश अनुभविण्यास सांपडे ! तुमच्या पत्रांनीं परस्पर सहवासांत घालविलेला आनंदाचा काळ व पुढें पुनर्दर्शन झाल्यावर होणारा आनंद हीं एकदम डोळ्यांसमोर उभीं राहून मन कावरें बावरें होई! आज तो पुनर्दर्शनाचा आनंद केवळ मनोराज्यांत न राहतां प्रत्यक्ष अनुभवाला आला, हें माझें केवढें भाग्य ! दादा,

(यमिमायामि जैसि०—या चालीवर)

जगिं परिमित आप्तवृंद ज्या । वदति दीन त्या ॥ ध्रु० ॥
केंद्रीकृत परी प्रेम । लाधे त्यातें निरुपम ॥ १ ॥ प्रेमोद्भव
सुखहि त्यास । इतरांहुनि अधिक खास ॥ २ ॥

मनोहर—चकोरा, दहा वर्षांपूर्वी बाबा आपणांस सोडून परलोकीं गेले तो प्रसंग आज माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला आहे. तूं तेव्हां बराच लहान होतास. त्यांनीं डोळयांत पाणी आणून तुला माझ्या हातीं दिलें आणि-

(नाहि मानी श्याम तेरो०—या चालीवर)

गहिवरें वदति वाणी । तव वदनाचें चुंबन घेउनि ॥ध्रु०॥
थोर वय निरखण्याचें याचें दैविं नसे या नयनीं ॥ १ ॥
जनक होइं शिशुपणिं या सुहृद तसा वर्तें तरुणपणीं ॥ २ ॥

तो सर्व प्रकार पाहून म्लान झालेलें तुझें मुखकमल आठवलें म्हणजे मला भडभडून येतें ! आज तुला विद्यासंपन्न झालेला पहाण्याला बाबा असते तर त्यांना किती आनंद झाला असता !

चकोर-तुम्हीं बाबांना जें अभिवचन दिलें तें त्यांच्याही अपेक्षेपलीकडे पाळल्यामुळेंच मी हे दिवस पहात आहें ! दादा, मी तुमचा उतराई कसा होऊं ?

(मेरे गिरिधर गोपाल०—या चालीवर)

प्रेमें मम शिशुपणांत संगोपन केलें । जननी जशि पोषि बाळ निज उदरीं ठेलें ॥ ध्रु० ॥ तिमिरांतुनि जशि माता त्यासि योग्यकालीं । मोहतमामधुनि तेविं मजसि सोड वीलें ॥ १ ॥

मनोहर—मीं जें कांहीं अल्पस्वल्प तुजकरितां केलें तें माझें कर्तव्यच होतें. परंतु कर्तव्याला प्रेमाचें बळ असल्यामुळें तें माझ्या मनाप्रमाणें पार पडत गेलें. बरें, आतां येथेंच किती वेळ उभें रहावयाचें? मीं मुद्दाम माझ्या एका मित्राची जागा जवळच तयार करून ठेविली आहे, तिकडे जाऊं.(दोघे चालल्यासारखें करितात. स्वतःशीं) आतां चकोराला ती दुःखवार्ता कशी सांगावी बरें ? दुसऱ्याकडून ती त्याला कळूं नये म्हणून मीं याच्या येण्याची बातमी कोणाला न कळवितां एकटाच आलों. बंदराजवळ मुद्दाम निराळीं जागाही याकरितां पाहून ठेविली पण ती बातमी फोडण्याची वेळ जवळ येऊं लागली तसें मला कांहींच सुचेनासें झालें आहे.

चकोर—(एकीकडे) मघांपासून दादा कष्टी कां दिसत आहेत ? त्यांनीं सांगितल्याप्रमाणें सुखदुःखांचीं लक्षणें कितीही सारखीं असलीं तरी दोहोंतील मर्यादा याप्रमाणें पूर्ण नाहींशी होऊन जाऊं नये. त्यांना कोणतेंही दुःख असो, तें हलकें करण्याचें माझें कर्तव्य आहे. (उघड) या आपल्या परतंत्र भूमातेचा स्पर्श जपानच्या स्वतंत्र भूमीपेक्षां मला किती तरी सुखकर वाटत आहे !

मनोहर—योग्यच आहे.

(साकी)

धनपतिवनिता दीन स्त्रीचा घे जरि बाल कडेला ।
परतायातें उत्सुक परि वो लक्षी मातृमुखाला ॥
जरिच्या शालुहुनी । वस्त्र जुनें प्रिय तन्नयनीं ॥ १ ॥

चकोर—दादा, आपला गतभर्तृकाश्रम येथून कांहीं फार लांब नाहीं. असें असतां या स्थलीं येण्याचें काय प्रयोजन आश्रम ठीक चालला आहे ना ?

मनोहर–या भयंकर तापाच्या सांथीमुळें आपल्या महाराष्ट्रांत असंख्य गतभर्तृका निर्माण होत आहेत ! असें असतां हा आश्रम शून्य कसा रहाणार ? हल्लीं त्यांतील स्त्रियांची संख्या शंभरावर गेली आहे.

चकोर–आपली मित्रमंडळी सर्व खुशाल आहे ना ?

मनोहर–(एकीकडे) आतां चंद्रिकेच्या लग्नाचें व वैधव्याचें वर्तमान याला कसें सांगावें? (उघड) चकोरा, या विपन्न व दुर्दैवी देशांत खुशाल, सुखी, या शब्दांना कांहीं तरी अर्थ आहे का ? लोक दिवसें दिवस दरिद्री व परतंत्र होत चालले आहेत. आणि दारिद्र्य व पारतंत्र्य यांबरोबर वास करणारे दुर्गुणही आमच्यामध्यें फैलावत चालले आहेत ! आम्हीं शरीरानें कृश व मनानें अनुदार होत चाललों आहोंत ! आम्ही श्रेष्ठांशीं लुब्रेपणानें व कनिष्ठांशीं उद्दामपणानें वागतों ! आम्ही घराबाहेर राजकीय हक्कांबद्दल निकरानें भांडतों, आणि घरांत आमच्याच बहिणींशीं अन्यायाचें वर्तन करितों ! आम्ही सुधारक असलों कीं परकीयांच्या निंद्य चालीही कवटाळतों, आणि जुन्याचे अभिमानी असलों कीं बालविवाहादि अनिष्ट चालींचाही अंगीकार करितों. भ्याडपणासच सारासार विचार आणि हेकेखोरपणास आम्हीं उच्च मनोवृत्ति म्हणतों ! अशा स्थितींत खरी खुशाली किंवा खरें सुख कोठून असणार ?

चकोर–आपले सर्व स्नेही शरीरानें तर खुशाल आहेत ना ?

मनोहर–नुस्ते खुशालच काय, वाढत्या प्रमाणावर आहेत. सहा महिन्यांपूर्वीं आपल्या आनंदरावांचे दोन हातांचे चार हात झाले, हें तुला माहित नसेल ?

चकोर–म्हणजे ! त्यांनीं पुनर्विवाह केला वाटतें ?

मनोहर–छे छे ! एका पंधरा वर्षांच्या कुमारिकेशीं लग्न केलें ! आणि तेंही स्वतःचें वय पन्नास वर्षांचें असतां ! मुलगा बरोबरीचा असून, व एक पंधरा वर्षांची मुलगी...(चाचरतो.)

चकोर–म्हणजे ? त्यांचीं सर्व मनुष्य क्षेम आहेत ना ?

मनोहर–चकोरा, चंद्रिकेवर जो प्रसंग गुदरला आहे, तो तुला कोणत्या तोंडानें सांगूं? परंतु अशा प्रसंगीं स्वदेशाच्या विपन्नावस्थेच्या विचारांत आपलें खाजगी दुःख बाजूला ठेविलें पाहिजे.

चकोर–दादा, खरा प्रकार काय असेल तो सांगून टाका. मला संशयामुळें प्रत्येक क्षणास यमयातना होत आहेत. त्यांपुढें अत्यंत दुःखकारक बातमीही पुरवली! ती ऐकण्याला मीं मनाचा धडा करून चुकलों आहें! काय म्हणतां? चंद्रिका भयंकर रोगानें अत्यवस्थ आहे का?

मनोहर–ती शरीरानें सुखरूप आहे.

चकोर–तर मग तिच्या मनास धक्का बसण्यासारखें दुःख तरी तिजवर कोणतें आलें आहे?

मनोहर–दुसरें कोणतें असणार? वैधव्य!

चकोर–वैधव्य? आणि तें लग्न होण्याच्या पूर्वींच?

मनोहर–तो सगळाच प्रकार चमत्कारिक आहे. ज्या मुलीशीं आनंदरावांनीं लग्न केलें तिच्याच एका म्हाताऱ्या नातेवाइकाशीं चंद्रिकेचा विवाह झाला. लोकांत तर अशी वदंता आहे कीं, आनंदरावांनीं आपली मुलगी म्हाताऱ्यानें आपणांस जी नववधू अर्पण केली तिचें मोल म्हणून दिली! त्या म्हाताऱ्या नवरदेवास मात्र चांगलीच शिक्षा झाली. वरांतींत उडविलेल्या नळे चंद्रज्योतींच्या धुरानें दम कोंडून त्या दमेकऱ्याची प्राणज्योति तेथल्या तेथेंच मालवून गेली. चकोरा, हें काय असें? हें वृत्त ऐकून तुझी अशी स्थिति कां झाली?

(भैवारी मैवारी०–या चालीवर.)

सुधीरा गभीरा तुझी वदनकांति। कशी लोपली निमिषमात्रें वदें ती॥ ध्रु०॥ मुख श्वासरोमांचबाष्पें गमे हें। हिमें आर्द्र कंपित गुलाब प्रभातीं॥ १॥

चकोर–दादा,

(ओदनदीं तनन०–या चालीवर)

त्यजुनि भीड वदतों पदसंनिधि। उघडुं हृदय मम हें तुम्हांविण इतर कवण जनिं। त्यजुनि शारदुदक हृद्गत निर्झर

करित खुलें कधिं ॥ ध्रु० ॥ हा प्रमाद घ्या पदरिं तुम्हि ।
अजाण बालक चुके कधीं भ्रमिं । घ्या करुणेमधिं॥ १ ॥

मनोहर—बोल बाळा, काय बोलायचें असेल तें.

चकोर—बाबांचा आणि आनंदरावांचा किती स्नेह होता हें तुम्हांला माहितच आहे. चंद्रिकेच्या जन्मकालीं तुम्हांला सून झाली आहे असें आनंदराव बाबांना म्हणाले हें मला ऐकून, पण तुम्हांला प्रत्यक्षच माहित आहे. आम्हीं वयानें वाढत चाललों, तसतसा आमचा परस्परांचा स्नेहभावही वृद्धिंगत होत चालला. पुढें मी परदेशीं जातेवेळीं मी तेथून परत येईपर्यंत चंद्रिका अविवाहित राहील असें आनंदरावांनीं मला बोलून दाखविलें. भावि स्वर्गसुखाच्या आशेनें मी जिवापलीकडे श्रम करून शेवटची परीक्षा उत्तीर्ण झालों व स्वदेशीं येऊन पोंहोंचतां तों माझ्या लहानपणच्या मैत्रिणीबद्दल ही दुःखवार्ता कानीं येते ! ज्या माझ्या भावि चरित्रनाटकाचें मंगलाचरण इतकें अमंगल झालें आहे त्याचें भरतवाक्य काय होणार हें दिसतेंच आहे ! अरेरे ! बिचारी चंद्रिका !

(संसारी अजि सुख वाटेना०—या चालीवर)

मायेचें नच कुणि जगिं उरलें । काय करावें बालेनें ॥
ध्रु०॥सोडुनि गेली जननी शिशुपणिं । उरला तात; परी
तो स्वमनीं । निर्दयता अत्यंत धरोनी । कापि गळा
खर करवालें ॥ १ ॥

म्हाताऱ्याशीं लग्न व वैधव्य या दोन्ही संकटांनीं तिच्या शिरावर एकदम आघात केला, तेव्हां त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्यानें काय करावें ? दादा, तिच्या शिरावर पडलेल्या या कोईजड संकटाचा भार लवमात्र कमी करण्याचा प्रयत्न तिच्या मायाळू—मायाळू कसले ? मायावी—नातलगांकडून झाला असेलच ?

मनोहर—दुःखांत सुख एवढेंच कीं अजून त्यांजकडून केशवपनाचा प्रयत्न झाला नाहीं !

चकोर—झाला नसेल तर लवकरच होईल ! ज्या नीचानें अशा सुंदर देहाची वैधव्याग्नींत आहुति देण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, तो तिच्या केंसांची पर्वा करील काय ? दादा, तिच्या निष्ठुर वडिलांनीं तिच्या सुखाची

माती केली हें ठीकच झालें. पण तुम्हीं येथें असून कसाबाच्या पोटीं आलेल्या या गाईचा गळा कसाहो नाहीं सोडविलात ? तुमच्या भूतदयेबद्दल सर्व जग तुमची वाखाणणी करीत आहे. ती भूतदया तुमच्या आवडत्या चकोराच्या वाग्दत्त वधूविषयीं मात्र उदासीन रहावींना ?

मनोहर–चकोरा, मी आश्रमासाठीं पैसा गोळा करण्याकरितां फिरत होतों तो तुला भेटण्याकरितां कालच परत आलों. माझ्या पश्चात् ज्या गोष्टी झाल्या त्यांचा मी प्रतीकार कसा करावयाचा बरें ?

चकोर–बरें. दादा, ही वातमी तुम्हांला पूर्वी कळली असून मला कां बरें तुम्ही कळविली नाहीं ?

मनोहर–चकोरा, याचें ज्ञान तुला आधीं झालें असतें तर तुझ्या ज्ञानाची सांगता तुला करितां आली असती का ?

चकोर–खरेंच ! तुमच्या प्रत्येक कृत्याच्या मुळाशीं मजवरचें प्रेम दिसून येतें. मीं तुमच्या प्रेमाकडे कोणत्याही बाजूनें पाहिलें तरी तें पूर्ण स्वरूपांतच आढळून येतें ! मीं मात्र आपस्वार्थीपणानें तुम्हांला असे प्रश्न केले याची क्षमा करा.

मनोहर–बरें, आतां पुढचा विचार?

चकोर–चंद्रिकेचा भाऊ आणि आपला मेव्हणा विहार हा तर पक्का जुन्याचा अभिमानी आहे. शिवाय तो बापापासून वेगळा झाला आहे असें तुम्हींच मला कळविलें होतें. तेव्हां त्याजकडून चंद्रिकेच्या विपन्न स्थितींत काय मदत होणार आहे हें दिसतेंच आहे. तिचे वडील नांवानें जरी कट्टे सुधारक आहेत तरी त्यांच्या आणि तिच्या विवाहावरून त्यांची कृति शब्दांप्रमाणें कितपत असते हें सिद्ध झालेंच आहे. आता चंद्रिकेला तुमच्यावांचून व मजवांचून कोणी स्नेही उरला नाहीं. तुमची परवानगी असेल तर मी तिला आजचे आज जाऊन भेटतों. पण माझ्या भेटीनें तिचें दुःख हलकें होईल किंवा दुणावेल याचीही शंकाच वाटते.

मनोहर–चकोरा, आनंदरावांच्या संमतीवांचून तिची भेट घेणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं. तेव्हां मीच आज आनंदरावांस भेटतों.

त्यांच्या मनाचा कल पाहून नंतर चंद्रिकेच्या भेटीबद्दल काय तें ठरवितां येईल. आतां प्रथम आपल्या आश्रमांत चल, तेथें भोजन करून विश्रांति घेतलीस म्हणजे तुला जरा हुशारी वाटेल, तुझें सामान तिकडेच परस्पर गेलें आहे.

चकोर—आतां कसचें भोजन! आपण सांगितलेली वार्ता ऐकल्यापासून माझे पंचप्राण कंठाशीं आले आहेत. ते अन्नोदक कंठाखालीं कसें उतरूं देणार? तरीपण तुमची आज्ञाच असेल तर न्याल तिकडे येतों आणि सांगाल तसें करितों.

(जातात.)

प्रवेश २ रा.

(**आनंदराव** व **सरस्वती.**)

आनंदराव—काय ही दागिन्यांची गर्दी! या सर्पाकार वेणीवर गुलाब, केतक इत्यादि फुलांनीं छाया केली आहे. बगीच्यांत फुलांवर सर्प बसले असतात. पण येथें सर्पावर फुलें येऊन बसलीं आहेत! तसाच हा बिंदीबिजवरा! खरें म्हटलें तर बिजवराच्या डोक्यावर त्याची स्त्री असावी. पण येथें पहावें तों स्त्रियेच्या भालीं बिजवराचा वास! नथ, बाळ्या, बुगड्या या मेघांनीं तर तुझ्या मुखचंद्राची प्रभा बरीच हरण केली आहे. तांदळीपोत, जोंधळीपोत यांनीं साहाजिकच कंठाच्या ठिकाणीं आपलें ठाणें बसविलें आहे. त्यांच्या जोडीला या टुशा, पेट्या व सरी चमकत आहेतच. कोपरांशींही वांकी व बाजूबंद झळकत आहेत. इतकें दागिन्यांचें ओझें बायकाच सोसूं जाणत! त्या आपल्या पतींना वांकवितात, आणि दागिने त्यांना वांकवितात.

(पेहरी चोळी०—या चालीवर)

असती वैरी। खचित पतीचे जन्मांतरिंचे। नग हे भारी।
पन्नगसम कीं असति विषारी। आलिंगनसमयीं दंशा।
घेउनि करिती त्यांचि दशा। नाशाया सुख अंबिका-

री ॥ ध्रु०॥ पति भूषण हें पत्नीचें। कंठालिंगनपात्र तिचें। साचें। परि शठ हे कठिन मनाचे । स्पर्शसुखा हरुनि विखापरि असुखा रचिति अरि ॥ १ ॥

सरस्वती—बायकांनाच एकट्यांना हसायला नको कांहीं !

(धीमां धीमा चालो०—या चालीवर)

नरां नारींसम हौस फार अंतरीं। प्रकट होई ती देहावरि परोपरी। नटति सजति नटांपरी । ते घरोघरीं ॥ध्रु०॥ बोटीं घालुनि मुद्रिका हातिं कडें जडसें । कर्णीं बाळी ठेविती गोफ गळां विलसे॥ (चाल) **नयनसे उपनेत्र सतेज जे। हृदयची घटीयंत्र जणूं दुजें शिर तशी तया शृंखलाही सजे। ती खरोखरी॥ १ ॥**

आपणही पूर्ववयात दागिन्यांचे मोठे भोक्ते होतां असें मी ऐकतें. कानांत भिगबाळी, हातांत सलकडीं व बोटांत अंगठ्या असल्यावांचून आपलें बाहेर पडणें होत नसे म्हणतात.

आनंदराव—पण हे दागिने बायकांनींही पटकाविले आहेतच ! त्यांच्या कानांत बाळी असते; आणि हातांत पाटल्यातोडे असून बोटांतही आंगठ्या असतात. शिवाय पाटल्यातोड्यांच्या पंक्तीला बांगड्यांची व बिलवरांची एक पलटण असते ती निराळीच ! बिलवरांचीं नांवें तरी किती विलक्षण ! एक म्हणे चटकचांदणी, तर दुसरी राणीचा बाहुटा ! तिसरी राजवर्खी, तर चौथी आतषबाजी ! याप्रमाणें स्त्रियांनीं सर्व चराचर जग हस्तगत करून घेतलें आहे.

सरस्वती—पुरुषांच्या दागिन्यांपैकीं चष्मा, घड्याळ आणि त्याचा शेवा हींसुद्धां बायका वापरीत असतीलच ?

आनंदराव—नाहीं वापरीत खऱ्या, पण हे दागिने कसचे ! घड्याळ दिवसांतील आणि चाळिशी आयुष्यांतील गतकाल दाखविते. बायकांच्या दागिन्यांचा व्यंगें लपविण्यांत जसा उपयोग होतो, तसा पुरुषांच्या या दागिन्यांचा होत नसून उलट व्यंगें उघडीं पाडण्यांत मात्र होतो !

सरस्वती—असें सगळ्या पुरुषांना खरोखरीच वाटत असतें, तर पुष्कळांना रस्त्यानें चष्मा वर करून किंवा सांखळीकडे पहात पहात चाल—

ण्यांत धन्यता वाटते ती वाटती का ? मग त्या सांखळीला एखादें जुनाळ असलें तरी चालतें !

आनंदराव–सदभिरुचीचा प्रश्न बाजूला ठेविला आणि अर्थशास्त्राच्या दृष्टीनें विचार केला तरीसुद्धां दागिन्यांचा सोस चांगला नव्हे. या दागिन्यांत पुरुषांचें चित्त जसें गुंतून जातें तसें देशांतील भांडवलही गुंतून रहातें. सोन्यानें मढविलेल्या प्रत्येक स्त्रीची किंमत एका लोखंडी कारखान्याच्या बरोबर असते ?

सरस्वती–तें मला नाहीं काहीं समजत !

आनंदराव–तसेच हे बिलवर. सारे बेटे परदेशी ! यांप्रमाणें आपल्या देशांतील पैसा परदेशांत जाऊं लागला. तर देश हां हां म्हणतां निर्धन होऊन जाईल.

सरस्वती–बिलवर परदेशी, आणि दारू ?

आनंदराव–(एकीकडे) हिनें तर माझे दांत माझ्याच घशांत घातले! पण हिला माहित नाही कीं कधीं कधीं दारू निवळ औषधाकारितां घ्यावी लागते.

सरस्वती–त्यांतून बिलवर परदेशांतूनच आणिले पाहिजेत असा कांहीं शास्त्रार्थ नाहीं. आपल्या देशांत केले म्हणजे झालें. आपली वस्तु आपल्या घरांत ठेवण्याची हिकमत आणि सामर्थ्य नसलें म्हणजे हें असेंच व्हावयाचें !

आनंदराव–बरें, तें राहूं दे. माझें म्हणणें इतकेंच कीं बायकांनीं दागिने घालू नयेत असें नाहीं. मात्र सणावाराला घालावे, इतर प्रसंगीं अगदीं साधेपणानें रहावें.

सरस्वती–आपणांला साधेपणा आवडत असेल तर आवडो बिचारा! मला तो साफ आवडत नाहीं.तरुणपणीं जर हे दागिने घालावयाचे नाहींत तर घालावयाचे केव्हां ? म्हातारपणीं शरीर आपोआपच वांकल्यावर त्याला आणखी वांकविण्याकरितां घालावयाचे कीं काय ? डोक्याला टक्कल पडल्यावर त्यावर केतक राखडी बिकटवाणीशी वाटतें ?

आनंदराव–बरें बोवा, मी आपलें बोलणें परत घेतों मग तर झालेंना ?

सरस्वती–आतां नुस्तें बोलणें परत घेण्यावर थोडेंच सुटावयाचें आहे !

आनंदराव–म्हणजे ? आणखी कांहीं तगादा लावायाचा आहे वाटतें ?

सरस्वती–कांहीं फार नाहीं. आणि मीतरी आपणांला उगीच त्रास कशाला देऊं ? मऊ पाहिलें कीं कोपरानें खणीत जाणें मला अगदीं आवडत नाहीं.

आनंदराव–तूं आहेसच तशी शहाणी ! सोडलास ना मग आपला हट्ट ?

सरस्वती–तसें नव्हे. हा माझा गळा अलीकडे चंद्रहारावांचून कसा अगदीं ओका ओका दिसतो. म्हणून म्हटलें–

आनंदराव–(एकीकडे) इच्या चंद्रहारानें माझ्या अंगाची कशी तलखी होऊं लागली आहे !

सरस्वती–म्हणून म्हटलें कीं तो सोनाराकडून एकदां लवकर घडवून आणावा. म्हणजे आपणांला पुन्हां तसदी द्यावी लागणार नाहीं. आपणांला त्रास देण्याचें माझ्या गडे अगदीं जिवावर येतें. पण जरूरीच्या गोष्टी केल्याच पाहिजेत ना ?

आनंदराव–ही गोष्ट जरूरीची कशी तें नाहीं मला समजत. चंद्रहार गळ्यांत नसला तर अन्न गळ्याखालीं उतरत नाहीं असें थोडेंच आहे ?

सरस्वती–उतरलें तरी अंगीं लागणार नाहीं हें खचित !

आनंदराव–तुला दागिन्यांचा मोठा सोस बुवा! असें खंडीभर दागिने कर कर करावे, आणि एक दिवस ते चोरानें आयतेच पळवावें म्हणजे सर्वच ग्रंथ आटपला !

सरस्वती–असेंच म्हणूं लागलें तर स्त्रीधर्म तरी बायकांनीं कां पाळावा? एखादे दिवशीं एखाद्या निर्लज्ज मनुष्यानें तो जुलमानें हरण केला म्हणजे आटपला सगळा कारभार !

आनंदराव-पुरे पुरे ! कबूल केलें तुझें मागणें !

सरस्वती-खरेंच, अगदी विसरलें ! चंद्रहाराच्या जोडीला तन्मणी नसला तर तो करून न करून सारखाच !

आनंदराव-तुझ्या मागण्या फारच वाढत चालल्या !

सरस्वती-हें पहा, मी हें सर्व मागतें तें कशाकरितां बरें ? आपणांलाच सुख व्हावें म्हणून ना ?

आनंदराव-पण मला त्यापासून मुळींच सुख होत नाहीं हें तर मीं तुला आधींच सांगितलें.

सरस्वती-मला नाहीं तें खरें वाटत. आपणांला शोभेपेक्षां साधपणाच आवडता तर आपण मुलाचें नांव विहार, सुनेचें तरंगिणी आणि मुलींचीं चंद्रिका, हंसिका अशीं नांवें कशाला ठेविलीं असतीं ?

आनंदराव-तीं नांवें मीं तरुण असतां बंगाली धर्तीवर ठेविलीं.

सरस्वती-मी तरी तरुणच आहे ना ? मग मला कां बरें शोभा आवडूं नये ?

आनंदराव-बरें, तुझें म्हणणें इतकेंच ना कीं तुला चंद्रहाराबरोबर तन्मणीही पाहिजे ? कबूल ! पण आतां तरुणपणा आणि वृद्धपणा यांबद्दल अ काढायाचा नाहीं, समजलीस ?

सरस्वती-मी कांहीं इकडच्या आज्ञेच्या बाहेर नाहीं. माझा यत्न नेहमीं आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचा असतो. हें आपण पहातच आहां. गेले चारपांच दिवस हा मेला स्वैंपाक पाठीमागें लागला नसता तर हे दिवससुद्धां आपल्या सेवेंतच गेलें असते. पण काय करूं ? जोंपर्यंत आचारी मिळणार नाहीं आणि चंद्रिकाबाईसाहेबांवर शास्त्राप्रमाणें संस्कार घडणार नाहीं तोंपर्यंत त्यांच्या हातचा स्वैंपाक देवब्राह्मणांना किंवा नैवेद्यवैश्वदेवाला थोडाच चालणार आहे ?

आनंदराव–तूं आपणांवरूनच पहा. तुला दागिन्यांची किती हौस आहे बरें ? चंद्रिका झाली तरी तुझ्यासारखी पोरच ! केशकलाप हा तिचा स्वाभाविक अलंकार ! तो आपण हिरावून घेऊं लागलों तर तिला कसें वाटेल बरें ?

सरस्वती–काय वाटायाचें आहे त्यांत ? ती कांहीं जगांत एकटीच अशा प्रकारची नाहीं.

आनंदराव–दुसऱ्याविषयीं विचार करावयाचा तो नेहमीं आपण त्याच्या स्थितींत आहोंत असें कल्पून केला पाहिजे.

सरस्वती–पुरे मेलें हें अभद्र भाषण ! बरें चंद्रिकेचें एक असो; पण स्वैंपाकी तरी मिळविण्याचा कांहीं प्रयत्न ?

आनंदराव–काय सांगूं तुला ? आपला मागचा आचारी सोडून गेल्यापासून मी सारखा त्याच खटपटींत आहें. आचारी तर नाहींच पण बाईसुद्धां मिळत नाहीं.

सरस्वती–बोललें तर इकडे राग येईल, पण या सुधारकांनीं पुनर्विवाहाचा प्रचार सुरू करून स्वैंपाकिणी अगदीं महाग करून टाकिल्या आहेत !

आनंदराव–आचारी तरी किती चढून गेले आहेत म्हणतेस ! आणि बेट्यांचा पोषाख तरी असा भपकेबाज असतो कीं त्याजकडे पहा. तच रहावें ! आपला नुकताच सुटलेला आचारी जेव्हां पहिल्यानें रहाण्याकरितां मजकडे आला, तेव्हां मी त्याची बूटपाटलोण पाहून त्यास सामोरा गेलों, आणि त्याला खुर्चीही दिली.

सरस्वती–मेला ढोंगीही कांहीं कमी नव्हता ! आपण त्याचा पगार ठरवितांना निषिद्ध पदार्थ तयार करशील कीं काय असें त्याला विचारलें होतें ना ?

आनंदराव–केव्हां ? मला माहितसुद्धां नाहीं.

सरस्वती–त्यानेंच मला सांगितलें पण तें सांगतांना तो असेंही म्हणाला कीं मी प्रथम कबूल नव्हतों, परंतु मला दहाचे पंधरा रुपये द्याल तर मी वाटेल तो पदार्थ तयार करून देत जाईन, आणि अठरा द्याल तरी खातसुद्धां जाईन.

आनंदराव–काय लुच्चा माणूस पहा !

सरस्वती–किती ढोंगी तरी !

आनंदराव–एखादा चांगलासा आचारी किंवा बाई पहाण्याबद्दल मीं हरिहरशास्त्र्यांना सांगितलें आहे. ते बहुतकरून एक दोन दिवसांतच आणतील, असें त्यांच्या भाषणावरून दिसलें. त्यांनाही कोणी नाहीं मिळालें तर माझ्या स्नेह्यांना लिहून व मोठ्या पगाराचें आमिष दाखवून मी ही तुझ्या मागची कटकट कायमची नाहींशी करून टाकितों. प्रिये ! तुझ्या जिवाकारितां मी वाटेल तें करण्याला तयार आहें.पण हें जें माझें तुजवरचें खऱ्या भावाचें प्रेम तसें तुझेंही मजवर आहेना ?

सरस्वती–माझेंही तसेंच आपणांवर असावें म्हणून मी आपणाकडून कितीतरी प्रयत्न कारितें.

आनंदराव–म्हणजे तुझें मजवर अजून चांगलेंसें प्रेम कांहीं नाहीं ? पण त्यांत मला कांहीं नवल वाटत नाहीं. प्रेमसुद्धां अभ्यासानें वाढविलें पाहिजे. मी तुला स्त्रीधर्मावर एक उत्तम पद्यात्मक निबंध वाचावयास दिला होता, तो तूं वाचला नाहींस वाटतें ?

सरस्वती–आपली आज्ञाच होती म्हणून मी त्याचीं एक दोन पानें लागलींच वाचून पाहिलीं पण पुराणांतल्या किंवा कादंबरींतल्या गोष्टींप्रमाणें तो मनोरंजक न वाटतां उलट मला झोंप येऊं लागली तेव्हांपासून मी रोज निजवयाच्यापूर्वी त्याचें एक पान वाचावयाचा परिपाठ ठेविला आहे, त्यामुळें माझी झोंपेची कुरकुरही नाहींशी झाली व आपल्याही आज्ञेप्रमाणें वागल्यासारखें झालें !

आनंदराव–निबंधापेक्षां गोष्टी आवडणें हें कांहीं [illegible] लक्षण नव्हे.

सरस्वती–आपणांप्रमाणें मलासुद्धां पुष्कळदां वाटतें कीं मी मुळींच आपल्याजोगी नाहीं. आपण जर स्वतःला शोभेशी प्रगल्भ वयाची व बुद्धीची गतभर्तृकाच बायको केली असती तर किती चांगले झालें असतें ?

आनंदराव–थांब, तुला या निबंधांतील एक उत्तम भाग, वाचून दाखवितों. (वाचतो.)

(अर्जुन तर संन्यासी०–या चालीवर)

स्त्रीचें दैवत पतिवीण नसे कोणि जगीं दुसरें । पतिव्रता स्त्री तदितर विषयां पूर्णपणें विसरे ॥ बघुनी दुःखि पति खिन्न वदन करि सुखि पाहुनि हंसरें । दुःख विभागुनि सौख्य दुणावुनि पतिचें भान हरे ॥ संसृतिवाहन या चक्रांविण भासतसे अपुरें । एक दुज्याहुनि उणें तरी रथ तिळहि पुढें न सरे ॥

ही चक्रांची उपमा पाहिलीस कां कशी समर्पक आहे ती ?

सरस्वती–म्हणजे दोन्ही चाकें सारखीं असलीं पाहिजेत असाचना याचा अर्थ ?

आनंदराव–तें पुढें स्पष्ट केलें आहे.

(चाल) हीं चक्रें असलीं पाहिजेत सारखीं । अंतरीं असावा स्नेह तयांच्या मुखीं । नातरि परस्परां होतिल तीं पारखीं । त्यांच्या कलहें रथ मोडुनियां पडे क्षणावसरें । निवडावी अनुरूप वधू निज ह्मणुनी चतुर नरें ॥ १ ॥

(सरस्वतीला झोंप लागलेली पाहून) अरे ! हिला तर गाढ झोंप लागली ! तर आपणालाही आपला रथ येथें थांबविला पाहिजे. प्रिये, ऊठ ऊठ !

सरस्वती–(जागी होऊन) काय चमत्कारिक तरी स्वप्न मला पडलं !

आनंदराव–काय पडलें ऐकूं दे.

सरस्वती–मी असें पाहिलें कीं,

(कैकयिनें जें वचन०–या चालीवर)

आपण दोघें रथांत बसुनी जात जणूं मार्गें । सुरम्य नाना वदत कथांसी परस्परांसंगें ॥ अशा समयिं शकटां-तुनि निघुनी एक चक्र वेगें । समीपिंच्या कवणा पुरुषा-वरि जाउनियां लागे ॥ त्या चतुरें तें दृढ धरुनि करीं आणियलें मागें । रथासि जोडुनि पुनरपि करि तो पूर्ण तया अंगें ॥

(**मनोहर** प्रवेश करितो.)

आनंदराव–बहुतकरून त्या निबंधांतील रथच तुझ्या स्वप्नांतील रथा-चा जनक असला पाहिजे. कोण? मनोहरपंत ? आंत या. असे बाहेर उभे कां ?(सरस्वतीस) हे आपल्या तरंगिणीचे आतेभाऊ व येथील गतभ-र्तृकाश्रमाचे उत्पादक मनोहरपंत. मनोहरपंत, हें माझें द्वितीय कुटुंब.

मनोहर–आपला नवीन संबंध आपणांस सुखकर होवो !

(देखोरी न माने श्याम०–या चालीवर)

दुजि ना मनीं आस । अपुलें असो प्रेम ऐसेंचि दृढपाश ॥ ध्रु० ॥ शुक्लेंदुवत् प्रीति । वाढावि, हो अंतिं । पूर्णेंदु-सम, कांति । पावो न कधिं नाश ॥ १ ॥

सरस्वती–(खालीं पहात) आजपर्यंत मी आपल्या औदार्याबद्दल फार कीर्ती ऐकत होतें, पण प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला नव्हता.

(दरसन कैसे पाऊं०–या चालीवर)

शुभ दिन अजि भासे मम मना । नयनयुग सुखजलमय तरि तृषितचि निरखुन ॥ध्रु०॥ सुकृतचि जननांतरींचें ।

सफल मम अजि गमत खचित बघुनि अवचित या ।
उदारचरित मूर्तिखि वचन मधुसम परिसुन ॥ १ ॥

आपणांसारखे पुरुष या भूमंडलास अलंकारच आहेत.

आनंदराव-(एकीकडे) महात्म्यांच्या अंगीं वशीकरणाची अजब शक्ति असते म्हणतात, तें खोटें नाहीं. यावरून माझ्या मनांत एक विचार येत आहे.

मनोहर-सरस्वतीबाई, माझ्यासारख्या ज्या पुरुषांच्या मागें फारसा व्याप नाहीं, त्यांनीं सत्कार्यीं आपली संपत्ति वेंचल्याची प्रौढी ती कोणती?

सरस्वती-परंतु एक कुटुंब निवर्तलें असतां ऐन तारुण्यांतही दुसरें कुटुंब न करण्याइतकें आत्मसंयमन असणें हींसुद्धां कांहीं हलकीसलकी गोष्ट नव्हे.

मनोहर-या आपल्या दुर्दैवी देशांत तरी विधुराला प्रेमाची तहान भागविण्याला विवाहाकडेच धांव घेतली पाहिजे असें नाहीं.

(दाताने राखि जरामग०-या चालीवर).

सुख नरा मिळत पद जरि विहरण्या मिळे हृदया ।
मग तो प्रियजन अगतिक जन असो महीवरी या ॥धृ०॥
स्वजन दैवें नुरविले । तरि हतबल गतधन जनिं
मिळत विपुल अवसर निज हार्दि दयेसि या समया ॥
मग तो० ॥ १ ॥

आनंदराव-मनोहरपंत, आज फार दिवसांनीं भेटलांत; तेव्हां आज येथेंच फराळ झाला पाहिजे.

सरस्वती-खरेंच, यांना फराळाला ठेवून घेतलेंच पाहिजे.

मनोहर-मी आपणा उभयतांच्या बाहेर थोडाच आहें !

आनंदराव-(सरस्वतीस) तर मग तुझी तयारी झाली म्हणजे आम्ही येतोंच. (सरस्वती जाते. एकीकडे) सरस्वतीच्या शिक्षणाची मी आजपर्यंत उपेक्षा केली त्यामुळें तिला अजून स्त्रीधर्माची चांगलीशी ओळख

पटली नाहीं. आतां तिला नवीन व जुन्या अशा दोन्ही प्रकारचें शिक्षण एकदम चालू केलें पाहिजे, म्हणजे ही उणीव भरून येईल. तें तिला कंटाळवाणें वाटणार नाहीं अशी खबरदारी घेतली म्हणजे झालें. तिला पुराण फार आवडतें, तें हरिहरशास्त्र्यांकडून सांगविण्याची तजवीज करितों. तसेंच मनोहरपंतांची अध्यापनाबद्दल फार ख्याति असून तिचीही भक्ति त्यांजवर असल्यामुळें नवीन शिक्षण देण्याच्या कामीं यांचा चांगला उपयोग होईल. (उघड) मनोहरपंत, तुमचें मला एका कामीं साह्य पाहिजे.

मनोहर—माझे बाबा आणि आपण यांमध्यें असलेला स्नेह सहज विसरण्यासारखा नाहीं. तेव्हां अकार्य नसल्यास मजकडून वाटेल तें काम करून घेण्याचा आपला अधिकारच आहे.

आनंदराव—छेः छेः ! अकार्य आणि मजकडून ? फार कशाला ! आतां उगीच पाल्हाळ न लावतां सांगूनच टाकतों एकदम, म्हणजे तुमची ताबडतोब खात्री होईल. माझें द्वितीय कुटुंब कीं नाहीं अलीकडे फार हट्टी होत चाललें आहे. आणि तिला स्त्रीधर्माचेंही अजून चांगलेंसें ज्ञान नाहीं. शिवाय तिच्या व माझ्या मतांत व रुचींत पदोपदीं अंतर दिसून येतें. मला साधेपणा आवडतो, तर तिला भपका आवडतो. मी सुधारक, तर ती दुर्धारक. मला गंभीर पुस्तकें आवडतात, तर तिला चटकदार कादंबऱ्या पसंत पडतात. असें एक कीं दोन, काय काय म्हणून सांगावें?

मनोहर—आतां आपणच ज्या अर्थी हा विषम काढिला आहे त्याअर्थी मीही आपणांस विचारतों, अशा विषम जोडप्यांत प्रेम उत्पन्न तरी कसें व्हावें? प्रेम असतें तेथें वैषम्य असलें तरी तें नाहींसें होतें; परंतु वैषम्य असलें म्हणजे आधीं असलेलें प्रेमही विलय पावूं लागतें ! आपणांकडून अकार्य कसें संभवेल असा आपण मला प्रश्न विचारला, मी म्हणतों याहून अकार्य तें काय असावयाचें आहे !

(येजि तुम बिन जियरा०—या चालीवर)

बिजवर जारि परिणी नव कन्या । उचित न करणी गमत मनुदिनीं निंद्य जना ॥ ध्रु० ॥ कलिका जीर्ण

पल्लवापाशीं । रम्य हर्म्य नव जीर्ण गृहाशीं । नव नवरी प्रौढवरासरशी। बघवेना ॥ १ ॥

माझा आपण या कामीं सल्ला घेतला असता तर फारसें बिघडलें नसतें.

आनंदराव–तुम्ही गेलां होतां वर्गणी गोळा करण्याला. आणि माझ्या लग्नाचा प्रकार कांहींसा प्रीतिविवाहासारखाच झाला. मीं तिला पाहिलें मात्र आणि माझ्या मनाचा धडा लागलींच तिच्याशीं विवाह करण्याचा झाला. प्रीतिविवाह हासुद्धां आपल्या इष्ट सुधारणांपैकींच आहे.

मनोहर–हा कसचा प्रीतिविवाह! तशा विवाहास दोन अंगें असतात. आपलें प्रेम वधूवर जडलें खरें, पण तिचें आपणावर होतें अशाबद्दल आपण कांहीं चौकशी केली का?

आनंदराव–तिचें प्रेम सहवासानें बसेल ही माझी खात्री होती.

मनोहर–अशा प्रकारें एका अर्भकाच्या इच्छेविरुद्ध तिच्याशीं लग्न लावून सहवासानें तिचें प्रेम संपादन करण्याची दुराशा बाळगण्यापेक्षां आपणच जर एखाद्या पोक्त गतभर्तृकेबरोबर विवाह केला असता तर? सहवासानें आपलें नसतें का प्रेम तिजवर बसलें? आपण आजपर्यंत सभांतून कितीं वेळांतरी पुनर्विवाहांवर व्याख्यानें दिलीं असतील. आणि तीं सगळीं एका क्षणांत विसरून गेलांत? आपल्यासारखीं माणसें जर असा अवसानघात करूं लागलीं तर भरंवसा धरावा तरी कोणाचा?

आनंदराव–पुनर्विवाह न करण्याला मला एक बलवत्तर कारण झालें.

मनोहर–तें कोणतें?

आनंदराव–आमची एक जवळची नातेवाईक वृद्ध बाई त्याच्याविरुद्ध होती; व याप्रमाणें सामाजिक व खाजगी कर्तव्यांत लढा पडून शेवटीं खाजगी कर्तव्याचा विजय झाला. माझें वर्तन कर्तव्याला सोडून नव्हतेंच.

मनोहर–कोणती बरें ती नातेवाईक?

आनंदराव–अहो, आमच्या गावसकाकाच्या मेव्हण्याच्या सावत्र आईचा मामा माहित आहे का तुम्हांला?

मनोहर–बरें मग?

आनंदराव–त्याच्या चुलत चुलत पुतण्याची सख्खी आजी. अगदीं सख्खी बरें ! हें मी शपथेवर सांगूं शकेन.

मनोहर–बरीच जवळची आहे म्हणावयाची !

आनंदराव–फार जवळची नाहीं हें खरें; पण तशी फार दूरचीही नाहीं.

मनोहर–इच्यापेक्षां पलीकडची म्हणजे आपले अगदीं अव्वलचे आर्य-बंधु इराणी वगैरे लोकांतच हुडकावयास पाहिजे. बरें, माझें साह्य आपणांला पाहिजे म्हणतां तें कोणत्या कामांत ?

आनंदराव–माझ्या कुटुंबाला स्त्रीधर्म शिकवून तिची जात्याच असलेली शुद्रवृत्ति दृढ करावयाची. ती वयानें तुमच्या सख्ख्या बहिणीसारखीच आहे. तेव्हां इतके कष्ट घेण्याला तुम्ही मागेंपुढें पहाणार नाहीं ही माझी खात्री आहे.

मनोहर–हें तर काय ! परंतु ज्या ज्या आर्यस्त्रियांना माझ्या साह्याची अपेक्षा आहे त्या सर्वांना मी माझ्या सख्ख्या बहिणीच समजतों. पण मला वाटतें माझ्या उपदेशापेक्षां आपल्याच उपदेशाचा तिच्यावर चांगला ग्रह होईल.

आनंदराव–तो तुमचा भ्रम आहे. माझाही तुमच्यासारखाच भ्रम होता. पण मघांशी मी तिला बोध करीत असतां त्या बोधाचा तिजवर पगडा बसावा तें राहून झोंपेचाच अंमल तिजवर बसला. तें पाहून माझ्या भ्रमाचा भोपळा पार फुटून गेला.

मनोहर–माझ्याही बोधाचा परिणाम तसाच होणार नाहीं कशावरून?

आनंदराव–तें मी सांगतों. माझ्या बोधाचा परिणाम पालथ्या घागरीवर पाणी याप्रमाणें कसा झाला हें मी तुम्हाला सांगितलेंच. त्यानंतर लागलींच तुम्हीं आलांत. आणि ताबडतोब सरस्वतीचें अंतःकरण प्रसन्न दिसूं लागलें. तुमच्यासारख्या उदारधींच्या चेहऱ्यांतच अशी कांहीं मोहिनी असते कीं प्राणिमात्र केवळ दर्शनानें गोगलगाय बनून जातो. मग माझ्या कुटुंबाचा काय पाड ?

मनोहर–माझा कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. आणि आपल्या स्तुतीला तर मी मुळींच पात्र नाहीं. परंतु कांहीं उपयोग होईल असें आपणांला वाटत असल्यास प्रयत्न करण्याला माझी तयारी आहे.

आनंदराव–त्या प्रयत्नाला हटकून यश येणार ! तुम्हांला सोपें जावें म्हणून मी हरिहरशास्त्री नांवाच्या इसमाचीही पुराण सांगण्याच्या-कामीं योजना केली आहे. या जोडगोळींतून एकीस तरी विजय मिळा-लाच पाहिजे.

मनोहर–मीसुद्धां आपणांला एका बाबतींत शब्द टाकणार आहें.

आनंदराव–बोला काय असेल तें. एखाद्या सभेंत पुनर्विवाहासा-रख्या आवडीच्या विषयावर भाषण करावयाचें असेल तर मी तुमच्या-करितां रात्रंदिवस खपून असें सुंदर भाषण तयार करितों कीं श्रोत्यांनीं गारीगार व्हावें.

मनोहर–(एकीकडे) वर्तणुकींतला थंडपणाच तसें करण्याला पुरेसा आहे ! (उघड) एका वराला छानदार वधू पाहून द्यावयाची आहे.

आनंदराव–कुमारी की गतभर्तृका ?

मनोहर–(एकीकडे) प्रथमच आपला हेतु न सांगतां यांचें मत काय आहे तें काढूं या. (उघड) असें घटकाभर समजा कीं गतभर्तृकेशीं विवाह करण्याचें त्याला धैर्य नाहीं.

आनंदराव–मग अशा भागूबाईला नवरा पहायचा सोडून नवरी कशाला पाहतां ?

मनोहर–(एकीकडे) माझ्या बेताला यांचा अडथळा येईलसा दिसत नाहीं. (उघड) आपल्या बोलण्यावरून आपणांला एकदम खरें सांगण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं.

आनंदराव–मुळींच नाहीं. मनोहरपंत, माझ्याशीं आणि इतका संकोच?

मनोहर–ऐका तर. आमचा चकोर, आजच जपानाहून परत आला!

आनंदराव–वाः ! मोठी आनंदाची गोष्ट ! त्याचें अभिनंदन करण्याला एक सभा जरूर भरविली पाहिजे.

मनोहर–सभेची कांहीं जरूर नाहीं. त्याचा बेत पुनर्विवाह करण्याचा झाला आहे.

आनंदराव–मोठी संतोषाची गोष्ट आहे ! मग उशीर कशाला उगीच ? आपण आहोंतच त्याला पाठिंबा देण्याला तयार.

मनोहर–त्याला योग्य वधू पाहिजे आहे.

आनंदराव–मग आपल्या आश्रमांत नाहीं का सांपडणार ?

मनोहर–पण त्याचें प्रेम एका मुलीवर बसून चुकलें आहे.

आनंदराव–लहान मुलाचें कसलें प्रेम घेऊन बसलांत ? आपणांला पसंत पडेल त्या मुलीशीं टाकावा उरकून विवाह !

मनोहर–पण चकोर कांहीं आतां तितका लहान नाहीं !

आनंदराव–बरें, कळूंद्या कोणत्या मुलीवर त्याचें प्रेम आहे तें ?

मनोहर–ती मुलगी आपणांलाही माहित आहे. तिचें एका म्हाताऱ्याशीं लग्न झालें होतें.

आनंदराव–कांहीं लक्ष्यांत येत नाहीं बुवा अजून ?

मनोहर–आपणच तिला चकोरोला देऊं केली होती.

आनंदराव–माझ्या शेजाऱ्यांपैकीं कोणाची मुलगी आहे का ती ?

मनोहर–अजून नाहीं लक्ष्यांत येत ? अहो, आपली चंद्रिका !

आनंदराव–हं, आतां आठवलें. जपानास जाण्यापूर्वी चकोराच्या डोक्यांत असें कांहीं वेड होतें खरें ! पण मला वाटलें होतें कीं हा वेळपर्यंत तो तें पार विसरून गेला असेल.

मनोहर–अलीकडच्या मुलांचीं मन अशीं विसराळ नसतात.

आनंदराव–तें सगळें खरें; पण चंद्रिकेचा मानस कुठें आहे पुन्हां लग्न करण्याचा ? आणि एकाच पक्षाचें मत घेऊन लग्न करण्याच्या मी अगदीं विरुद्ध आहें.

मनोहर–(एकीकडे) स्वतःची गोष्ट खेरीज करून !

आनंदराव–तिचा पति गत झाल्यापासून तिनें जी हाय घेतली ती अजून सोडली नाहीं.

मनोहर–काय म्हणतां ! तिचें त्या म्हाताऱ्यावर प्रेम होतें ?

आनंदराव–आमची चंद्रिका किती प्रेमळ मुलगी आहे याचा तुम्हांला अजून अनुभव नाहीं.शिवाय तिचा नवरा तरी कांहीं फार म्हातारा नव्हता. मजपेक्षां सारा पांचसहा वर्षांनीं वडील !

मनोहर–चंद्रिकेची भेट होईल तर आपण तिचें मन वळवूं अशी चकोराला उमेद आहे.

आनंदराव–आमच्या अर्धांगीचें मत या बेताला अनुकूल पडलें पाहिजे. तिनें आखडतें धरलें म्हणजे मी अर्धांगवायु झालेल्या रोग्याप्रमाणें अगतिक होऊन जातों. तरी पण मी त्या दोघांची गांठ पडावी अशी योजना करण्याचा प्रयत्न करण्याच्या मार्गाला लागण्याचें मनापासून वचन देतों, अगदीं अंतःकरणापासून !

भेकड–(प्रवेश करून) रावसाहेब पात्रें वाढून तयार आहेत. चला भोजनाला. (दोघे जातात. स्वतःशीं) रावसाहेबांनीं माझ्या स्वभावावरून माझें नांव भेकड ठेविलें आहे आणि स्वतः पाहिलें तर माझ्याहूनही ताण ! आम्हां दोघांमध्यें अंतर इतकेंच कीं ते एखादी गोष्ट उजेडांत करावयास भितात व मी अंधारांत जाण्याला भितों ! ते भितात जिवंत माणसांना आणि मी भितों भुतांना ! एखाद्या यक्षिणीनें कांडी फिरवून नोकराचा धनी आणि धन्याचा नोकर केला तर तें कोणाच्या लक्ष्यांत येणार नाहीं. आणि मग मी रावसाहेबांनांच माझ्या पायांवर पाणी घालायला लावीन. अरे, पण ते पहा रावसाहेब आणि पाहुणे कपडे काढून पाय धुण्याला चाललेच.तर त्यांच्या पायांवर पाणी घालायला गेलें पाहिजे. नाहींतर नोकरीवरच पाणी पडायचें. (जातो.)

प्रवेश ३ रा.

(हरिहरशास्त्री आणि वेणू)

हरिहर–हं, वेणूबाई, सांगा तुमचा निश्चय एकदांचा. माझ्या म्हणण्याला रुकार दिलांत तर जन्माच्या सुखी व्हाल आणि जर का नकार दिलांत तर मी तुमच्या नांवाचा बोभाटा केलाच म्हणून समजा! वैधव्य आल्यानंतर वर्षाच्या आंतच तुमचें वांकडें पाऊल कसें पडलें, नंतर तुम्हीं आपल्या पापाचा पोटउकला त्या सुइणीपाशीं कसा केलांत, आपला पोटचा गोळा दुसऱ्याच्या हातानें अनाथगृहांत सोडून द्यायला तुम्ही कशा तयार झालांत......

वेणू–नकाहो असें बोलूं! तो प्रसंग आठवला म्हणजे पोटांत कशी कालवाकालव होते! माझ्या बाळाचा मी शेवटचा मुका घेतला, आणि त्या अजाण अर्भकानें आपलें गोड आणि निष्कपट हास्यमुख मजकडे फिरविलें, तेव्हां मला त्रिभुवन आठवून रडतां भुई थोडी झाली. शास्त्रीबुवा, खरेंच काहो माझ्या बाळाचा त्या अनाथगृहांत अंत झाला?

हरिहर–मी कशाला खोटें सांगूं! तुमच्या आणि माझ्या पापाचा साक्षीदार या जगांतून नाहींसा झाला.

वेणू–मी चांडाळणीनें जर त्याला दृष्टीआड केला नसता तर माझ्या लाडक्यानें जगांतलि कांहीं तरी सुख पाहिलें असतें!

हरिहर–त्याला आपल्या मातुश्रीबद्दल फारच आदर वाटला असता!

वेणू–तुमची जीभ झडून जात नाहीं असें बोलतांना! मला पापाचरणाला कोणीं लाविलें? पुराणांतलीं वांगीं पुराणांत विसरून एका अनाथ स्त्रीच्या जन्माचें मातेरें कोणीं केलें? आपल्या हिडिस पापाचें फळ जें माझें गोड बाळ त्याची आणि माझी ताटातूट कोणीं केली?

हरिहर–मीं केली, मीं! पण आम्हां पुरुषांना काय भय आहे वाटेल तें करण्याचें? जर आमच्या अंगांत मर्दपणा आहे तर आम्हीं वाटेल त्या

स्त्रांस विघडवून टाकूं. स्त्रियांना मात्र तशी मोकळीक ठेविली नाहीं. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति !"

वेणू–म्हणजे पुरुषांनीं वाटेल तिच्याशीं स्वेच्छाचारानें वागावें, आणि तिनें जीभ उचलली कीं तिला बोलायचीही चोरी, असेंच कीं नाहीं ?

हरिहर–अस्सेंच ! अस्सेंच ! आटप लवकर. मला आतां जास्त बोलायला फुरसत नाहीं.

वेणू–फुरसत असेल कुठून ! धर्माच्या पांघरुणाखालीं दुसऱ्या अबलांचे गळे कापायचे आहेत कीं नाहीं ?

हरिहर–संधि सांपडल्यावर कोण तसें करीत नाहीं ? मोठे धर्मात्मे सुद्धां आधीं पोटोबा आणि मग विठोबा असें वर्तन करितात. चित्राहुतींपेक्षां प्राणाहुति नेहमीं मोठ्या असावयाच्याच ! पण हें फाल्तू बोलणें राहूं दे तूर्त एकीकडे. मी पांच अंक मोजतों, त्याच्या आंत जर तुझा रुकार आला तर बरी गोष्ट आहे; नाहींतर तुझें नांव चव्हाट्यावर आलेंच म्हणून समज ! सोडणार नाहीं ! हं. एक.

वेणू–कराल, तुम्हीं वाटेल तो मात्रागमनीपणा कराल.

हरिहर–दोन.

वेणु–अभक्ष्यभक्षणाबद्दल सुधारकांना वाळींत टाकून आपण त्यावर यथास्थित ताव माराल.

हरिहर–तीन.

वेणू–अपेयपानाबद्दल तिरस्कार दाखवून ओकारी येईपर्यंत त्याचें सेवन कराल.

हरिहर–चार.

वेणू–विधवांच्या मुंडनाचें मंडन करून सकेशा विधवेला कुमार्गाला लावाल.

हरिहर–पां–

वेणू–कबूल आहे मी तुमच्या म्हणण्याला.

हरिहर–लवकर ताळ्यावर आलांत म्हणून बरें झालें.

वेणू–मात्र हें सारें एका अटीवर हो!

हरिहर–पुन्हां कांहीं तरी विघ्न उपस्थित केलेंत वाटतें? हं, कोणती अट?

वेणू–कीं मीं त्या बाईची प्राप्ति तुम्हांला करून द्यावयाची आणि तुम्हीं मजवरचा हक्क सोडावयाचा.

हरिहर–या तुमच्या म्हणण्यापैकीं अर्धा भाग तर मी तावडतोब कबूल करितों.

वेणू– तो भाग म्हणजे त्या बाईच्या प्राप्तीबद्दल असेल? वाः! मोठे उदारच कीं नाहीं तुम्ही!

हरिहर–बरें बोवा! दुसराही भाग कबूल करितों. मग तर झालेंना? आतां तुम्हाला ज्या घरीं स्वैंपाकाला ठेवणार तेथली थोडीशी माहिती तुम्हांला असली पाहिजे. यजमानाचें नांव आनंदराव. त्याच्या तरुण बायकोचें नांव सरस्वती. नवराबायकोचें प्रेम यथातथाच आहे. त्या अर्थी बायकोचें प्रेम मजकडे वळेल असें करणें तुम्हाला फारसें जड जाणार नाहीं. एकदां ती हस्तगत झाली कीं मग तुम्ही वाटेल तिकडे जाण्याला मुखत्यार आहांत.

वेणू–ही अट पाळणें तुम्हांला मोठेसें कठिण जाणार नाहीं. कारण सुग्रास अन्न मिळाल्यावर शिळ्या भाकरीची काय पर्वा असणार?

हरिहर–सुग्रास अन्न तर खरेंच! जिचीं पंचेंद्रियें म्हणजे केवळ पंचपक्वान्नें अशी ती सुवर्णस्थालीप्रमाणें सुंदरी या पंचप्राणास गार करणार नाहीं तर मी खरोखर पंचत्वाप्रत जाईन.

वेणू–(एकीकडे) तसें होईल तर मी साखर वांटीन!

हरिहर–पण वेणूबाई, कसेंही झालें तरी तुमच्यावरचें माझें प्रेम कांहीं कमी नाहीं. चला, तिकडेच जाऊं. (जातात.)

प्रवेश ४ था.

(चंद्रिका, हंसिका, तारा, कमला आणि विमला.)

हंसिका—ताई, सहा महिने झाले तूं कोपऱ्यांत बसून सारखी रडत असतेस. आमच्यांत मिळत नाहींस, मिसळत नाहींस, मी हट्ट धरून तुला खेळांत बोलावूं लागलें म्हणजे तूं अधिकच रडतेस, हें काय बरें असें ?

चंद्रिका—बाळे हंसिके, तुझा खेळ एखादे दिवशीं आईनें एकदम मोडून टाकिला तर तुला नाहीं का रडें येत ?

हंसिका—पण तूं मुळीं खेळ खेळतच नाहींस, मग खेळ मोडणार कुठून?

चंद्रिका—हंसिके, माझ्या दुर्दैवानें माझ्या संसाराचा खेळ अवेळीं मोडून टाकला नाहीं का ?

(राग आला ना फार माधवा०—या चालीवर)

खेळ संसृतिचा मांडिला न तों । देव कोपें भंगोनि टाकितो । दुःखि बाळेच्या सौख्य मानितो ॥ ध्रु० ॥
मूर्ति धरिं जी प्रेमें हृदंतरीं । ईश वैषम्या तिज-विशीं धरी । करुनि दुर्लभ तिज मानें हाणितो ॥ १ ॥

हंसिका—तें कांहीं मला समजत नाहीं. पण तूं जर त्या म्हाताऱ्या-करितां इतकी रडत असशील तर तसें कांहीं करायला नको. मोठा मेला आला होता तुझ्याशीं लग्न लावायला तोऱ्यानें ! पण घिडका वरातींतूनही धडपणें पार पडली नाहीं !

तारा—मेल्याला पालखींतून मिरवायला पाहिजे होतें. पण ज्या पाल-खींत स्वारी बसायला गेली ती अखेरीस तिरडीच ठरली !

कमला—तसेंच नळेचंद्रज्योतींच्या प्रकाशांत आपली घिड काढण्याची त्या वांदराला भारी हौस होती. पण त्याच नळ्यांच्या बोळक्यांतला धूर त्याच्या तोंडाच्या बोळक्यांत शिरून स्वारीनें राम म्हटला ! इच्छामरणीच म्हणावयाचा !

विमला–वाईट वाटतें तें इतकेंच कीं मेला स्वत: जिवानिशीं गेला तो गेला आणि आमच्या चंद्रिकेला जन्मभर आपल्या नांवानें रडत बसविलें.

कमला–तारे, विमले, तुम्हांला आठवतें का ग आपण एक दिवस चकोराबरोबर खेळत असतांना त्याचें आणि चंद्रिकेचें लगिन लावलें होतें तें ?

तारा–कसें नाहीं आठवणार ? मी आणि विमलेनें भटांप्रमाणें मध्यें अंतरपाट धरून मंगळाष्टकें म्हटलीं होतीं.

विमला–हो ग हो ! मलाही आठवतें; मी म्हणतें, मग याप्रमाणें आपण एकदां लग्न लाविल्यावर त्या थेरड्याला आणि त्या भटुरग्यांनीं काय अधिकार होता चंद्रिकेचें पुन्हां लग्न करण्याचा ?

चंद्रिका–सख्यांनों, तुम्ही माझी कड घेत आहांत तें पाहून मला किती बरें वाटतें म्हणून सांगूं ! पण तुमच्या मंत्रांना भटांच्या मंत्रांची बरोबरी कशी होईल ?

हंसिका–कांहीं नाहीं ! त्यांचे मंत्रसुद्धां आपल्या मंत्रांप्रमाणेंच पोपटपंची असते, नाहीतर काय ?

कमला–इतकेंच नाहीं, तर आम्हीं शुद्ध भावानें लाविलेलें लग्न भटांनीं दक्षिणेच्या लोभानें केलेल्या लग्नापेक्षां हजारपट बरें ! आणि तें देवाच्या घरींही खास रुजू होईल.

(सत्य आहे गुरुची खुण०–या चालीवर)

लग्न अम्हीं लाविलें । गडे ग । तें खऱ्याहुनिहि चांगलें ॥ ध्रु० ॥ त्या अंतरपाटाहुनी । हा अंतरपट मैत्रिणि। शुद्ध विमल खचित आढळे ॥१॥ त्या नीरस मंत्राक्षता । त्यांहुनि अमुचे तत्त्वतां । मिथ्या करविक्षेप भले ॥ २ ॥

चंद्रिका–तुम्हांला माहित नाहीं तुम्ही या गोड शब्दांनीं माझें अंतःकरण कसें पोळीत आहांत तें.

हंसिका–ताई, तुला रुचत नसेल तर आम्हीसुद्धां गप रहातों हो ! आज तुला आमच्या खेळांत घेतल्यावांचून बरीक कांहीं सोडणार नाहीं.

चंद्रिका–तुम्हांला बरें वाटत असेल तर मीही तुमच्या म्हणण्याबाहेर नाहीं.

हंसिका–आतां कसें आमच्या जिवाला समाधान वाटतें ! बरें, आतां खेळ खेळायचा तरी कोणता ? छपापाणी कीं फुगडया ?

कमला–छे बाई ! हे दोन्ही धांगडधिंग्याचे खेळ काढलेस! चंद्रिकेच्या कैकई आईसाहेबांच्या कानांवर जर का इकडचा ब्र गेला तर त्या आकाश पाताळ एक करून सोडतील.

तारा–खरें पाहिलें तर त्या आपल्याच बरोबरीच्या! पण रावसाहेबांच्या अर्धांगी झाल्यापासून नाकावर माशी कशी ती टिकत नाहीं !

विमला–आणि दागिन्यांनीं कशी सजली असते पाहिलीतना ? गौरी-सारखी.

हंसिका–असें असून आमच्या ताईचे केंस बरीक तिच्या डोळ्यांत कसे खडयासारखे खुपतात,

चंद्रिका–पुरे झाल्या बाई आईवरच्या तुमच्या टीका ! ती वयानें बरोबरीची असली म्हणून काय झालें? मानानें तर वडील आहे ना! ठीकच आहे !

(ऐसा शंभु साजणी०—या चालीवर)

स्थानें एका वस्तुसि ये भिन्ना महती । नियम असा हा
अप्रतिहत दिसतो जगतीं ॥ घन-जल वर्षे हिमनगतालिं
पंकचि हो तें।परि तें शिखरीं होई हिम मनोज्ञकांति॥१॥
विजनीं विपिनीं सुंदरशीं कुसुमें फुलती । कालें सगळीं
कोमेजुनि विगलित होती।उपवनिं सुमनें लतिकावलि परि
जीं प्रसवे। सुरमूर्तींच्या शिरिं भक्तार्पित तीं वसती॥२॥

तारा–बरें बाई, तुझ्या आईचें गौरीप्रमाणें सजणें आणि तुझ्या अंगा-वर फुटका मणिही न ठेवणें, दोन्ही गोष्टी तिला शोभतातच !

कमला–हं, मग खेळ कोणता ठरला खेळायचा ?

हंसिका–तर मग गौर गौरच खेळूं या.

सर्वजणी–खरेंच गडे! कसा पण योग्य खेळ काढलास शोधून! तरी नांवाची हंसिका आहेस! (हंसतात.)

कमला–हंसिके, आण तुझी बाहुली तिला आपण गौर करूं.

(सर्वजणी गौर मांडतात.)

सरस्वती (प्रवेश करून एकीकडे)–बाई बाई! पोरींनीं घर अगदीं डोक्यावर घतलें! आमच्या ताईसाहेबांच्या डोक्यावर तर छप्पर आहेच! त्यांनां आणखीं निराळें घर डोक्यावर घ्यायला नकोच! बरें पाहूं तर खरें काय खेळ चालविले आहेत ते.

हंसिका–आतां बायांना कूंकूं कोण लाविणार? मीच लावितें नाहींतर. (इतर मुलींना लाविल्यावर चंद्रिकेस कूंकूं लावूं लागते.)

चंद्रिका–हंसिके, असें काय वेडयासारखें करावें बरें? ज्या गोष्टीचा मला अधिकार नाहीं तिच्याबद्दल हट्ट धरून काय लाभ होणार?

हंसिका–ताई, तूंच नाहीं का मघाशीं कबूल केलेंस मी तुमच्या खेळांत मिसळेन म्हणून?

चंद्रिका–म्हणून काय झालें? जें उघड उघड दिसण्यांत गैर तें मी कसें करूं? तूंच सांग, जें सौभाग्य माझ्या कपाळीं नाहीं त्याचें चिह्न कपाळावर मुद्दाम लाविल्यानें झालेली गोष्ट थोडीच चुकवितां येणार आहे?

तारा–आम्हीं सगळ्याजणींनीं मघांशीच तर ठरविलें कीं तुझें लग्न चकोराशीं बरिक लागलें, त्या म्हाताऱ्याशीं मुळींच लागलें नाहीं.

हंसिका–ताई, माझा हट्ट तूं नाहींस पुरविणार तर पुरविणार तरी कोण? मी तुला कुंकूं लावणारच, सोडणार म्हणून नाहीं. (चंद्रिका चुकविते, हंसिका कुंकूं लाविते. चंद्रिका पुसून टाकिते.)

सरस्वती–(पुढें होऊन) लाज वाटते का कांहीं असलें अमंगळ कृत्य करायला? (चंद्रिका हंसिकेशिवाय इतर मुलींस जाण्यास खुणावते. त्या जातात.) इतक्या साळकाया म्हाळकाया जमल्या होत्या, त्यांतून एकीनें

तरी असा भ्रष्टाचार करायला हरकत करायची होती ! पण सगळ्या मेल्या सुधारकांच्या मुली, आणि एका माळेंतल्या ! घ्या म्हणावें ही आपली सुधारणा ! आमच्या वेळीं कांहीं बाई ही तऱ्हा नव्हती !

हंसिका–(एकीकडे) आपण आजीबाईच कीं नाहीं !

सरस्वती–हंसिके, कायग पुटपुटते आहेस ? वडीलधाऱ्या माणसांचा मान चांगला ठेवतेस अं ! आणि जुनी रीतभातही चांगली पाळतेस ! पण मुस्कट इकडचें तिकडे फिरवून टाकिन टाऊक नाहीं अजून ?

चंद्रिका–आई, त्या बिचारीकडे काय दोष आहे ? सगळा दोष माझा आहे. मी पाहिजे तर तुझ्या पायां पडतें; नाक घासतें. (पायां पडते.)

सरस्वती–या आल्या आजीबाई कैवार घ्यायला !

(एकीकडून **आनंदराव** व दुसरीकडून **विहार** प्रवेश करितात.)

आनंदराव–काय, झालें काय येवढा गहजब करायला ?

सरस्वती–आपल्या शहाण्या ताईसाहेबांनाच विचारा काय झाले ते ? आतां कशी गप बसली आहे. करून सवरून वर संभावित ती संभावित ! कोणी म्हणेल किती मर्यादशील आहेहो ! .

विहार-चंद्रिके, काय झालें तें कळु दे तरी एकदांचें.

चंद्रिका–दादा, हंसिकेनें अजाणपणानें सहज माझ्या कपाळीं कुंकूं लाविलें, इतकेंच काय तें.

सरस्वती–जसे कांहीं विधवांनीं कुंकूं लावणें ह्मणजे कांहींच नाहीं ! कशी चुरुचुरु बोलत आहे पहा !

चंद्रिका–आई, मी गप बसलें तरी तुझा राग आहे, आणि बोललें तरी आहे. मी कसें वागूं तें सांग तरी !

सरस्वती–तूं येवढी शहाणी सुरती असून मी काय बाई तुला शिकविणार ! कसें वागावें याचा मासला नुकताच आम्हाला पहायला सांपडला ! विधवांनीं राजरोस ढालीयेवढें कुंकूं लावून मिरवावें !

विहार–(एकीकडे) आणि सवाष्ण बायांनीं दिसूं नये इतकें बारीक लावावें !

सरस्वती-सवाष्णपणचे सर्व सुखसोहळे पाहिजेत. आणि स्वैंपाक करायला मात्र आई !

आनंदराव-झालेल्या प्रकारांत शिष्टाचाराच्या उल्लंघनापेक्षां कांहीं फारसा मोठा गुन्हा होत नाहीं.

सरस्वती-हे आले विधवांचे कनवाळू ! हें पहा, आपण विधवेशीं लग्न लाविलें असतें म्हणजे आपणांला घरांत वाटेल तसें वागायला मोकळीक असती. पण देवानें मला आपल्या पदरीं बांधिलें आहे तेव्हां मी जिवत आहे तोंपर्यंत असा भ्रष्टाकार होऊं देणार नाहीं. कां ? मी म्हणतें ते पटतें आहे का कांहीं ?

आनंदराव-तूं म्हणतेस यांत बरेंच तथ्य आहे खरें.

चंद्रिका-बाबा, आईच्या पायांवर मीं कपाळ घासलें, तरी तिनें मला क्षमा केली नाहीं. हें खरें का ?

आनंदराव-खरेंच, क्षमा न करण्यासारखा कांहीं हा अपराध नाहीं.

सरस्वती-काय म्हणतां ? क्षमा न करण्यासारखा नाहीं ? आपलीच अशी फूस मिळाल्यावर तिनें तरी कां वाटेल तसें नाचूं नये ? आज कपाळीं कुंकूं लाविलें, उद्यां झगा घालील; परवां एखाद्याचा हात धरून जाईल. कां ? मी म्हणतें हें खरें आहे ना ?

आनंदराव-तसें होण्याचा संभव आहे खरा.

चंद्रिका-बाबा, तुमचाही मजवरचा विश्वास पार उडाला ना? अथवा कां उडणार नाहीं ?

(बलजोरि करत मै न जाऊं०—या चालीवर)

हतदैव जिचें फिरलें तिजवरि। कोण भरंवसा धरील लव-भरि ॥ ध्रु० ॥ अनुभव बालपणापासोनी । अनुकूलचि आला हृदया जरि ॥ १ ॥ असत्य वर्तन मिथ्या भाषण । स्वप्नींही कधिं नच घडलें तरि ॥ २ ॥

विहार-चंद्रिके, गतभर्तृकांच्या धर्मांचें तूं उल्लंघन केलेंस ही तुझ्याकडून मोठीच चूक झाली.

सरस्वती–मला वाटलेंच होतें तुमचें मत माझ्यासारखेंच पडणार म्हणून.

विहार–परंतु आईसाहेब, या अपराधाबद्दल आपण तिला जो वाग्दंड चालविला आहे तो मात्र फार जरब आहे यांत शंका नाहीं. अधेल्याच्या चोरीला कोणता सुज्ञ फांशीची शिक्षा देईल बरें ?

सरस्वती–अलीकडच्या पिढींतील पोरींप्रमाणें पोरांमध्येंही मर्यादा उरली नाहीं.

विहार–असें आपल्या भाषणावरून दिसतें खरें ! आईसाहेब, मी नात्यानें आपला मुलगा खरा पण आपणांपेक्षां मी दहापांच पावसाळे जास्त पाहिले आहेत, तेव्हां मी ह्मणतों याचा पोक्त विचार करा. आपण आणि बाबा जर चंद्रिकेला अशा रीतीनें वागवूं लागलांत तर तिला सुख कसें मिळावें ? आपणावांचून तिला आतां कोण आहे ?

सरस्वती–तुम्ही आहांतना बंधुराज मायेचे !

विहार–ठीक आहे. आपण सुचविल्याप्रमाणें मी तिला आपल्या घरीं घेऊन जातों. चंद्रिके, चल. ज्या घरांत आपला मान रहात नाहीं त्या घरीं रहाण्यांत काय प्रेम ?

हंसिका–दादा, मीही येतें तुझ्याबरोबर.

सरस्वती–जाऊं द्या तुमचीही धिंडका बाहेर एकदांची !

(विहार, चंद्रिका व हंसिका जातात.)

ऐकिलीतना आपल्या सुपुत्रांचीं कशीं मुक्ताफळें पडत होतीं तीं ? आजपर्यंत आपण फार मऊपणानें वागलांत त्याचा हा परिणाम बरें ! मी आपल्या घरांत नाकापेक्षां मोतीं जड कधीं होऊं नाहीं देणार. मग घरांतील सगळी मंडळी जाऊन मी एकटी उरलें तरी हरकत नाहीं.

आनंदराव–झाला हा प्रकार एकंदरीनें चांगलाच झाला. (एकीकडे) चंद्रिका गेल्यामुळें पुनर्विवाहाबद्दलचा मनोहरपंतांचा लकडा आपोआप मागचा चुकला. (उघड) आतां तुजवर कामाचें मात्र फार ओझें पडेल.

सरस्वती–मी तरी त्याच विवंचनेंत आहें.

(हरिहरशास्त्री व वेणूबाई येतात.)

हरिहर–रावसाहेब, ही पहा बाई आणिली आहे. स्वभावानें फार गोड आणि मनमिळाऊ, आणि कामाला खंबीर. आपण वाटेल तें काम सांगितलें तरी एका पायावर तयार; याचा मला स्वतः अनुभव आहे. पगार सारा जेऊन पांच रुपये.

सरस्वती–पण बाई यांच्या हातचा स्वैंपाक कसा चालणार ?

हरिहर–मला रावसाहेबांनीं तसें सुचविलें नाहीं. नाहींतर मीं तशीही व्यवस्था केली असती. पण अलीकडे सोंवळ्या बायाही मिळेनाशा झाल्या आहेत. बाकी अडीअडचणीच्या प्रसंगीं अशा बायांच्या हातचें सुद्धां खाण्याला शास्त्राचा निषेध नाहीं. हा आपद्धर्म आहे.

सरस्वती–(एकीकडे) मी तरी कामाला अगदीं कंटाळून गेलें आहें. (उघड) शास्त्रीबुवा, तुम्ही जर हें पाप आपल्या शिरावर घेत असलां तर मीही आता फारसें ओढून धरीत नाहीं.

हरिहर–बाईसाहेब, आपल्या जिवाकरितां हेंचसें काय पण याही–पलीकडचें पाप शिरावर घेण्याला हा देह तयार आहे.

आनंदराव–ठरलें तर ? (सरस्वती माननें 'होय' म्हणते) शास्त्रीबुवा, तुम्हीसुद्धां आजपासून आमच्या मंडळींना पुराण सांगायला येत जायचें बरें का ?

हरिहर–मी आपल्या बाहेर नाहीं.

(सर्व जातात.)

प्रवेश ५ वा.

(चकोर.)

चकोर–(स्वतःशीं) काय अंधेर आहे पहा ! एक थेरडा स्वतःला सुंदर व तरुण नवरी मिळवून दिल्याबद्दल आपली सुंदर व तरुण मुलगी बक्षिसा-दाखल दुसऱ्या थेरड्याला अर्पण करितो. या दोन्ही नीच कृत्यांना निरक्षर

भटांच्या अर्थशून्य मंत्रपठनानें विवाहाचें स्वरूप येतें. तो दुसरा थेरडा लग्नाच्याच दिवशीं आपल्या महापातकाचें प्रायश्चित्त भोगण्याकरितां यमलोकीं चालता होतो. त्याची मुग्ध व निष्कपट वधू कपाळाचें कुंकूं पुसून व अंगावरचे अलंकार काढून कोपऱ्यांत रडत बसते. आणि तिच्या डोळ्यांसमोर तिचा निर्लज्ज बाप आपल्या नवपरिणीत वधूशीं शृंगारचेष्टा करीत बसतो. यांतील प्रत्येक गोष्ट अंगावर कांटा उभा करण्यासारखी आहे. यांचा समुच्चय तर मनाला वेड लावण्याला समर्थ आहे. असें असतां याबद्दल कोठें सहानुभूति, चर्चा, सभा दिसून येते काय? उलट आपल्या आवडत्या देशाची मजकडून अल्प सेवा व्हावी म्हणून दादांनीं मला धंदेशिक्षण मिळविण्याकरितां जपानांत पाठविलें, आणि तें संपादन करून मी परत आलों, या अपराधाकरितां मजवर ग्रामण्य करण्याची कडेकोट तयारी चालली आहे! तिकडे जपानी लोक आपल्या अतुल पराक्रमानें, स्वदेशभक्तीनें आणि सुधारणेनें पाश्चात्यांस चकित करून पौर्वात्यांचे माथे उजळ करीत आहेत आणि इकडे आमचे समाजाग्रणी नेभळेपणानें, देशद्रोहानें व हजारों वर्षांपूर्वींच्या व तत्कालीन समाजास धरून लिहिलेल्या ग्रंथांस प्रमाण मानून व त्यांतील शब्दांवर बालिश कोटया करून परकीयांच्या तिरस्कारास पात्र होत आहेत, व आपल्या मुखांस काळिमा आणीत आहेत! तिकडे जपानी नरसिंह परकीय अस्वलांचीं नरडीं फोडीत आहेत, तर इकडे आमचे ग्रामसिंह आपसांत यादवी माजवून आपल्या देशहितेच्छूंवर ग्रामण्य करीत आहेत! आपल्या देशबंधूंशीं व भगिनींशीं अमानुषपणानें वागणारे हेच नरपशु परकीयांशीं हक्कांसाठीं भांडूं लागले ह्मणजे धर्माचे अवतार बनतात आणि अगदीं ताज्या राज्यविषयक ग्रंथांतील प्रमाणें आणि दाखले पुढें करितात! विहार हा याच वर्गापैकीं आहे. आणि हल्लीं चंद्रिका त्याच्या देखरेखीखालीं आहे. अशा अडचणींत तिची भेट कशी व्हावी? मी जपानांतून परत आलों हें कळल्यापासून तर विहारानें तिला सक्त नजरकैदेंत ठेविली आहे; आणि शास्त्री, पुराणिक, मठभिक्षुक, महंत, तापसी यांवांचून इतरांचें मुखावलोकन करण्याची तिला बंदी केली आहे. बरें, मी महंताच्याच वेषानें गेलों तर तिची भेट होणार नाहीं का? हो, हा एक मार्ग मोकळा आहे खराचला तर, त्याच्याच तयारीला लागूं.

(काना छांड बैयां०— या चालीवर)

नच दे दोष कोणी । सुज्ञ उचितपण चित्तीं प्रणयिं न आणी ॥ ध्रु० ॥ किति अजवारि बुध मानी, कुटिल वेष ललनार्जनिं, वरिति जनां अवगणुनी, लाज तरि न मी मानीं लव तदनुकरणिं ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक दुसरा.

प्रवेश १ ला.

(मनोहर व सरस्वती.)

मनोहर—(स्वतःशीं) आनंदरावांनीं सरस्वतीबाईस शिक्षण देण्याचें मजवर सोंपविलें खरें, पण हिच्या वृत्तीवरून हें काम दिवसेंदिवस मला अधिकाधिक बिकट वाटूं लागलें आहे. हिचा स्वभाव जात्याच विलासी असल्यामुळें माझ्या उपदेशाचा पुष्कळशा माझ्या अजमासाहून निराळाच परिणाम होतो.

सरस्वती—(एकीकडे) यांच्या सहवासांत मला अनुपम सुख वाटूं लागलें आहे. गुरुविषयीं इतकें प्रेम असल्यावांचून विद्या साध्य होत नाहीं म्हणतात तें खरें असलें पाहिजे. गेल्या चारपांच दिवसांत केवळ या प्रेमामुळें मला किती तरी गोष्टी कळूं लागल्या आहेत.

मनोहर—सरस्वतीबाई—

सरस्वती—मला आतां या हांकेला ओ देण्याची लाज वाटूं लागली आहे. मी आपली शिष्यीण ना ?

मनोहर—बरें तर, तसें कां होईना ! सरस्वति, आज आकाश निबिड मेघाच्छादित झाल्यामुळें काय शोभा दिसत आहे पाहिलीसना ?

(बलमा बहार आई०—या चालीवर)

जमले जलद पाहीं । निकषिं रेषा सुवर्णाची जैशी त्यां-वरि चपला ही ॥ ध्रु०॥ चंद्रकळा जरिकांठा तशि घन-माला चपला वाही ॥ १ ॥ चंद्रकलेसी लोपवि जणुं खल नाशी निजजन मोहीं ॥ २ ॥

ही पहा, कृष्णमेघरूपी राक्षसांची सेना विद्युद्रूपी राळेच्या प्रकाशांत आरोळ्या ठोकीत क्षितिजरूपी पड्याच्या बाहेर सपाट्यानें पडत आहे. या भूमं-डळरूपी कटाहास विद्युद्रूपी कथिलानें विश्वंभर कल्हईच देत आहे असें वाटतें. विजेच्या प्रकाशांत क्षणभर हें जग कल्हई दिल्याप्रमाणें दिसून डोळे दिपून जातात. हे मेघसुद्धां तिजपासून होणाऱ्या धुराप्रमाणेंच दिसत आहेत. भूमीवरील असंख्य वृक्षांनींही वाऱ्यानें प्रेरित होऊन आपल्या सहस्रकरांनीं थैमान माजविलें आहे, व सूंसूं असा शब्द चालविला आहे. हा पहा पर्जन्यही जोरानें आलाच !

(क्या कमा अबरूने०—या चालीवर)

मनुजीं या समयीं सारि अहंता लोपे । लघुता थोर चम-त्कारिं भरे ती कंपें ॥ ध्रु० ॥ हा झंझावात गमे श्वास असे ईशाचा । अवनि व्योमासह यद्गतिनें थरकांपे ॥ १ ॥ नास्तिक नर कितिहि असो चपलेपुढती रसना । विरमे क्षणिं त्यांची जल्पना घनालापें ॥ २ ॥

सरस्वती—मला या काळीं गंभीर विचार सुचण्याऐवजीं प्रेमाचे विचार मात्र सुचतात. कारण,

(सावरियाने जियरा लगाये०—या चालीवर)

पदार्थमात्र कारि या प्रेमोपदेश काळीं । परस्परीं प्रसक्ति घडवोनि विजयशाली ॥ ध्रु० ॥ भिववितसे ही चपला दिपवितसे नयनयुगा । झोंबतसे शीत वात पीडितसे बहु अंगा । गर्जत हे जलद परुष, प्रणयकलहवेगा । शम-वीति हीं अकाळीं ॥ १ ॥

निर्जीव सृष्टींतील निष्प्रेम वस्तु जों जों अस्ताव्यस्त स्वरूप धारण करूं लागतात तों तों सजीव सृष्टींतील प्रेमळ हृदयें परस्परांकडे अधिकाधिक आकर्षिलीं जातात.

मनोहर–तुझ्या आणि माझ्या कल्पनांत हें जें अतर दिसून येतें त्याचें कारण माझी विधुरावस्था आणि तुझी विवाहित स्थिति हेंच होय.

(नंनु ओवराधा०–या चालीवर)

बाह्यसृष्टि भासे। अंतरंग जैसें॥ विषय एक भावे। भिन्न चित्तदोषें॥ ध्रु०॥ चित्त मुकुर नोहे कीं ज्यामाजि विषय बिंबे। उलट विषय दर्पण मन हें कांत ज्यांत त्रासें॥ १॥

तुझे विचार प्रेमळ पत्नीला शोभण्यासारखेच आहेत.

सरस्वती–एकूण माझी सांसारिक स्थिति फार सुखाची आहे असाच आपला ग्रह आहेना?

मनोहर–तो तसा कां नसावा बरें? आनंदरावांसारखा उंच दर्जाचा व धनवान् पुरुष पति असल्यावर कोणाही स्त्रीस कुरकुर करण्याला जागा नसावी.

सरस्वती–आपण उंच दर्जाची व धनाची फारशी मातब्बरी समजत नाहीं ही माझी खात्री आहे. कारण त्यांची किंमत आपणांला वाटली असती तर आपण त्यांच्यावर लाथ मारून साधुवृत्ति स्वीकारलीच नसती.

मनोहर–जी माझी दृष्टि तीच स्त्रियांची असली पाहिजे असें तर नाहींना?

सरस्वती–पण आपल्या सहवासानें माझी अभिरुचि सामान्य स्त्रियांपेक्षां सुधारली असली तर त्यांत नवल नाहीं.

मनोहर-बरें, तुझ्या पतीचें तुजवर निःसीम प्रेम आहे हें तर तूं कबूल करशीलना?

सरस्वती-आहे खरें! तें इतकें आहे कीं मला त्याबद्दल कधीं कधीं फार वाईट वाटतें.

मनोहर-तें कां?

सरस्वती-कारण मी त्यांजवर आपणाकडून कितीही प्रेम केलं तरी त्यांच्या प्रेमाशीं तुलना करितां तें अपुरेंच पडणार. प्रेम ही अशी वस्तु नाहीं कीं ती कोणीं आपणाला अर्पण केली ह्मणजे उलट त्यासारखीच वस्तु ऋणमोचनादाखल त्याला देता येईल. कधीं कधीं दुसऱ्याचें आपणावर प्रेम नसतां आपलें त्याजवर वसतें आणि पुष्कळदां त्याच्या उलट प्रकार होतो. प्रेमाच्या बाजारांत जमेकडील व खर्चाकडील रकमा सारख्या आहेत अशीं खातीं फारच थोडीं सांपडतील. कोणत्या तरी बाजूला रकम घालून तोंडमिळवणी करावी लागते. स्त्रीपुरुषांच्या तोंडमिळवणीचा हाच प्रकार आपणास बहुतेक ठिकाणीं दिसून येईल,

(छंदाच्या चालीवर)

हें असे प्रणयधन इतर धनाहुनि मोठें। जग मूल्य दिलें तरि मिळे न कवण्या वाटे ॥ १ ॥ कुणि चोरियलें तरि खेद न धनिका वाटे। आनंद मानसीं उलट तयाच्या दाटे ॥ २ ॥ एकाहुनि अधिक न चोर तयाला भेटे। जरि भेटे तरी तें धन समजावें खोटें ॥ ३ ॥ जरि फेड न झाली तरी दुणावे नेटें। परि फेड झालिया मनीं उरे बहु कष्टें ॥ ४ ॥

मनोहर-सरस्वति, या अपूर्ण जगांत कुठें ना कुठें तरी व्यंग्य हें आढळायचेंच. ह्मणून मनुष्यानें थोडक्यांत संतोष मानून आत्मत्याग करण्याची संवय जडवून घेतली पाहिजे. या आत्मत्यागांत किती आनंद आहे याची तुला अजून चांगलीशी कल्पना नाहीं. ईश्वराच्या दयेनें

तूं लवकरच माता झालीस म्हणजे तुला आत्मयज्ञाचा ब्रह्मानंद अनुभवण्यास मिळेल. आम्हा पुरुषांना तो आनंद स्त्रियांइतका मिळत नाहीं हें एक आमचें दुर्भाग्य आहे. आपण कोणत्याही प्रकारचें प्रेम करायला शिकायचें तें मातृप्रेम कित्त्यादाखल समोर ठेवून शिकलें पाहिजे. अहाहा!

(गोपाल गिरधार०–या चालीवर)

माता करी प्रीति। निजबालकावरति। उपमान तिस जगतिं। कधिं नच मिळे सुदति ॥ ध्रु० ॥ सोशी श्रम अपार। करि परि सदुपकार। संसारिं निःसार। हरि असुख दे शांति ॥१॥ जणुं दुजें प्रभुनाम। मातृमनिचें प्रेम। पुरवी सकल काम। भुवना वितरि भूति ॥ २ ॥

सरस्वती–आपणांला यासंबंधानें एक प्रश्न विचारावासा वाटतो. मात्र तो विचारण्यांत थोडासा अतिप्रसंग होणार आहे.

मनोहर–विचार, खुशाल विचार.

सरस्वती–आपल्या गतपत्नीपासून आपणाला सुख कितपतसें झालें?

मनोहर–ती रूपानें फारशी सुंदर नव्हती; तसेंच मनाचा अनुदारपणा इत्यादि कांहीं मानसिक दुर्गुणही तिच्यांत होते. परंतु आमचें जोडपें एकंदरींत चांगलें सुखी होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतकेंच नाहीं तर तिच्या व्यंगांमुळें मला तिची कींव येऊन माझें तिजवरचें प्रेम द्विगुणित होत असे.

सरस्वती–आपलें जें जें ऐकावें तें तें अघटितच! बरें, आपण द्वितीय संबंध कां नाहीं केला? आपल्या जागीं दुसरा कोणी असता तर त्यानें रूपवान् व अनुरूप पत्नीबद्दलची आपली हौस दुसऱ्या लग्नांत तरी फेडून घेतली असती.

मनोहर–बरा प्रश्न विचारलास. मला माझ्या पत्नीबद्दल प्रेम आणि जी दया वाटत असे ती हळू हळू पसरत जाऊन शेवटीं प्रत्येक अनाथ

प्राण्याबद्दल त्या मनोवृत्ति उचंबळूं लागल्या ! पत्नीच्या मरणानंतर माझ्या प्रेमाला एक व्यक्ति पुरेनाशी होऊन माझें सर्व जगावर प्रेम जडलें. संसारापासून परमार्थाचा लाभ होतो असें ह्मणतात, त्याची ही पहिली पायरीच मी समजतों. माझी अशी प्रेममय वृत्ति झाल्या-मुळें कधीं कधीं लोक अगदीं जवळच्या आप्तांशींसुद्धां निष्ठुरतेनें वागतांना मी पहातों तेव्हां मला साश्चर्य विषाद वाटतो.

सरस्वती–(एकीकडे) माझें चंद्रिकेशीं जें वर्तन असतें त्यावर तर हा टोमणा नसेल ना ? (उघड) कधीं कधीं आपला अशा माणसाशीं प्रसंग पडतो कीं तें माणूस आपली गांठ पडल्याक्षणापासून आपला द्वेष करूं लागतें. असें झाल्यास त्यांत आपला काय दोष आहे ?

मनोहर–आपण प्रेम ठेवीत गेलें म्हणजे दुसऱ्याचा द्वेष किती वेळ टिकणार ? मात्र आपलें प्रेम अंतःकरणापासून असलें पाहिजे.

सरस्वती–तर मग आपण प्रेम केलें म्हणजे दुसऱ्याच्याही मनतां तोच भाव उत्पन्न होतो असें आपलें म्हणणें ?

मनोहर–यांत काय संशय ?

(शामरे मोरि बयां०–या चालीवर)

प्रेम हो परिं निजानुरागें । दृढानुरागें कदा न भंगे ॥ ध्रु० ॥ कोणि दिसेना विशाळ भुवनीं पुरुष न रंगे जो प्रेमसंगें ॥ १ ॥

मनुष्यांमध्यें असें असतें यांत नवल नाहीं. पण निर्जीव सृष्टींतही हाच प्रकार दिसून येतो.

दिंडि.

चंद्र दूरस्थहि पसरि निजकरांसी । दृढालिंगन सागरा द्यावयासी ॥ गहनवृत्ति तदा अमधुरांतरात्मा । वीचि-कर वरि करि दावि निज प्रेमा ॥ १ ॥

सरस्वती–(एकीकडे) अहाहा ! हें ऐकून माझ्या वृत्ति उचंबळूं लागल्या !

(मारा तनमा मनमा०—या चालीवर)

हें श्रवण करुनि वचन तरल हृदय भरुनि येई । गहन सौख्यजलधिंत मन सकल बुडुनि जाई ॥ ध्रु० ॥ प्राण येति उडुनि वरी शिकविति जणुं हे । कंठिं लग्न व्हावया प्रियाप्रति लवलाही ॥ १ ॥

(उघड) आपलें बोधामृत ऐकतानां मी तन्मय होऊन जातें. महाराज ! आपल्या उपदेशाप्रमाणें शब्दशः चालणें हें या जन्मीं तर अशक्यच दिसतें. पण त्याप्रमाणें वागण्याचा मजकडून अल्प प्रयत्न जरी झाला तरी मी स्वतःस धन्य समजेन.

मनोहर–ईश्वर तुला निश्चयाचें बल देवो ! सरस्वति, आतां आपलें सभाषण आपणांला आटपतें घेतलें पाहिजे. कारण या पहा ! पावसाच्या सरींवर सरी कोसळूं लागून त्यांच्या तारस्वरांत आपला आवाज एकमेकांस ऐकूंही येईनासा झाला आहे.

सरस्वती–प्रेमळ मनुष्यांस नुसत्या डोळ्यांनींहीं संभाषण करितां येतें. तरी पण आतां जेवणाचीही वेळ झाली तेव्हां आपला निरोप घेतला पाहिजे.

मनोहर–मलाही माझ्या आश्रमाची वाट धरिली पाहिजे.

सरस्वती–अशा पावसांत ?

मनोहर–अंगीं काटकपणा आणण्यास यासारखा चांगला मार्ग सांपडणार नाहीं.

(निघून जातो.)

सरस्वती–अहाहा ! खिडकींतून पावसाचे तुषार आंत येऊन अंग ओलें चिंब करीत आहेत.

(कोऊ मन भावन०—या चालीवर)

सुखविति किती शीत अनंत हे व्याकुल शरीरा तुषार ॥ शमविति सुबोधामृतबिंदु ते तप्त हृदयातें अपार ॥ १ ॥

(जाते.)

प्रवेश २ रा.

(मनोहर व तरंगिणी.)

तरंगिणी—तर काय चकोर येऊन इतके दिवस झाले ? आणि मला अजून भेटला नाहीं ?

मनोहर—तरंगिणि, तो येथें आला आहे हें विहारानें तरी तुला सांगितलें का ?

तरंगिणी—नाहीं खरें. पण कामाच्या गडबडीमुळें राहिलें असेल सांगायचें.

मनोहर—तूं आपल्या नवऱ्याची तरफदारी कर पाहिजे तर. पण न सांगण्याचें कारण निराळेंच आहे.

तरंगिणी—तें कोणतें ?

मनोहर—अग, चकोरावर हल्लीं ग्रामण्य करण्याचें कारस्थान चाललें आहे.

तरंगिणी—हें कांहीं बाई माझ्या गांवींही नव्हतें.

मनोहर—त्या ग्रामण्याचा पुढारी विहारच आहे. हें सगळें समजून उमजून चकोरानें या घरीं पाय टाकावा तरी कसा ? मला जरी विहारानें येथें येण्याची परवानगी ठेविली आहे तरी मीसुद्धां तो घरीं नाहीं हें पाहून चोरट्यासारखा आलों आहें.

तरंगिणी—दादा, तुला माहित नाहीं तिकडचा स्वभाव किती प्रेमळ आहे तो. आपल्या घरीं आलेल्यांचा आदरसत्कार असा त्यानींच करावा. तूं त्यांच्यादेखत जेव्हां येतोस तेव्हां तुझ्या बहुमानांत कांहीं अंतर तुला दिसून येतें का? आतां येवढें खरें कीं मतांत फेर असल्यामुळें दोघांचीं अंतःकरणें मात्र एकमेकांविषयीं असावीं तशीं शुद्ध नाहींत.

मनोहर—मतभेदाची मजल कोठवर न्यायची याचा कांहीं विचार? मला त्यानें आपलें घर यायला जायला मोकळें ठेविलें आहे, तसा माझा आश्रम तुला मोकळा ठेविला आहे का? त्या बिचाऱ्या विधवांनीं असें काय पाप केलें आहे? मनुष्याचा प्रथम प्रथम एखाद्या गोष्टीविषयीं दुराग्रह असतो. पण ती समक्ष पाहिल्यावर तो नाहींसा जरी झाला नाहीं तरी त्याची तीव्रता कमी होते.

तरंगिणी—मी किती वेळां तरी त्यांच्या मागें लागलें असेन तुझा आश्रम दाखविण्याकरितां. पण त्यांनीं दर खेपेस कोणतीना कोणती तरी अडचण पुढें करावी. पहिल्यानें तर त्यांना विधवांनीं केंस ठेविलेलेही खपत नसत. पण आमच्या बिचाऱ्या वन्संचें हें असें झाल्यापासून त्या गोष्टीपुरतें बरीक त्यांनीं अलीकडे आपलें म्हणणें माघारी घेतलें आहे.

मनोहर—स्वतःवर प्रसंग आला म्हणजे अभिमान आणि दुराग्रह गळून जातात.

तरंगिणी—हल्लीं त्या मेल्या हरिहरशास्त्र्याचा जरी त्यांच्यामागें याबद्दल गेल्या पंधरा दिवसांपासून लकडा आहे. तरी त्यांचा निश्चय अणुभरही ढळला नाहीं.

मनोहर—हा हरिहरशास्त्री कोण? अलीकडे दुसऱ्यानें त्याचें नांव ऐकिलें.

तरंगिणी—आहे असाच एक नामधारी शास्त्री! मोठा पाताळयंत्री आणि सुतानें स्वर्गाला जाणारा दिसतो.

मनोहर–अशीं माणसें एखाद्या दिवशीं एखाद्या लचांडांत सांपडून खरोखरच सुतानें स्वर्गाला जातात. या शाळ्याचें आनंदरावांच्या घरीं जाणें येणें आहे का ?

तरंगिणी–आहे, पण अजून फारसा घरोबा नाहीं.

मनोहर–त्याला अलीकडे त्यांनीं घरांत पुराण सांगण्याकरितां ठेविलें आहे.

तरंगिणी–अगबाई ! ही घराला घूसच लागली म्हणावयाची ! काल मी त्याच्याबद्दल कांहीं भलत्याच गोष्टी ऐकिल्या.

मनोहर–तूं स्वस्थ ऐस. मी त्याला काढण्याची आजच व्यवस्था करितों.

तरंगिणी–आमच्याही घरून त्याची उचलबांगडी केली पाहिजे. पण तिकडचा स्वभाव किती भोळा आहे हें तुला ठाऊकच आहे. त्यांनां चांगला प्रत्यय आल्यावांचून ते त्याला दूर करणार नाहींत. अगबाई ! येणें झालें वाटतें घरीं ! बरोबर तो शास्त्रीही आहे.

मनोहर–मग मी सुद्धां तुझा निरोप घेतों.

(जातात.)

प्रवेश २ रा.

(विहार व हरिहरशास्त्री.)

हरिहर–दादासाहेब, आपल्यासारखे धर्मात्मे आज आमच्यांत आहेत म्हणून कांहीं तरी निभाव लागतो आहे. आजच्या पुनर्विवाहाच्या सभेंत जर आपण धर्माची कड घेऊन बोललां नसतां तर त्याची कांहीं धडगत नव्हती. काय तो आपला धर्माभिमान व आवेश !

विहार–(हंसून) मला लहानपणापासून जरा धर्मवेड आहे खरें.

हरिहर—अहो, याला वेड कोण म्हणेल ? हें जर वेड तर मग शहाण-पणा कोणता ? आपल्या अंगीं लीनपणा फार दुसरें काय ? तसेंच आपलें वक्तृत्व पाहून तर मी आज थक्कच होऊन गेलों. बोलण्यांत निर्भीडपणा तरी किती !

विहार—धर्मवेडाबरोबर माझ्या अंगीं फटकळपणाचाही दोष आहे हें मी कबूल करितों. आणि मुत्सद्दीपणाचा गुण तर माझ्या अंगीं कसा म्हणतां कसा तो नाहींच !

हरिहर—पुन्हां तेंच ! अहो, असा फटकळपणा नाहीं आणि मुत्सद्दी-पणा आहे म्हणूनच आमच्या देशाचे आज हंसे होण्याची वेळ आली आहे. असे सद्गुण अंगीं असून ते दुर्गुण समजण्याइतकी लीनता दुसरीकडे कुठें सांपडायची नाहीं.

विहार—बरें, घटकाभर हे सद्गुणच धरून चाललों तरी ते जाणण्या-इतके तुमच्यासारखे रसिक पाहिजेत ना ?

हरिहर—कसचें ! कसचें ! मी आपला सामान्य मनुष्य. आपल्यासार-ख्यांच्या सहवासानें जरा कांहीं कळतें इतकेंच.बाकी, आपणांखेरीज इतरांना मी सहसा दाद देण्यासारखा नाहीं.

विहार—नाहीं खरेंच ! आज त्या सुधारक शास्त्र्यांचीं तोंडें कशीं तुम्ही क्षणांत बंद करून टाकलीं ! पति शब्दाचा अर्थ जो तुम्हीं बेमालुम फिरवून टाकलात त्यामुळें तर फारच बहार झाली !

हरिहर—हा सगळा आपल्या पायांचा प्रभाव ! तरी पण आपण जें बोललांत कीं 'पुरुषही एक बायको मेली असतां आजन्म व्रतस्थ राहूं शकेल; मग विधवांनींच कां नये राहूं ?' त्यानें माझ्या भाषणावरही तान केली.

विहार—भाशा या मुद्यावरच जोर होता याचें कारण आपले इतर मुद्दे जरा लटपटीचे होते. पुनर्विवाहास जुन्या ग्रंथांत शास्त्राधार आहे हें आपणही कबूल केलेंच पाहिजे. तुमची पतिशब्दावरील कोटी म्हणजे

शब्दच्छलच म्हणावयाचा. येथें आपण दोघेच आहोंत. खरें सांगा मी म्हणतों तसेंच तुम्हाला वाटतें ना?

हरिहर–मनांतून मलाही तो वितंडवादच वाटतो. कारण पालकाला-च पति म्हटल्यावर प्रत्येक कुटुंबाचा अधिपति आपल्या मुलींचा, सुनांचा बहिणींचा पतिच होऊं लागेल. पण आणीबाणीच्या वेळीं अशाच कोट्या पुढें करून आणि त्यांचा कमीपणा चर्येनें व हावभावांनीं भरून काढून विजय मिळविला पाहिजे. मघांशीं मी सभेंत भाषण करितांना रागाचा कसा आविर्भाव आणिला होता पाहिलातना? डोळे फाडून, नाक फेंदारून चेहरा असा बदलून टाकिला कीं सुधारक भेदरूनच गेले. असें सोंग प्रसंगीं आणावें लागतें.

विहार–आतां तुह्मीच होऊन ज्या अर्थी इतक्या मोकळ्या मनानें बोलत आहांत त्या अर्थी मी सुद्धां आपल्या भाषणांतील कांहीं खुब्या तुह्मांला सांगून ठेवितों. मी भाषण सुरू केल्यावर दोनचार वाक्यांत जर श्रोत्यांच्या टाळ्या पडल्या नाहींत तर हलके हलके मायदेश, आर्यभूमि, सुवर्णभूमि, सनातनधर्म हे शब्द वाक्यांत आणूं लागतों; ह्मणजे टाळ्यांचे गजर सुरू झालेच ह्मणून समजावें. एखादे वेळीं कानठाळ्या बसविणाऱ्या टाळ्या मिळवाव्याशा वाटल्या तर शिवाजीमहाराजांचें नांव घ्यावें लागतें. त्या महात्म्यास याप्रमाणें वेठीस धरण्याचें माझ्या जिवावर येतें; आणि त्यांचें नांव बसल्याउठल्या उच्चारल्यानें त्यांजविषयींचा पूज्यभावही कमी होतो. पण मग आपल्या भाषणांस टाळ्या कशा मिळाव्या? त्या महात्म्यानें जिवंतपणीं जसे आपल्या देशावर अगणित उपकार केले त्या प्रमाणें आपल्या पश्चात् सुद्धां आह्मासारख्या वक्त्यांना टाळ्या मिळवून देऊन त्यानें आपले उपकार चालू ठेविलेच आहेत.

हरिहर–शिवाजीमहाराजांचा वारंवार नामोच्चार केल्याचें आपणांला जितकें वाईट वाटतें तितकें वास्तविक पहातां वाटावयास नको. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, हा शिरस्ताच आहे. मग शि-

बाजीमहाराजांसारख्या अन्नदात्यांची टाळी भोत्यांकडून वाजविण्यातच चुकतें कोठें ? बरें, तें असो. तूर्त आपणांला प्रस्तुत कामाचाच विचार केला पाहिजे. चकोर परदेशाहून परत आला त्याबद्दल त्याजवर प्रामण्य करण्याचें ठरलें ना मग ?

विहार—आतां काय ठरायचें राहिलें आहे त्यांत ? जाहीरसभेबद्दल जाहिरातही फिरली.

हरिहर—पण हें वर्तमान वहिनीसाहेबांना मात्र कळतां नाहीं उपयोगीं बरें!

विहार—ऊंः ! कळलें म्हणून काय होणार आहे ? मी कांहीं असा कच्च्या मातीचा घडलेला नाहीं. सुधारक लोक बायकांना पुढें करून आपण घेतलेल्या शपथा मोडतात. तसेंच आपणही करूं लागलों तर त्यांना हंसण्याचा आपणांला काय अधिकार राहिला ?

हरिहर—प्रामण्याबद्दल जसा आपला ठाम निश्चय झाला आहे, तसा एकदां वपनाबद्दल झाला असता म्हणजे बरें झालें असतें. चकोर आल्यामुळें तर चंद्रिकेस तशी ठेवण्यापासून एक नवीनच भय उपस्थित झालें आहे. माझीं इतर कारणें राहिलीं बाजूला, पण निदान या कारणाकडे आपण लक्ष्य पुरवावें. हें त्यांच्यापेक्षांही सबळ आहे.

विहार—म्हणजे तींसुद्धां सबळच आहेत असें तुमचें म्हणणें ?

हरिहर—आपण पोक्त विचार केल्यास त्यांच्या सबळतेबद्दल आपलीही खात्री होईल. पति मृत झाल्यावर पत्नीनें डोक्यावर केंस ठेविले तर तो नरकांत कुंभंत रहातो असें शास्त्रवचन आहे.

विहार—ही नुस्ती पोरांना सांगण्याची गोष्ट झाली. सुशिक्षित समाजांतील लोक अशा थापांनीं थोडेच फसणार आहेत! शिवाय जसें अनुकूल शास्त्रवचन आहे तसें निषेधार्थीही आहे. तुमच्या शास्त्रवचनाप्रमाणें ईश्वर फारच न्यायी म्हटला पाहिजे कीं अति पुण्यवान् पुरुषासुद्धां त्याच्या विधवेच्या मस्तकावर एखादा केंस दिसल्याबरोबर त्यानें स्वर्गांत प्रवेस करण्याची मनाई करावी! तो केंस म्हणजे स्वर्गद्वाराचा अडसरच म्हणावयाचा!

हरिहर–बरें, तें राहूंद्या. विधवांना विद्रूप केल्यानें त्यांची नीति सुधारते हें तर आपण कबूल कराल ?

विहार–तिला नापिकाबरोबर घटका घटका कोंडून ठेविल्यानें तिची नीति कितपत सुधारणार तें दिसतेंच आहे ! आणि ती सुधारली असें घटकाभर धरून चाललों तरी अशा जबरीच्या नीतिमत्तेंत प्रौढी ती काय राहिली ? उद्यां मीं तुमचें नाक कापलें तर तुमच्याकडे कोणी तरी ढुंकून पाहील का ? नाहीं. पण तेवढ्यानें तुम्ही शुकाचार्य बनलां असें कसें म्हणतां येईल ? म्हणतां आलें तर प्रत्येक वृद्धानारीस पतिव्रता कां म्हणूं नये ?

हरिहर–तर काय, आपला निश्चय कधींही फिरायचा नाहीं ?

विहार–कल्पांतींही नाहीं फिरायचा. मग चंद्रिकेच्या केसांमुळें तो थेरडा जरी नरकांत कुचंबत पडला तरी मला चालेल ! मी येथें नाहीं अशी संधि साधून, नीचानें लग्न उरकून घेतलें त्याबद्दल त्याला कांहीं शिक्षा पाहिजेच कीं नाहीं ?

हरिहर–हं, वहिनीसाहेब आल्या !

तरंगिणी–(प्रवेश करून) हें काय ऐकतें मी आज ! माझ्या चक्रोरावर म्हणे ग्रामण्य होणार ?

विहार–तूं आमचें बोलणें आडून ऐकतेस कीं नाहीं हें पहाण्याकरितां मी शास्त्रीबुवांजवळ उगीच मौजेनें तसें बोलून गेलों.

तरंगिणी–ऐकायलाच कशाला पाहिजे ? वर्तमानपत्रांतूनसुद्धां आलें; आतां ग्रामण्य होण्याला काय बाकी राहिली आहे ?

विहार–मी एकुणएक वर्तमानपत्रें बंद केलीं असतां कोणत्या हरामखोरानें तुला वर्तमानपत्र आणून दिलें ? आज पांच दिवस बाहेर पडतांना माझ्या वाचावयाच्या- खोलीला मी कुलूपसुद्धां लावून जात होतों. इतका कडेकोट बंदोबस्त केला असतां तुझ्या हातीं वर्तमानपत्र येतें म्हणजे नवल नाहीं का ?

तरंगिणी—सरकार वर्तमानपत्रांच्या तोंडांना कुलूप लाविते तेव्हां चोहोंकडून एकच हाकाटी होते. आणि आपण वरीक तीं खुशाल कुलुपांत ठेवावीं ना ?

विहार—(जवळ जाऊन) सांग बरें तुझ्या हातीं पत्र कसें लागलें तें ?

तरंगिणी—मघांशीं वाण्याकडून साखरेचा पुडा आणविला; आणि तो फोडून पहातें तों साखरेभोंवताली गुंडाळलेल्या कागदांतून ही विषा-पेक्षांही कडूजहर बातमी दिसून आली.

हरिहर—ठीकच आहे ! वैद्यलोक कडू गोळ्या शर्करावगुंठित करून विकतात आणि वाणी शर्करा कडुपदार्थावगुंठित करून विकतात.

तरंगिणी—या प्रामण्याचे पुरस्कर्ते आपणच आहांत वाटतें ?

विहार—चांगली गोष्ट करायला कोणाची भीति आहे ?

तरंगिणी—हें प्रामण्य चांगलें कसें तें मी नाहीं समजलें.

हरिहर—आपल्या देशाची सीमा ओलांडल्याबद्दल शास्त्रांत प्रायश्चित्त आहे.

विहार—त्या शास्त्राची नाहीं मी पर्वा करीत ! कूपमंडूकाप्रमाणें देशांतल्या देशांत बसून रहाण्याचे ते दिवस गेले. आतां देशाचा अभ्युदय करायचा असेल तर देशांतर करून कला व शास्त्रें संपादन केलीं पाहिजेत.

तरंगिणी—मग आतां हरकत कुठें राहिली ?

विहार—जे आपले लोक विद्यार्जनाकरितां परदेशीं जातात ते तिकडे आपल्या चालीरीती व भाषा विसरून आणि परकीय शिकून परत येतात; यामुळें देशाचें फार नुकसान होतें.

तरंगिणी—माझा चकोर कधीं नाहीं असे वेडेचार करणार !

विहार—आतांपर्यंत हें प्रामण्य करण्याचीं धार्मिक आणि सामाजिक कारणें ऐकलीस. त्यांच्या जोडीला एक खाजगी कारणही आहे.

तरंगिणी—कळूं द्या कोणतें तें.

विहार–चकोर परदेशीं जाण्यापूर्वी चंद्रिकेचें आणि त्याचें लग्न करण्याचें ठरलें होतें; आठवतें का तुला ?

तरंगिणी–हो. पण त्याचें काय राहिलें आतां ? दुष्ट दैवानें मध्येंच बिब्बा घालून आणि दुसऱ्याशींच लग्न घडवून, त्याही लग्नाचें एकच फळ म्हणजे वैधव्य हल्लीं बाकी ठेविलें आहे.

विहार–चकोर येथें परत आल्यापासून हें साद्यंत वर्तमान ऐकून कसा बावरल्यासारखा झाला आहे. आणि त्याचा चंद्रिकेशीं पुनर्विवाह करण्याचा मानस आहे असेंही ऐकतों. तेव्हां त्यास बहिष्कार घातला म्हणजे वैतागून जाऊन तो हा नाद खास सोडून देईल.

तरंगिणी–जो पुनर्विवाह करण्याला सरसावणार तो बहिष्काराला फारच भीक घालणार आहे ! बहिष्काराचा झालाच तर उलट मात्र परिणाम होईल. म्हणजे चकोर हट्टाला पेटून वन्संशीं हटकून लग्न लावील. ते दोन्ही भाऊ आपणांला अजून माहित नाहींत.

(नव यौवन सुंदरता ही०–या चालीवर)

ते बंधु निश्चयी बांधे । झगडती संकटांसंगें ॥ करिताति झटुनियां अंगें । विपदेंसि संपदा वेगें ॥ तद्धैर्य कधींहि न भंगे । धृति जनिं ये तत्संसर्गें ॥ (चाल) विपत्ति गणुनी साहसशाला । आदरिती प्रेमें ते तिजला । तन्मति भीति न घे ॥ १ ॥

दादानें आपला आश्रम काढिला तेव्हां त्याला थोडीं का विघ्नें आलीं ? पण त्यांनीं त्याचा उत्साह दुणावून शेवटीं त्यानें खासें यश मिळविलें.

हरिहर–त्यांना यश कसें मिळतें कुणास ठाऊक ! कारण त्यांनीं कोणताही बेत केला तरी तो अमलांत येण्यापूर्वी त्यांना शेंकडों विधवांची अपशकुनी तोंडें दिसावयाचीं !

विहार—तूं म्हणतेस तसाही परिणाम कदाचित् होईल. नाहीं कोणीं म्हणावें! पण म्हणून असे तर्क वितर्क काढून प्रयत्न कां सोडून द्यावा? शिवाय चकोर एकदां पतित झाला म्हणजे आमची चंद्रिकाही त्याजकडे पहाणार नाहीं.

तरंगिणी—चंद्रिकेचेंच कशाला हवें? चकोर पतित झाला तर माझे सुद्धां प्राण रहाणार नाहींत. मी एकदां नाहींशी झालें म्हणजे मग आपण वाटेल तशीं प्रामण्यें काढीत सुटावें. चकोरानंतर वन्संवर केसांबद्दल प्रामण्य काढावें. तिच्यानंतर धाकट्या वन्संवर. या आपल्या खटपटीवरून असें दिसतें कीं,

(जो पिया आयेना०—या चालीवर)

अपुल्या दृष्टिसी । झालें बाई अलीकडे नको अशी ॥ रति कैशी । अतांशी । न दासीविशीं ॥ ध्रु० ॥ नवि शोभेशि करावी आपणां दुजि नारी । उपजे त्रास मनीं मजविषयीं जरि भारी ।

विहार—

त्रासेन कसा स्वासुखि विग्रहधारी । भेदिसि शरसम योजुनियां हीं सारीं ॥ वचनें ऐशीं । नच शोभतशीं । मृदु चित्ताशी ॥ २ ॥

तरंगिणी—पुरुषांना काय? एक बायको मेली तर दुसरी, दुसरी मेली तर तिसरी, हव्या तितक्या करितां येनात. इतकेंच नाहीं तर एकदम चार चार केल्या तरी कोणाला हात धरितां यावयाचा नाहीं.

विहार—पण मी अशा नराधमांपैकीं आहें असें का तुला वाटतें?

(मानीं आत्मरूपखाणी०—या चालिवर)

शंका । घेसि घोर ही कां ॥ प्रीति कशी मम सिद्ध करावी धालवुं केवीं । संशयपंका ॥ ध्रु० ॥ विधुर कदा नच होवों जन्मीं । झालों जरि दुर्दैवें तरि मी । लाविं न कधिं शपथेसि कलंका ॥ १ ॥

यांत मी बढाई मारतों असा मुळींच प्रकार नाहीं. कारण कोणत्याही पुरुषाला हें साध्य आहे असें माझें मत आहे. आणि याच मुद्द्यावर मी आज सभत पुनर्विवाहाचें खंडन केलें.

तरंगिणी–त्या सभेचें तूर्त राहूं द्यायचें होतें आणि ग्रामण्याच्या सभेचें काय करणार तें सांगायचें होतें. कारण तिचा कांहीं तरी माझ्या मनाजोगा निकाल झाल्यावांचून माझी आपल्या प्रेमाबद्दल कधीं खात्री व्हायची नाहीं.

विहार–शहरांत जाहिरात फिरली आहे.तेव्हां आतां सभा करणें न करणें माझ्या हातीं राहिलें नाहीं. धनुष्यांतून बाण निघून गेला. तो सुटण्यापूर्वी जर तूं मला सांगितलें असतेंस तर निराळी गोष्ट होती.

तरंगिणी–आपण कड्याकुलुपें लावून मला सुगावाही न लागण्याची तजवीज केल्यावर मला त्याचें स्वप्न पडावें कीं काय ? शिवाय जाहिरात म्हणजे कांहीं लल्लाटींची रेषा नव्हे. दुसरी जाहिरात काढून ती रद्द करितां येण्यासारखी आहे.

विहार–सारें खरें,पण सभा तहकूब ठेवण्याला कारण कोणतें लावायचें?

तरंगिणी–सुधारकांवर प्रसंग आले असतां ते कशा एक एक सबबी पुढें आणितात ! त्यापैकींच एखादी काढा झालें !

विहार–माझें कपाळ दुखतें म्हणून कळवूं ?

तरंगिणी–कांहीं वाईट नाहीं. आणि ही सबब खरी ठरावी म्हणून मी पाहिजे तर संध्याकाळपर्यंत आपल्यापाशींच बसून कानीं कपाळीं कट-कट करितें म्हणजे डोकें खरोखरीच दुखूं लागेल !

विहार–वाः ! पसंत ! पसंत !

तरंगिणी–पण अशानें सभा कशी बंद पडणार ? हे नसले तर दुसरा कोणी नाहीं का चालविणार काम?

हरिहर–वहिनीसाहेब, दादासाहेब येथील समाजाचा केवळ आत्मा आहेत. त्यांच्यावांचून काडीही हलावयाची नाहीं. शिवाय दुसरेंही कारण

पाहिजे असेल तर असें दाखवावें कीं प्रामण्याला जितकें शास्त्रवचनांचें साहित्य पाहिजे तितकें अजून गोळा झालें नाहीं; म्हणजे झालें.

विहार–ठीक ठीक ! असेंच लिहावयाचें ! चला तर. (तरंगिणी जाते.)

हरिहर–मला वाटलेंच होतें कीं वहिनीसाहेब आपला बेत हाणून पाडतील म्हणून. बाकी त्यांच्या तंत्रानें चालण्यांत कांहीं गैर नाहीं म्हणा. यावरून आपलें त्यांच्यावरचें प्रेम चांगलें दिसून येतें.

विहार–हें पहा, कधीं कधीं अशी पड घेतलीच पाहिजे. त्याशिवाय हा संसार चालायचा कसा ? (एकीकडे) एकदां यांची माझ्या आग्रही स्वभावाबद्दल खात्री केली पाहिजे. नाहींतर हे माझीही गणना बाईलबुद्ध्यांतच करावयास लागायचे !

(जातात.)

प्रवेश ४ था.

(वेणूबाई.)

वेणू–(स्वतःशीं) मला येथें पहाऱ्याचें काम करायला सांगून तो मांग बाईसाहेबानां पुराण सांगायला आंत गेला. आम्हा बायकांचें एकदां वांकडें पाऊल पडलें कीं पडलेंच ! फुटलेली कांचसुद्धां एकवेळ जोडतां येईल; पण बायकांची अब्रू गेली म्हणजे कधीं परत येत नाहीं. नंतर त्यांच्या कपाळीं प्रथम राखपण आणि मग कुंटणपण ठेविलेलेंच असावयाचें ! प्रथम आपलें तारुण्य लुटूं देऊन नंतर दुसऱ्याचें तारुण्य बिघडवायचें ! नकोग बाई ! हा विचारसुद्धां नको ! वेणे, हा विचार तुझ्या मागें जन्मभर लागला आहे तो कुठचा इतक्यांत सुटायला ? असो; या मांगापासून जरा लांबच असूं या. म्हणजे त्याचें नांच पुराण तरी कानीं पडायला नको.

(जाते.)

प्रवेश ५ वा.

(सरस्वती व हरिहरशास्त्री.)

हरिहर–याप्रमाणें गोपींना स्नान करितांना पाहून त्या सर्वजणींचीं वस्त्रें घेऊन गोपालकृष्ण कदंबाच्या झाडावर जाऊन बसले व तेथून मुरली वाजवूं लागले. गोपींना अत्यंत प्रिय असलेला वेणुध्वनि कानीं पडतांच त्या घाईघाईनें यमुनातीरावर येऊन आपलीं वस्त्रें पाहूं लागल्या; परंतु तीं सांपडेनात. शेवटीं त्यांनीं करुणस्वरानें गोपालकृष्णाची विनवणी केली कीं 'कृष्णा, आम्हीं तुला शरण आलों आहोंत; तर आमचीं वस्त्रें आम्हांला परत दे, व आमच्या लज्जेचें रक्षण कर' कृष्णांनीं उत्तर दिलें 'अहो गोपींनो, तुमचें कात्यायनव्रत चाललें असतांना तुम्हीं नग्न स्थितींत स्नान करून महापातक केलें आहे. तर त्याचें क्षालन करण्याकरितां दोन्ही हात वर करून तीनदां नमस्कार करा.'

सरस्वती–शास्त्रीबुवा, एका निर्लज्ज कृत्याचें क्षालन दुसऱ्या त्याहून निर्लज्ज कृत्यानें कसें होणार !

हरिहर–याचें उत्तर मी एका दृष्टांतानें देतों. माझा एक स्नेही असे, त्याला धूम्रपानाचें फार व्यसन ! त्यानें कुठें असें ऐकिलें कीं एक व्यसन सुटावें अशी इच्छा असल्यास दुसरें जडवून घ्यावें. त्याप्रमाणें त्यानें धूम्रपानाचें व्यसन सुटण्याकरितां मदिराबाईचें आराधन केलें. तिच्या प्रसादानें त्याचें पहिलें व्यसन खरोखरीच सुटलें. मात्र मद्यपानाचें इतकें जडलें कीं त्यांतच त्याचा अंत झाला.

सरस्वती–(हंसून) असाच कांहींसा प्रकार गोपींचा झाला खरा !

हरिहर–(एकीकडे) आज बाईसाहेब प्रसन्न दिसत आहेत! (उघड) गोपालकृष्णांनींही नग्नस्थितींत स्नान केल्याचा दोष त्याच स्थितींत वंदन केल्यानें, व तो दोष त्याच्याही पलीकडच्या प्रकारांनीं धुवून टाकिला. त्याचें भागवतांत फारच सुरस वर्णन केलें आहे.

सरस्वती—भगवान् श्रीकृष्णांनीं असे प्रकार केले असतील हें मला खरें वाटत नाहीं.

(चाहे बोलो या न बोलो०—या चालीवर)

श्रीकृष्ण तो परमात्मा। करि काय निंद्य कर्मा॥ सुचली-हि पुण्यधामा। मति केविं त्यासी वामा॥ ध्रु० ॥ पर-मादरें यदुवीरीं। विश्वासिती व्रजनारी । वंचील का त्या रामा॥ १ ॥ मालिन्य हें जयाचें ।.संहरण महादुरि-तांचें। का संभवे तन्नामा ॥ २ ॥

या कथांचा जो वर वर अर्थ दिसतो त्यापेक्षां निराळा गूढ अर्थ त्यांत असला पाहिजे.

हरिहर—पुष्कळ विद्वानांनीं तसा अर्थ बसविण्याचा खटाटोप केला आहे. पण तो समर्पक असा बसालाही नाहीं, आणि त्यापासून रसिकाच्या चित्ताला तितका आनंदही होत नाहीं.

सरस्वती—शृंगाररसाच्या भोक्त्यांना वैराग्यपर अर्थ कसा रुचणार ?

हरिहर—आपण अगदीं माझ्या मनांतलेंच बोललांत.

सरस्वती—बरें, आपलाच अर्थ खरा धरून चाललें म्हणजे मग भग-वंताची महापातकाच्या दोषापासून मुक्तता कशी करावयाची ?

हरिहर—दोष असेल तर मुक्तता कीं नाहीं ? भक्त भगवंताशीं रम-माण झाला तर त्यांत उलट पुण्यच आहे. वेदांताचें पर्यवसानसुद्धां जी-वात्मा व परमात्मा यांचें ऐक्य होण्यांतच आहे.

सरस्वती—पण तें ऐक्य आत्मिक असतें.

हरिहर—आणि शारीरिक नसतें असेंच म्हणणें कीं नाहीं आपलें ! परंतु याला उत्तर सोपें आहे. आत्मिक ऐक्य ही सर्वांत वरची पायरी आहे. ही प्राप्त करून घेणें मोठमोठ्यांनासुद्धां साधत नाहीं. म्हणून शारीरिक ऐक्याची जी सर्वांत खालची पायरी तिजपासून ज्ञात्यानें सुरुवात ली पाहिजे.

सरस्वती-ऐकावें तें नवलच ! तर मग स्त्रियांचें वाईट मार्गी पाऊल पडण्यांत कांहींच दोष नाहीं म्हणतां ?

हरिहर-असें नाहीं म्हटलें मीं. माझें म्हणणें इतकेंच कीं गुरूशीं संबंध केला असतां तो पापाचरणाखालीं येत नाहीं. आपल्याच हिंदुस्थानांत अशा कांहीं जाती आहेत कीं त्यांमध्यें असा संबंध पुण्यकारक समजतात.

सरस्वती-हेंही मला माहित नव्हतें. बरें, गुरु म्हणजे कोण ?

हरिहर-गुरु म्हणजे धर्माचा उपदेष्टा. विद्येचा दाता असाही अर्थ त्यापासून निघूं शकेल.

सरस्वती-चंद्र गुरुपत्नीशीं रममाण झाल्यामुळें त्यास शाप मिळालेला मीं ऐकिला होता. पण शिष्यीण गुरूशीं रममाण होऊन पुण्य संपादन करिते हें मी आजच पहिल्यानें ऐकतें.

हरिहर-आपलें आजपर्यंतचें ज्ञान किती मर्यादित होतें, तें विस्तृत करण्याकरितां तर रावसाहेबांनीं मला मुद्दाम ठेविलें आहे.

सरस्वती-बरें, तुम्ही म्हणतां तसें या संबंधांत पुण्य जरी असलें तरी कोणता गुरु असें कृत्य करण्याला तयार होणार आहे ?

हरिहर-तयार झाला नाहीं तर गुरूचा कनवाळूपणा कोठें राहिला ? फार कशाला ! आपल्याच गुरूंपैकीं एकजण आपल्यावर असे उपकार करण्याला या घटकेस तयार आहे. आपल्या अनुकूलतेचीच काय ती उणीव आहे.

सरस्वती-(एकीकडे) माझ्या मनाप्रमाणेंच यांच्या म्हणण्याचा अर्थ असेल का ? (उघड) कोणीं तुमच्याहातीं निरोप पाठविला आहे वाटतें ? तसें असेल तर बोला लवकर. मला संशयांत ठेवूं नका.

हरिहर-असा निरोप दुसऱ्याच्या हातीं कोण धाडील ? बाईसाहेब, मीच तो आपला गुरु कीं जो आपल्या रूपावर भुलून चरणांवर लोटांगण घालण्याला तयार आहे.

सरस्वती–काय तुम्हीं ? आज चमत्काराचाच दिवस आहे. पण या शेवटच्या चमत्कारानें इतर सगळ्यांना फिकें पाडिलें. नीचा !

(ए रंगी रंगे तूं०–या चालीवर)

तव मति चळली कैशी । वदाया नीच वचन अवचित
वद्द कशि वळली रसना लाज न का तुजपाशीं ॥ ध्रु० ॥
शिकवाया मजला स्त्रीधर्मा । राहिलासि गृहिं दुष्कर्मा ।
दाविलेंसि पारि अपुल्या वर्मा । कामुकचेष्टा निःशंकपणें
करिसी ॥ १ ॥

थांब, हें मी तिकडे जाऊन सांगतें. (जाऊं लागते.)

हरिहर–(एकीकडे) माझी सारी भूलच झाली कीं काय ? (उघड) बाईसाहेब, क्षमा करा, आणि हें सगळें विसरून जा. मी पुन्हां आपणांला कधीं त्रास देणार नाहीं.

सरस्वती–(एकीकडे) माझेंही वर्तन मघाशीं जरा संशय येण्यासारखें होतें. त्याचा यानें उपयोग करितां कामा नये. (उघड) या घराचा उंबरठा पुन्हां चढणार नाहीं अशी शपथ घे, म्हणजे हें कोणाच्याही कानांवर घालणार नाहीं.

हरिहर–घेतों; पण मग रावसाहेबांना आपण काय कारण सांगाल ?

सरस्वती–असें सांगेन कीं त्यामुळें तुला सरकारदरबारांत जाण्याचा प्रसंग येणार नाहीं.

हरिहर–मग मीही या घरीं पुन्हा येईन तर देवाचीच शपथ. (जातो.)

वेणूबाई–(प्रवेश करून)–बाईसाहेब, रावसाहेब आपणांस हांका मारीत आहेत. ते बहुतकरून इकडे यायलाही निघाले असतील.

आनंदराव–(प्रवेश करून)–हरिहरशास्त्री कुठें आहेत ?

सरस्वती–त्यांचें वर्तन मला जरा फाजीलपणाचें दिसलें, म्हणून मी त्यांना कायमचा निरोप दिला आहे.

आनंदराव–शाबास ! याला म्हणावें पातिव्रत्य ! इतक्यांत मला मनोहरपंतांचेंही पत्र आलें; त्यांत त्यांनीं शास्त्रीबुवांच्या वर्तणुकीबद्दल ऐकिलेल्या बोभाटयाबद्दल लिहिलें आहे. म्हणून त्यांना कायमची रजा देण्याचें तुला सांगण्याकरितां हांका मारल्या; तूं जवळपास नव्हतीस म्हणून मीच इकडे निघून आलों.(वेणू जाते.) यापूर्वींच तूं त्याला वाटे लाविलेंस हें फारच उत्तम झालें. सरस्वति,तूं माझ्या विश्वासाला पात्र आहेस हें आज तूं सिद्धच करून दाखविलेंस. चला, तिकडेच जाऊं.

(जातात.)

प्रवेश ६ वा.

(हरिहरशास्त्री व वेणूबाई.)

हरिहर–माझा सारा बेत फसायला कारण तूंच आहेस.

वेणू–मनुष्य नेहमीं आपल्या चुकीचें खापर दुसऱ्यावर फोडायला तयार असतें.

हरिहर–तिच्या मनाची तूं तयारी करून ठेविली नाहींस म्हणून तर सगळी घाण झाली.

वेणू–पण तुमचा बेत फसला अशी तरी तुमची खात्री आहे का ?

हरिहर–फसण्याला काय शिंगें राहिलीं असतात ! तिनें मला निक्षून सांगितलें घरांतून निघून जायला. लाथा मारायच्या मात्र ठेविल्या होत्या !

वेणू–बरें हें झालें किती वेळांत ?

हरिहर–फारच थोडया वेळांत. तूं येण्यापूर्वीं दोनचार पळांतला कारभार सगळा.

वेणू–मग माझा तर्कच खरा आहे.

हरिहर–तुझा आणखी कोणता तर्क ?

वेणू–बाईसाहेबांनीं माझ्या पावलांचा आवाज ऐकून तुमच्यावर रागावण्याचा कांगाव केला नुस्ता !

हरिहर–तुझा तर्क मलाही खरा वाटूं लागला आहे. कारण मी तिला हें वर्तमान रावसाहेबांच्या कानांवर न घालण्याबद्दल विनवलें मात्र, आणि ती लागलीच त्या गोष्टीला कबूल झाली. तिचा राग ढोंगाचा नसता तर तिनें सगळ्या घरांत एकच कल्लोळ करून सोडला असता. बरें, तूं तेथें कशाला भलत्या वेळीं आलीस ?

वेणू–इकडे कान करा म्हणजे सांगतें. (हरिहरशास्त्र्याच्या कानांत सांगते.)

हरिहर–असें ! असें ! पतिराजांनीं आम्हांला अर्धचंद्र दिला तर ? त्यांच्या अर्धांगीच्या पूर्णमुखचंद्राची हाव धरल्याबद्दल हें बक्षीस योग्यच झालें ह्मणावयाचें ! आणि त्या मनोहराचेंही यांत अंग आहे. माझी ब्याद वाटेंतून दूर करण्याला पहातो आहे. बरें आहे म्हणावें; अजून काय झालें आहे ? तुझ्यापूर्वीं मीच या पांखराला आपल्या जाळ्यांत पकडतों. आतां पहिलें काम सरस्वतीला तावडतोब एक प्रणयपत्रिका पाठवायची. विलंब केला तर तिचा कामावेश शांत होईल.पत्र पाठवावयाचें तें भेंकडभटाकडूनच पोहोंचतें करावें म्हणजे झालें.

(पडदा पडतो.)

अंक तिसरा.

प्रवेश १ ला.

(हरिहरशास्त्री.)

हरिहर–(स्वतःशीं) पत्र पाठवून एक सबंध दिवस गेला; पण अजून उत्तर नाहीं. त्या भेंकडभटानें तर मध्येंच कांहीं गडबड केली नसेल

ना? किंवा त्याच्या हातांतून कोणीं तें हिसकावून घेतलें ? हा पहा तोच येत आहे.

भेंकड-(प्रवेश करून) सगळीं कामें आटपतां आटपतां चांगली संध्याकाळ झाली. अंधारही पडला. त्यांतून आमचें शेजारचें घर भुताट-कीचें आहे. त्या घरांतील एका बाईनें विहिरींत जीव दिला, आणि तेव्हां-पासून ती घरांतील लोकांच्या व रस्त्यानें जाणारायेणारांच्या हात धुवून मागें लागली आहे म्हणतात! परवां एक बोवा रात्रीचे बारा वाजतां रस्त्यानें चालला असतांना त्याला बांगडयांचा खळकन् आवाज ऐकूं आला, म्हणून वर पाहिलें तों सर्वांत वरच्या खिडकींतून डोक्याला मळवट भरलेली एक बाई आपणांकडे हंसत हंसत पहात आहे व तिचे हात खालीं रस्त्याप-र्यंत पोहोंचले आहेत असें त्यानें पाहिलें आणि तो मटकन् खालींच बसला. पण येथें आवाज कसला झाला बरें? (मागें पाहून) कळला नाहीं. माझ्या जोडयाचा. आपण आतां जोडा न वाजवितां चालावें तें बरें. (चालून) अथवा जोडा हातांतच घ्यावा, म्हणजे पिशाचाला मारायला बरें पडेल. आणि उजव्या हातांत जानव्याची घ्यावी गांठ म्हणजे ती त्याला दाखवितां येईल. याप्रमाणें गांठीची ढाल आणि जोडयाची तरवार करून चाललें म्हण-जे भुताची काय माय व्यायली आहे माझ्या अंगावर यायला! अरे पण तें अंधारांत काय दिसतें आहे पांढरें? पिशाचच तें! (जोडा गळून पडतो.) पि-पि-पि-पिशाचा! म-म-मी-ह-हात जोडतों.

हरिहर-(एकीकडे) काय मूर्ख आहे! (उघड) अरे भेंकडभट!

भेंकड-अरे बापरे! तें बोलायलाही लागलें!

हरिहर-अरे भेंकडभटा, असा भेदरलास काय?

भेंकड-(एकीकडे) भूत नाहीं वाटतें. तो शास्त्री दिसतो आहे.(उघड) काय म्हणतां?

हरिहर-असा घाबरलास काय? भित्रा नाहीं तर!

भेंकड-कोण घाबरलें? तुम्हीच घाबरलां असाल!

हरिहर-खरेंच; मीच घाबरलों. पण आधीं घाम पुसून जोडा पायांत

घाल. अस्सा! आतां मला सांग बरें कालचें पत्र बाईसाहेबांच्या हातांत दिलेंस कीं नाहीं तें?

भेंकड–मला तुम्हीं भित्रा कां म्हटलेंत तें सांगा पहिल्यानें. याचा तुम्हांला चांगला जाब द्यावा लागेल!

हरिहर–काय जाब घेणार रे माझा? हं सांग लवकर.

भेंकड–माझी क्षमा मागितल्यावांचून नाहीं सांगायचा.

हरिहर–मी नाहीं मागत क्षमा न् बिमा!

भेंकड–शिव्या द्यायच्या आणि क्षमा मागायची नाहीं म्हणजे? मग काय? मी समजूं ना तुम्ही क्षमा मागितली म्हणून?

हरिहर–तूं समज वाटेल तें.

भेंकड–अस्सें! आतां कसे वाटेवर आलांत! लवकर माफी मागितली म्हणून बरें झालें. आतां बोला काय तें.

हरिहर–माझ्या पत्राचें काय झालें?

भेंकड–तुमचें पत्र बाईसाहेबानीं वाचून पाहिलें आणि त्या तिरस्कारानें हंसल्या.

हरिहर–तिरस्कारानें! (एकीकडे) बरें, पाहून घेईन! (उघड) आणि उत्तर?

भेंकड–त्या म्हणाल्या उत्तर देण्याची योग्यता नाहीं म्हणून. अगदींच हलकट होतें वाटतें तें पत्र?

हरिहर–फारच हलकें होतें. हें घे त्याबद्दल तुला भारी बक्षीस! (मारूं लागतो, भेंकड चुकवितो.)

भेंकड–माझ्या अंगाला हात लाविला असता तर हाडें झाडें नरम करून टाकिलीं असतीं. (जातो.)

हरिहर–(स्वतःशीं) काय! उत्तर देण्याची योग्यता नाहीं? बरोबरच आहे. कुलशील सारखें नसल्यावर योग्यता असेल कुठून? आतां हिच्याच कुळांतली एखादी स्त्री वश करून घेऊन हिला पुराव्यानिशीं शाबीत करून

दिलें पाहिजे थोर कुळांतील स्त्री हलक्या माणसावर कशी फिदा होते तें! म्हणजे माझा सूडही उगवल्यासारखा होईल, आणि या निराश झालेल्या कामवासनेची तलफही अंमळ भागेल. जो जय सरस्वतीवर मिळवितां आला नाहीं तो चंद्रिकेवर मिळवितां येणार नाहीं का? आलाच पाहिजे. या विधवा, प्रेमाला कशा हापापलेल्या असतात. याचा प्रत्यय मला वेणूच्या बाबतींत चांगलाच आला. चकोर एकदां चंद्रिकेला असाध्य झाला, म्हणजे जो तिला प्रथम भेटेल तोच तिचा वल्लभ! वेशीपाशीं सर्वांच्या आधीं येणाऱ्या इसमास राज्यपद अर्पण करणाऱ्या मंत्र्यांपेक्षां या विधवा फारशा शहाण्या नसतात. असो, हा माझ्या सुडाचा एक प्रकार झाला. सरस्वतीवर दुसऱ्या एखाद्या प्रकारचा सूड उगवितां येणार नाहीं का? तिच्या बोलण्यांत तिची प्रीति तिच्या एखाद्या गुरूवर म्हणजे मजवर किंवा मनोहरावर असावी असें आलें. आतां माझ्याविषयींचा संशय मुळींच उरला नाहीं; तेव्हां तिचें प्रेम मनोहरावरच आहे हें खास! मनोहरानें मला तिच्या घरून हुसकावून लाविलें त्याअर्थी त्याचीही तिच्या प्राप्तीविषयीं खटपट चालू असावी. आतां संधि साधून मनोहराला स्वर्गाची वाट दाखविली पाहिजे. हीं देवमाणसें या पृथ्वीवर रहाण्याला अगदीं अयोग्य! तसें झालें म्हणजे या चढेल स्त्रीला नवरा जिवंत असतां वैधव्य आल्या सारखें होईल, आणि मनोहराचीही माझ्या बेतांच्या आड आल्याबद्दल चांगली संभावना केल्याप्रमाणें होईल. मात्र हा दुसरा बेत ताबडतोब अमलांत आणिला पाहिजे. कारण त्याला या हाताचा प्रभाव दाखवायला विलंब केला, तर ही छाती मत्सरानें फुटून जाईल!

(जातो.)

प्रवेश २ रा.

चकोर–(प्रवेश करून)–(स्वतःशीं) हा तापशाचा वेष तर अंगावर चढविला! हा मला शोभत नाहीं असें कोण म्हणेल?

(अब मोरे राम०—या चालीवर)

वेष योग्य हा । स्वितिला माझिया पहा ॥ ध्रु० ॥ योग्य अक्षमाला । अश्रुसंततीला । पात्र पात्र तेवीं प्रेमयाचनेला॥ रागा वसनराग हा ॥ १ ॥

असो; आतां ती ज्या स्थलीं बसली असेल तिकडचाच मार्ग धरावा. (चालून) रावसाहेब व विहार वेगळे झाले ते एकाच वाड्याच्या दोन भागांत निराळीं बिऱ्हाडें करून राहिले आहेत. परंतु यांपैकीं मुलाचा कोणता आणि बापाचा कोणता भाग ? हा भपकेदार भाग आनंदरावाचा असला पाहिजे. तर आतां दुसऱ्या भागाकडेच जावें. अहाहा! या अंगणांत आणि या वृंदावनाजवळ आम्हीं बालपणीं किती प्रेमाच्या गोष्टी केल्या ! ज्या घरीं मी हक्काचा पाहुणा म्हणून जात असें, त्या घरीं प्रवेश करून घेण्याकरितां मला वैराग्याचा वेष घ्यावा लागला आहे ! हे ते पारिजातकाचें झाड ! याला जितकीं पुष्पें हल्लीं बिलगलीं आहेत, त्यापेक्षां अधिक आठवणी त्याशीं संलग्न आहेत. त्याला पाहिल्याबरोबर माझ्या बालपणचा चित्रपट समोर उभा राहिला. प्रौढवयांतल्यापेक्षां या वयांतला चित्रपट फार भडक रंगांनीं रंगलेला असतो. पुढें कालगतीबरोबर तो फिक्का पडत जातो. या ठिकाणीं मी पारिजातकाच्या कळ्यांचा गजरा करून कितीदां तरी तिच्या वेणींत घातला होता ! तीच वेणी आतां अस्ताव्यस्त व विखुरलेली आढळून येइल ! चंद्रिका त्या वेळीं स्वतःही मनोहर स्त्रीत्वाची नुकतीच उमलूं पहाणारी कळी होती. पण आतां अकालीं सुकून गेलेल्या पुष्पाप्रमाणें ती दिसून येईल. या स्थलीं तिनें कितीवेळां तरी रांगोळीचीं चित्रविचित्र स्वस्तिकें काढावीं आणि मी त्यांजमध्यें गुलाल भरावा. आणि कोणाचें कौशल्य अधिक याबद्दल आम्हांमध्यें सप्रेम स्पर्धा चालावी! पण आतां तिचा हात वक्षःस्थल पिटण्यांत गुंतला असेल आणि माझ्या हातीं हें भिक्षापात्र आलें आहे ! या ठिकाणीं मी अनेक वेळां तिच्या वेणीवर हात देऊन आणि सुंदर मुखकमलाकडे एकाग्र दृष्टि देऊन तिचें कुंकू नीट केलें; पण आतां तिचा भालप्रदेश कुंकवावा-

चून कसा निस्तेज दिसत असेल ! तिची वेणी तर कुंकवावांचून मणिविरहित सर्पाप्रमाणें किंवा शशिविरहित रात्रीप्रमाणें विशोभित दिसत असेल. काय चमत्कार आहे पहा ! स्थळ तेंच, वृक्ष तोच, वृंदावन तेंच, मी तोच, आणि चंद्रिकाही तीच ! पण एका कुंकवाच्या टिळयावांचून या सर्वांची कांति नाहींशी झाली आहे ! अरे, पण तीच आली वाटतें ! हरहर ! तिचें असें निस्तेज मुख पहाण्यापेक्षां मी अंध कां नाहीं झालों ?

चंद्रिका–(प्रवेश करून)–(स्वतःशीं) आतां सारी मंडळी तिकडे गडबडींत आहेत तोंच तुळशीची पूजा करून मग घरांत जावें.(पूजा करिते.) हे देवि !

(सुंदरि सीते जा भवनीं०–या चालीवर)

विनवि सुता माते तुळशी ।सावधान हें वच परिशीं ॥ध्रु०॥
ठरलें मी जन्माचि अभागी । ठेविं सदैव सुखीं त्यांसी॥१॥
आनंदवि मज तत्स्मृति परि मम । होउ न त्यां कवण्याहि दिशीं ॥ २ ॥

चकोर–(एकीकडे) ही कोणाबद्दल बोलत आहे बरें ?

चंद्रिका–ज्या देशांत ते गेले आहेत तेथील स्त्रिया फार मोहक असतात असें ऐकितें. त्यापैकीं एखादीच्या पाशांत ते सांपडले असतीलच,

चकोर–(एकीकडे) ही मलाच उद्देशून बोलत आहे.चंद्रिके,मी पाषाणासारखा निर्दय तर खराच,पण माझ्या कठिण हृदयावर कोरलेली तुझी मूर्ति पुसून टाकून त्याजवर दुसरी प्रतिमा उमटविणें त्याच कारणामुळें अशक्य होऊन बसलें आहे. (चंद्रिका तुळशीला प्रदक्षिणा घालते) चंद्रिका इतक्या थोडया वर्षांत किती तरी गंभीर दिसूं लागली आहे ! कां नाहीं दिसणार? प्रातःकाळीं कुमारिका,मध्यान्हीं पत्नी व रात्रीं गतभर्तृका,याप्रमाणें आयुष्यांतील तिन्ही अवस्थांचा अनुभव जिला एका दिवसांत घेऊन चुकला तिची वृत्ति एकदम गंभीर झाल्यास नवल काय ! ही वृंदावनाभोंवती प्रदक्षिणा

घालतांना सूर्याभोंवती फिरणाऱ्या वसुंधरेप्रमाणें शोभत आहे. विपत्तीच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें हिची पृथ्वीच्या दैनंदिनगतीप्रमाणें स्वप्रदाक्षिणा-ही चालली आहेच ! आतां हिचें चित्त वेधून घेण्याकरितां एखादें गाणें म्हणावें. (उघड)

(आज काल होति न वश०—या चालीवर)

भेटसि कां भिन्न अंगि मजसि जानकि । सकलांगीं मिळशि कधीं मन अधीर कीं ॥ ध्रु० ॥ तुजसाठिं वनोप-वनें हिंडलों फुका । सिंहीं कटि हरिणिं दृष्टि सर्पि वे-णिका ! कोकिळिं चंपाकुसुमीं शब्द नासिका ॥ (चाल) येत दिसुनि भुजलतांत । ऊरुहि कदली-वनांत । श्रांत दृष्टि करि पळांत । दर्शनें सुखी ॥ १ ॥ धुंडियलीं रम्य बहु सरें अनेक तीं । ओष्ठ विद्रुमांत कंठ शंखि दीसती । कमलिं नेत्र उदकिं चित्त शुद्ध जें अति ॥ (चाल) दुखती ऊरु भ्रमणीं । संवाहीं वरि बसुनी । अधरदानिं ने हरुनी । शुष्कता मुखीं ॥ २ ॥

चंद्रिका—(स्वत:शीं) हें मंजुळ गीत गाणारा तापसी कोण असावा बरें ? मध्यान्हकाळीं ईश्वर स्वत: अतिथिवेषानें येतो म्हणतात. तर याला भिक्षा घालण्याला उशीर करितां कामा नये. (जाऊं लागते.)

चकोर—छे छे ! मला साधी भिक्षा नको आहे !

(अभंग.)

नको मज पीठ आटा । दुःखें चूर मीच करंटा ॥ १ ॥
नको अन्न मज सुग्रास । भूक तूझी मम जीवास ॥ २ ॥
नको मज उदकपान । तुझ्या दर्शनाची तहान ॥ ३ ॥
झाली तव सौख्याची होळी । ऐकोनी मी वेई झोळी ॥ ४ ॥
घालीं हातिं प्रेमभिक्षा । कामना न दुजि यापेक्षां ॥ ५ ॥

चंद्रिका–(एकीकडे) आवाज ओळखीचा दिसतो. होय, तेंच तेंच हे! (मूर्छित होते; चकोर तिला सांवरतो. सावध होऊन) दूर व्हा ! या चांडाळणीला स्पर्श करूं नका ! नाहींतर तावडतोब गतप्राण व्हाल !

चकोर–(चंद्रिकेचा हात आपल्या हातीं ठेवून) संजीविनीच्या स्पर्शानें प्राण जाणार कीं रहाणार ? चंद्रिके, या हातावर मीं स्वतः बालपणीं रामनाम गोंदलें होतें, तुला आठवत आहे ना? तें अजून तसेंच आहे किंवा पुसट पुसट झालें आहे तें पहातों. (पाहून) हर हर ! श्रीरामाचा तुझ्या संनिध नेहमीं वास असतां तुझी आपदा टळली नाहीं ती नाहींच. पण तसें पाहिलें तर स्वतः रामाची तरी कुठें टळली ! सीताविरह व्हावयाचा तो झालाच ! तेव्हां भवितव्यता बलवत्तर हेंच खरें ! चंद्रिके, काय तुझी अवस्था झाली आहे ही !

चंद्रिका–माझें मेलें असो ! पण–

(झिंझोटी–त्रिवट)

दीन वेष दीनेकरितां घेतला वृथा हा । कां विडंबिलें इजसाठीं दिव्य अशा देहा ॥ ध्रु० ॥ स्कंधिं वसन भगवें राहे ती जिथें दुशाला । तिलक ज्या वसावा भालीं भस्मपुंड्र त्याला । कांठें ज्या असावी कंठी तेथ अक्षमाला । ग्रंथि झोळिची कारें जेथें ग्रंथ रहावा हा ! ॥ १ ॥

चकोर–चंद्रिके,

(सिंधकाफी–त्रिवट•)

जी तुझी असे ती माझी गति दुजी न वांछा । शुभ्र भाळ तव हें असतां तिलक सेवुं केंचा ॥ ध्रु० ॥ तूं व्रतस्थ असतां केवीं राहुं मी विलासीं। दुःखकूपिं पडलिस भोगूं काय सौख्यराशी । असुखिं तेविं सुखिं सेवावें त्वत्समागमाशी । ही असे मनीषा मनिंची ईश साक्ष तीचा ॥१॥

आपली लहानपणची प्रत्येक गोष्टींतली मैत्री तूं विसरलीस का ?

चंद्रिका–त्या सौख्याची आतां आठवण नको !

(मज गानिं करी व्याकुल०—या चालीवर)

गत सौख्य गमे स्वप्न मनोहारिसें । नच लाभ तया आठवुनी मानसें ॥ ध्रु० ॥ जयिं त्यामधुनी जागृत मी जाहलें । दुर्दैव तदा भूत पुढें हें दिसे ॥ १ ॥

आतां आपली भेटसुद्धां घेणें पाप आहे. कोणीं जर आपणांला पाहिलें तर दोघांवरही संकट यायचें. हं, सोडा माझा हात लवकर ! जाऊं द्या मला !

चकोर—चंद्रिके, इतकें कठोर भाषण तूं आजपर्यंत मला केलें नव्हतेंस. हां पहा मी तुझा हात सोडला. तो विवाहप्रसंगावांचून पुन्हां कधीं धरणार नाहीं, याला तुझ्याच गळ्याची शपथ !

चंद्रिका—कठोर बोलूं नको तर काय करूं ? कोणीं पाहिलें असतें तर काय म्हटलें असतें ?

चकोर—काय म्हणणार ? माझ्या वाग्दत्त वधूचें पाणिग्रहण करण्या-करितां मी आलों असेंच म्हटलें असतें कीं नाहीं ?

चंद्रिका—पाणिग्रहण म्हणजे पुनर्विवाहच ना ?

चकोर—पुनर्विवाह त्या थेरड्याचा झाला. त्याच्या आधींच माझा विवाह तुझ्याशीं तुझ्या मैत्रिणींनीं लाविला होता; हें तूं विसरली असशील, पण मी नाहीं विसरलों. त्यानंतर त्या थेरड्याशीं झालेलें लग्न मानवी कायद्याच्या दृष्टीनें जसें रद्द आहे, तसेंच तें ईश्वरी नियमाप्रमाणेंही आहे हें स्वतः ईश्वरानेंच त्याला तडकाफडकी दृष्टीआड करून दाखविलें आहे. असें जर आहे, तर माझी हक्काची स्त्री नेण्याला मी आलों असतां त्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची मगदूर आहे ?

चंद्रिका—न्यायाच्या दृष्टीनें केलेला हा विचार शास्त्राच्या आणि रूढीच्या दृष्टीनें कसासाच दिसेल.

चकोर—शास्त्राविषयीं म्हणशील तर त्याची पुनर्विवाहास पूर्ण अनुमति आहे. आपले विचारी पूर्वज बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें शास्त्राज्ञाही

बदलीत गेले आहेत. रूढीविषयीं म्हणशील तर ज्या रूढीस न्यायाचें आणि नीतीचें पाठबळ नाहीं ती पाळावी तरी काय म्हणून ? बंगाल्याकडे एकेका ब्राह्मणानें शंभर शंभर बायका करण्याची रूढि आहे. दक्षिणेंत एकेका बायकोनें एकाच वेळीं अनेक पति करण्याची रूढि आहे.गुजराथेकडे विवाहित स्त्रीनें गुरूकडे जाण्याची रूढि आहे. अजून पृथ्वीच्या पाठीवर असे देश आहेत कीं ज्यांत अजून नरमांस भक्षणाची चाल आहे. या रूढि हजारों वर्षांपासून चालत आल्या असल्या म्हणून त्या पवित्र झाल्या का ? त्यांना एकदम गचांडी देण्याला काय हरकत आहे ? या रूढींमुळें आजपर्यंत कमी नुकसान झालें आहे कीं काय ? म्हणून आम्ही आणखीं नुकसान होण्याची वाट पहावी ?

चंद्रिका—पण वाईट रूढि नाहींशी करून चांगली पाडणें शक्य तरी आहे का ?

चकोर—शक्य नसायला काय झालें ? सहगमनाची चाल सरकाराला कलमाच्या एका फटकाऱ्यासरशी बंद करितां आली कीं नाहीं ? शाईच्या थोडयाशा काजळाच्या खर्चानें लाखों विधवांच्या रक्षेस प्रतिबंध करितां आला कीं नाही ? हाच प्रकार चांगल्या रूढींचा. मी आज प्रथमच एखादी गोष्ट केली कीं तिला लहर म्हणतील, उद्यां तीच केली म्हणजे संवय म्हणतील, ती अनेकांनीं केली म्हणजे नवीन मार्ग म्हणतील आणि तीच अनेक पिढ्यांनीं केली म्हणजे झाली रूढि या नांवास पात्र !

चंद्रिका—एक पति मेल्यावर दुसरा केल्यानें पहिल्या लग्नाचे वेळीं देवब्राह्मणांस साक्षी ठेवून वधू पतीशीं एकनिष्ठपणें वागण्याची जी शपथ घेते तिची थट्टा केल्यासारखें नाहीं का होत ?

चकोर—त्या शपथेचा अर्थ कळून घेऊनें ती पाळण्याची जबाबदारी घेतली असती तर तुझें म्हणणें रास्त होतें. पण जिथें गीर्वाणभाषेतील त्या शपथेचा अर्थ खुद्द मंत्र पुटपुटणाऱ्या भटांसुद्धां कळण्याची मारामार तेथें

आठ वर्षांच्या अर्भकास तो काय समजणार? बरें, ती शपथ अनुल्लंघनीय आहे अशी कल्पना केली तरी ती पाळावयाची कोठवर? पतीच्या जन्मभर, किंवा विधवेच्या जन्मभर, कीं तिच्या जन्मोजन्मीं? पति जिवंत आहे तोंपर्यंत पत्नी त्याच्याशीं पतिव्रताधर्मानें वागली म्हणजे त्या शपथेची मर्यादा संपली. तो मेल्यावर ज्याप्रमाणें तिच्या केंसानीं त्याच्या स्वर्गप्राप्तीला अडथळा येत नाहीं, त्याप्रमाणें त्या शपथेनें तिच्या पुनर्लग्नास येत नाहीं. वधूप्रमाणें वर नाहीं का शपथ घेत? पण ती अशौचानंतर किती दिवस टिकते? पुष्कळ वेळां तर एकीकडे प्रथम पत्नीचें सरण रचीत असतात, आणि दुसरीकडे द्वितीय विवाहांतील होमाची तयारी चालली असते!

चंद्रिका–हे सगळे मनोराज्यांतील तरंग ठीक झाले! पण व्यवहाराकडे पाहिलें पाहिजे ना? मी हल्लीं दादांच्या घरीं आहें.

चकोर–मग त्यांत काय विशेष झालें?

(हे तरु कामीजन०–या चालीवर)

पथ हा नूतन नच कथिला। आजवरी किति पुण्यवंतिं तो प्रेमें अनुसरिला ॥ ध्रु० ॥ अर्जुन वांछि सुभद्रेला। गुप्तपणें तिज रथांत घालुनि नेई स्वपुराला ॥ १॥ श्रीहरि हरि भीमकबाळा। बांधवगण अवगणुनी तीचा दे संग्रामाळा ॥२॥ सेवुनि या सुखमार्गाला। कान्यकुब्जनृपदुहिता हरिली पृथुरायें विमला ॥ ३ ॥

चांद्रिका–शिवशिव! काय म्हणतां हें?

(अतिपापी मी चांडाळिण०–या चालीवर)

गुरुजनापवाद कसा घेउं मस्तकीं या। रीति हीच तद्उपकृतिविमुक्त काय व्हाया ॥ ध्रु० ॥ मातांपितरीं दिधला

जन्म या तनूतं । बंधु तिजासि पोषितसे दावुनि ममतेतं ।
तत्सत्ता तिजवरि जरि हृदय आपुलें तें । मति न होइ
उल्लंघन लव तिचें कराया ॥ १ ॥

अशानें ही परक्याचा हात धरून गेली असें नाहीं का लोक म्हणणार ?

चकोर—पुन्हां पुन्हां मला परका म्हणूं नकोस.

चंद्रिका—छे ग बाई ! दादाच्या संमतीवांचून मी कांहीं एक करणार नाहीं.

चकोर—तुझ्या दादाची संमति मिळेल तरच तूं विवाह करणार असें म्हणण्यापेक्षां असें कां नाहीं म्हणत, कीं आकाशकमलतंतूंनीं विणलेला अंतरपट धरून खडकावर पेरून निघालेल्या मंत्राक्षतांनीं वंध्यापुत्रांनीं लग्न लाविलें तरच लावीन ! तुझा दादा मला माहित नाहीं कीं काय ? इकडची पृथ्वी तिकडे होईल; पण तो या गोष्टीला कधीं कबूल होणार नाहीं. मुसळाला कधीं अंकुर फुटलेला पाहिला आहेस काय ?

विहार—(हरिहरशास्त्र्यासह प्रवेश करून)—चकोरा, असा चोरट्यासारखा माझ्या मागें येऊन माझ्या बहिणीपाशीं माझी निंदा चालविली आहेस का ? चंद्रिका आधीं स्त्रीजात; तशांतून एकटी, या दोन्ही गोष्टींचा फायदा घेऊन याप्रमाणें माझ्या पाठीमागें माझी नालस्ती करण्याला तुला लाज वाटायला पाहिजे होती. मध्यंतरीं तुजवर प्रामण्य करण्याचें घाटत होतें, पण तें तुझ्या बहिणीच्या बोलण्यास मान देऊन मीं आंतल्या आंत मिटवून टाकिलें. याबद्दल बक्षीस कसें योग्य दिलेंस ! मीं जर या घटकेस सरकारी शिपायांस बोलावून तुला त्यांच्या ताब्यांत दिलें तर मला नाहीं वाटत मला त्याबद्दल कोणी दोष देईल असें ! (चकोर खालीं मान घालून उभा राहतो.)

तरंगिणी—(प्रवेश करून) हा सारा वर्षाव माझ्या चकोरावरच चालला आहे का ? (चकोराजवळ जाऊन) बाळा चकोरा, काय ही तुझी स्थिति !

विहार–तुझा चकोर परदेशाहून आल्यावर आपले पोषाख, रीतरि-वाज सोडणार नाहीं; असें तुझें भाकित होतें ना ? तें खरें ठरलें अखेरीस ! वैराग्याच्या वेषापेक्षां आणखीं स्वदेशी पोषाख तो कोणता असावयाचा ?

मनोहर–(प्रवेश करून) मी सारखा चकोराच्या पाळतीवर असून सुद्धां तो केव्हांच मला नकळत निघून गेला तो बहुतकरून येथेंच असेल. कारण चकोर चंद्रिकेला सोडून दुसरीकडे कोठें असणार आहे ?

चकोर–(स्वतःशीं) आज माझ्या साऱ्या प्रियजनांदेखत माझी फजीती होणार असें दिसतें. वैऱ्यानें सुद्धां साधून येणार नाहीं असा दुष्ट योग आज आपोआप जमून येत आहे. या अपमानापेक्षां मरण पत्करिलें.

चंद्रिका– (मनांत) देवा ! काय यांचे हाल हे ! आणि हें सारें मजकरितां त्यांना सोसावें लागत आहे !

मनोहर–काय ! माझा चकोर! (त्यास आलिंगन देऊन) बाळा, असा प्रसंग आपणांवर कां ओढून आणिलास ?

(बाली उमरिया मोरा संयाने०–या चालीवर)

झाली तव दशा काय असे ही ॥ बळि पडसि अशा । कां उपहासा ॥ध्रु०॥ बालपर्णीची । सखि जीवाची । बहुकालें देखुं येसि धरुनि दुराशा ॥ १ ॥ बांधवसत्ता तिजवरि असतां । प्रेम करुनि संपादिसि कां गुरुदोषा ॥ २ ॥

हरिहर–मनोहरपंत, विश्वविद्यालयांतील पदवीदानसमारंभाचे वेळीं जो झगा अंगावर चढवितात तो घालून आपले बंधुराज बायको नेण्याकरितां तसेच इकडे आले आहेत ! आपण जसे आश्रमाकरितां झोळी घेऊन हिंडतां तसे हेही झोळी घेऊन येथें आले आहेत. मात्र आपणांप्रमाणें कनकाची नाहीं तर कांतेची याचना करण्याकरितां !

चंद्रिका–(एकीकडे) हा मेला काळसर्प शुद्ध विष ओकतो आहे !

मनोहर–(एकीकडे) या दुष्टाच्या बडबडण्याकडे लक्ष्य देऊन उपयोग नाहीं. (उघड) विहारा, चकोराची जी तूं इतकी निर्भर्त्सना केलीस ती अस्थानीं आहे.

(येजि वनवारि मुसे०–या चालीवर)

बध तव उचित न गुरुवया प्रलपसी । विसरसीच तरुण
पण मोहिं । स्वमतिवरुनि जग कां न ओळखिसि ॥धु०॥
बालजाति ऐसेंचि वर्तती । स्वच्छंदपणें स्वयें चेष्टती ।
नातरि योग्य न तदाख्या तिजसि ॥ १ ॥

विहार–मनोहरा, चकोर आतां लहान आहे का ?

हरिहर–अगदीं कुकुबाळ आहे, नाहींतर काय ? बाळ रांगत रांगत येथें आलें, आणि चंद्रिकाताईपाशीं खाऊ मागूं लागलें !

विहार–शास्त्रीबुवा, तुम्ही जरा गप रहा पाहूं !

मनोहर–आतां जरी चकोर वयानें लहान आहे, हूड आहे, तरी त्यानें या ठिकाणीं अशा वेषांत येऊन चंद्रिकेची व इतरांची अमर्यादा करावयाची नव्हती हें मी कबूल करितों. आणि त्याच्या वर्तनें तुम्हां सर्वांची त्याबद्दल क्षमा मागतों. त्या बिचाऱ्याला बोलायला तोंडच नाहीं.

विहार–मनोहरा, पहिल्यानें तोंडांत मारून मागाहून क्षमा मागत बसणें हा कोणत्या दुनियेंतला नम्रपणा ?

मनोहर–शिवाय त्याला येथें चोरून येण्याची जी बुद्धि झाली तिच्या दोषाचे अंशतः तुम्हीही वांटेकरी आहांत.

विहार–तें कसें काय बुवा ? ऐकूंद्या. म्हणजे कळेल तरी चकोराला हा उद्दामपणा करायला मीं कशी चिथावणी दिली ती !

मनोहर–चकोराचें आणि चंद्रिकेचें लहानपणापासून कसें प्रेम होतें हें तुला माहित आहेच. पांच सहा वर्षें परदेशांत घालवून चकोर स्वदेशीं

परत आल्यावर त्याला आपल्या बालपणच्या सोबतिणीला भेटण्याची साहजिक इच्छा होणार. आणि तुम्ही तर इकडे कड्याकुलुपें घालून जय्यत बंदोबस्त केलेला ! मग त्यानें असा वेष घ्यावा यांत नवल तें कोणतें ?

विहार–आतां हळूहळू तूं असेंही प्रतिपादन करायला लागशील कीं आम्हीं होऊन या दोघांचा पुनर्विवाह लावून टाकावा !

मनोहर–मला कांहीं गैर नाहीं दिसत यांत !

विहार–यांत गैर नाहीं तर कशांत गैर आहे ? आम्हांला या तुमच्या नवीन सुधारणा नकोत. माझी खात्री आहे कीं, आमची प्रत्येक जुनी गोष्ट इष्ट असून प्रत्येक नवी गोष्ट त्याज्य आहे.

मनोहर–मग बैलगाडीचा सोडून आगगाडीचा प्रवास कां करितां ? आणि सांडणीस्वार धाडण्याऐवजीं टपालाकडे कां धांव घेतां ? जो इतर सुधारणांचा प्रकार तोच पुनर्विवाहाचाही.

हरिहर–दादासाहेब, मी करितों यांचें समाधान. हें पहा, मनोहर-पंत, घरांतील कामकाज करण्याला प्रत्येक कुटुंबांत एक एक विधवा पाहिजे असते. या दृष्टीनें विचार केला तर आमच्यांत किती तरी कुटुंबें अशीं सांपडतील कीं, ज्यामध्यें विधवा नसल्यामुळें धुणें, पोतेरें घालणें, स्वैंपाक करणें वगैरे काबाडकष्ट घरांतील यजमाननीस करावे लागतात. पुनर्विवाह सुरू केला तर या अडचणी वाढतील कीं कमी होतील ?

मनोहर–काय राक्षसी विचार हा ! एका जोडप्यानें सुखांत लोळावें म्हणून एका विधवेनें जन्मभर रडत बसावें !

हरिहर–शिवाय विधवांना पुनर्विवाहाची आवश्यकताही वाटत नाहीं. त्यांच्या अंगीं जन्मतः जें सात्विक प्रेम असतें त्याचें समाधान आप्तांचीं व इष्टमित्रांचीं मुलें खेळविण्यानें पूर्णपणें होतें.

मनोहर–स्त्रियांचें समाधान येवढ्यावरच जर होतें तर विधवांकडून प्रत्यहीं जे गर्भपात व भ्रूणहत्यादि प्रकार घडून येतात ते घडले असते का ? शिवाय हा नियम स्त्रियांना जसा लागू करितां तसा पुरुषांना नको का करायला ?

विहार–केला पाहिजे, अवश्य केला पाहिजे. आणि माझी खात्री आहे कीं पुरुषसुद्धां द्वितीय संबंधाशिवाय शुद्ध वर्तनानें राहूं शकतील. मी स्वत: अशी प्रतिज्ञा करितों कीं मजवर दुर्दैवानें तसा प्रसंग आणिलाच तर मी राहिलेला सर्व जन्म संन्यस्तवृत्तीनें आणि परोपकारांत घालवीन.

मनोहर–विहारा, पहा बरें; आतां वादाच्या भरांत सहज बोलून जाशील आणि मग पस्तावशील.

विहार–आम्ही सुधारक नाहीं याप्रमाणें दिलेलें वचन मोडायला !

मनोहर–आजपर्यंत तुझ्यापेक्षां अनेकपटींनें सत्यप्रतिज्ञ पुरुषांकडून प्रतिज्ञांचा भंग झाला आहे. मग तुझा काय पाड? प्रत्यक्ष श्रीकृष्णानें सुदर्शनचक्र हातीं धरणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली होती; पण ती त्याला मोडावी लागली.

विहार–मीं जर आपलें वचन मोडलें तर त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून चकोराचा व चंद्रिकेचा विवाह करून देईन.

मनोहर–ईश्वर करो आणि तुला कसोटीला लावण्याचा प्रसंगही न येवो. कारण एक विवाह घडवून आणण्याची इच्छा करायाची म्हणजे प्रथम दुसऱ्या वैवाहिक सुखाचा अंत होण्याची इच्छा केली पाहिजे. आणि तें सुख तरी कोणाचें? तर प्रत्यक्ष माझ्या मेव्हण्याचें ! त्यापेक्षां माझा चकोर आजन्म अविवाहित राहील.

तरंगिणी–बरें पण चकोरा, हा वेष काढून टाकतोस ना ?

चकोर–हा काढून दुसरा कोणता चढवूं ?

तरंगिणी–हात्तिच्या ! तिकडचा घे म्हणजे झालें.

विहार–मी नाहीं घेणार आपले कपडे सुधारकाकडून विटाळवून ! (एकीकडे) आपल्या अंगचें तेज शास्त्रीबुवांना दाखविण्याला ही संधि बरी आहे.

तरंगिणी–म्हणजे ! माझ्या भावालाही नाहीं द्यायचे का कपडे ?

विहार–नाहीं, नाहीं ! तो येथें आला तसें त्यानें गेलें पाहिजे.

तरंगिणी–शिंप्याच्याकडचे आयते कपडे विकत आणविले पाहिजे तर ?

विहार–मी आपल्या घरांत कपडे बदलूं देणार नाही.

तरंगिणी–माझ्याकरितां तरी इतकें ऐकायचें होतेंच !

विहार–नाहीं नाही ! जपानांतून शिकून आलेल्या तरतरीत विद्वानांचे चार लोकांच्या नजरेस आणिले पाहिजेत. तुझें नेहमीं ऐकण्यासारखा मी बाईलबुद्ध्या नाही.

तरंगिणी–तर मग मीही जातें त्याच्याबरोबर ! त्याची फजीती ती माझीही फजीती आहेच.

विहार–उत्तम गोष्ट आहे ! आतांच्या आतां आपल्या गांवीं चालती हो. त्याशिवाय तुझा हेकेखोर स्वभाव नाहीसा व्हावयाचा नाहीं. परवांपासून पहातों आहे, माझ्या ज्या त्या कामांत तुझा मोडा ! माझ्या बैणपणाला हे शास्त्रीबुवा मनांतल्या मनांत हंसत असतील हें मला कळत नाहीं कीं काय ? हं, मनोहरपंत, करा तयारी आपल्या बहिणीला माहेरच्या गांवीं पोहोंचविण्याची.

हरिहर–(एकीकडे विहारास) शाबास, दादासाहेब, शाबास याला म्हणतात पौरुष !

तरंगिणी–हें काय ! मी थट्टेत बोलून गेलें तें खरेंच समजायचें झालें वाटतें ? आपण या पायांपासून मला ढकलून दिलें तरी मी जाणार नाहीं. माझा इथें रहाण्याचा हक्कच आहे.

विहार–हक्क बिक्क मी नाहीं जाणत ! बायकांच्या हक्कांना भीक घालणारा मी सुधारक नाहीं, समजलीस ?

हरिहर–(एकीकडे विहारास) वारे मर्दपणा ! आमचें गतवैभव परत येण्याची चिन्हें उघड दिसूं लागलीं.

तरंगिणी–आपली इच्छाच तशी असेल तर ती मला मान्य केलीच पाहिजे. मीही परवांपासून पहातें आहें कीं मी केव्हां मरेन आणि आपण माझ्या जाचांतून सुटाल असें आपणांला झालें आहे. चला बाबांनो, मोकळें करूं एकदांचें यांना आपल्या त्रासांतून! (एकीकडे) स्वारी जरी संतापून गेली आहे तरी मला घटकेच्या आंतच परत बोलावतील ही खात्री आहे. म्हणून आपण येथून जवळच असावें. (मनोहर, चकोर व तरंगिणी जातात.) (चंद्रिकाही जाते.)

विहार–(स्वतःशीं) अरे अरे! ही खरोखरच चालली कीं! मला वाटलें होतें, जरा नारसिंह अवतार आणिला कीं भिऊन जाईल.

हरिहर–आज मात्र आपला बाणेदारपणा दिसून आला! याला म्हणाव तेज! नाहींतर सुधारक लोक! नेहमीं आपल्या बायकांच्या मुठींत असतात.

विहार–शास्त्रीबुवा, मी अशा नेभळ्या लोकांपैकीं नाहीं समजलांत? मी जी आज्ञा करीन ती माझ्या बायकोनें निमूटपणें मानिलीच पाहिजे. पुन्हां तुम्हांला प्रत्यय पाहायचा असेल तर तिला परत फिरायला सांगतों. पहा लागलीच परतते कीं नाहीं तें. (जाऊं लागतो.)

हरिहर–इतकी तसदी घेण्याचें कांहीं कारण नाहीं. माझी खात्री झाली आपल्या खंबीरपणाबद्दल!

विहार–(स्वतःशीं) काय करावें! हा कावळा जवळ नसता तर मी तिला आतांचे आतां परतविली असती. (उघड) शास्त्रीबुवा, तिनें आपल्या चढेल वर्तनाबद्दल जर माझी क्षमा मागितली तर परत कां नये घेऊं?

हरिहर–पण माझी क्षमा माग असें म्हणत आपणच त्यांच्या मागें केविलवाण्या दृष्टीनें जाऊं नये असें माझें म्हणणें. नाहींतर दोघांपैकीं कोण क्षमा मागण्याला उत्सुक आहे हें चतुरस्र पुरुषांच्या तेव्हांच ध्यानांत यावयाचें! बाकी, त्या आपण होऊन आल्या तर त्यांना माफी देण्याला

आपण समर्थच आहां. (एकीकडे) चंद्रिकेला वश करण्याला मला जें एक मोठें विघ्न होतें तें आपोआपच दूर झालें. ही स्वारी मात्र मघांपासून सारखी चुळमुळ चुळमुळ करीत आहे ! पण आपणच तिला काढून दिल्यावर काय करितो !

विहार–(स्वतःशीं) हरहर ! गेली ती का परतण्याकरितां गेली ? मी हरिहरशास्त्र्याला ऐट दाखविण्याच्या भरांत तिला बोलून गेलों, आणि तीही पडत्या फळाची आज्ञा घेऊन चालती झाली ! तिनें स्वतःच्या जिवाला कांहीं भलतें सलतें करून घेतलें तर ? अशा करारी बायका तसेंही करायला चुकायाच्या नाहींत. पण बरोबर मनोहर आहे, त्यामुळें जरा धीर वाटतो. तो जरी सुधारक आहे तरी शहाणा आणि प्रसंगावधानी आहे. (थांबून) तें सगळें खरें ! पण मी आतां तिच्या विरहांत काळ कंठूं तरी कसा ? देवा ! आतां सर्वस्वी भार तुझ्यावर आहे !

(दिंडी)

निज प्राणांहुनि अधिक मानियेली ।
अकारण कांता आजि घालवीली ॥
अदय मत्सम तूं नससि दीनबंधो ।
रक्षिं तिज पुनरपि ती प्रियासि लाधो ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश ३ रा.

(चंद्रिका.)

चंद्रिका–(स्वतःशीं) देवा ! माझ्यासाठीं त्यांचे काय हाल हे !

(क्या दिलपे दाग देते०–या चालीवर)

अवमाना स्मरुनि त्यांचे मनिं शोक आवरेना ॥ ध्रु० ॥
थोरपणा सांडुनीयां । पतिवेषा घेतलें त्या । परि गेलें

सर्व वायां । झाली अतीव दैना ॥ १ ॥ प्रेमाच्या बद्ध पाशीं । नर होतां नीच दशी । बद्धहरीच्याहि शीर्षीं । बसताति काकसेना ॥ २ ॥ धैर्याचे अचल मेरु । शांतीचे गहन सिंधु । म्हणुनि मुळीं कोपबिंदु । दिसला तदाननीं ना ॥ ३ ॥

ज्यानीं त्यानीं नाहीं नाहीं ते शब्द बोलून त्यांना बोचून घेतलें.त्यांना नेसण्या-करितां फाटकें चिरगूटही कोणी देईना; आणि मी अभागी त्यांचा सगळा अपमान पहात उभी होतें ! हा पहा मेला त्यांचा छळ करणारा इकडे येत आहे.

हरिहरशास्त्री– (प्रवेश करून)-(स्वतःशीं) चकोराच्या फटफजी-तीची आठवण चंद्रिकेला ताजी आहे तोंपर्यंत तिचा उपयोग करून घेतला पाहिजे.या पोरीला वश करण्याला केशवपनाचे चांगले शस्त्र आपल्या हाता आहे त्याचा धाक दाखविला म्हणजे काम खात्रीनें वळेल. (उघड) कां ? चंद्रिकाताई, ठीक आहेना ! तुमची कळी आज मिटलेलीच आहेशी ?

चंद्रिका–आमच्यासारख्या बायकांना काय? प्रत्येक गोष्टीची चोरीच! कोणाशीं मन मोकळें करून बोलतां येत नाहीं. शेजारणीच्या घरीं जाऊं म्हटलें तर जातां येत नाहीं. घरकामाला हात लावावा म्हटलें तर तसेंही करितां येत नाहीं. मघांशी तुम्हांला देवपूजेकरितां पाणी देऊं लागलें, तर तेंही तुम्हीं घेतलें नाहीं ! देवालसुद्धां आमची सावली सहन होत नाहीं !

हरिहर–वहिनीसाहेब समोर होत्या म्हणून मला तसें करावें लागलें. नाहीं तर मनांतून मला तुमच्याबद्दल किती वाईट वाटतें म्हणून सांगूं ! तुमचें दुःख पाहून जीव सारखा तिळतिळ तुटतो ! तुमची करुण मूर्ति सारखी डोळ्यांसमोर खेळत असते, आणि रात्रीच्या रात्रीं झोंपेवांचून जातात !

चंद्रिका–(स्वतःशीं) काय मेला मानभाव पहा !

हरिहर–परवां एक मोठें संकट तुमच्यावर येणार होतें, पण मी मध्यें पडलों म्हणून तें तूर्त टळलें आहे.

चंद्रिका–मी नाहीं समजलें तुमचें बोलणें !

हरिहर–हें तुमचें मुख केंसांनीं कसें सुशोभित दिसतें ! तें विशोभित करण्याचा बेत दादासाहेबांचा चालला होता, पण मी ती गोष्ट पार उडवून टाकिली !

चंद्रिका–मला वहिनींनीं सांगितलें कीं तुमच्याच मनांतून तसें होतें. पण दादानें तें मनावर घेतलें नाहीं.

हरिहर–आमच्या वहिनीसाहेब नवऱ्याबद्दल मोठया पक्षपाती बुवा! बरें कसें कां असेना ! तुमच्यावरचा प्रसंग चुकला खरा ! तो चुकल्याबद्दलचें श्रेय माझ्याकडून गेलें तर त्यांत मला विषाद नाहीं.

चंद्रिका–तुम्ही असे माझ्या हिताला जपतां हे तुमचे मजवर खंडोगणती उपकार आहेत.

हरिहर–त्यांत कसचे उपकार म्हणा; तुम्हीं मानितां म्हणून उपकार ! तुमच्याबद्दल मला जी कळकळ वाटते तिचा एक मासला तुम्हांला सांगितला इतकेंच काय तें ! तसेंच मघांशी तो पोरगा जतीच्या वेषांत येऊन तुमच्याशीं दांडगाई करूं लागला तेव्हां असा राग आला होता म्हणन सांगूं ! क्षणभर तर त्याला हात धरून काढून द्यावेसें वाटलें.

चंद्रिका–त्यांनीं आज जो अतिप्रसंग केला तो केवळ प्रेमामुळें केला. यांत त्यांचा फारसा दोष वाटत नाहीं मला.

हरिहर–प्रेम प्रेम झालें म्हणून काय झालें ? आम्हांलाही तुमच्याबद्दल थोडें का प्रेम वाटतें? म्हणून आम्ही तुमच्या अंगाला झोंबूं लागलों तर तुम्हीच काय म्हणाल ?

चंद्रिका–म्हणून त्यांना इतकी का शिक्षा पाहिजे होती ? चुकून दुसऱ्याच्या शेतांत गेलेल्या मुक्या जनावराला वाटेल त्यानें मारावें आणि त्याला ओरडण्याचीही चोरीच, तसेंच आज त्यांना झालें असेल ! त्यांची योग्यता आज इतकी कमी झाली का कीं वाटेल त्यानें त्यांना टोंचावें ? चिरगुटालाही का ते महाग झाले ? (टिपें गाळते.)

हरिहर—मला भडभडून येतें हें पाहून ! (तिचे डोळे पुसूं लागतो; ती दूर होते.) मी तुमचीं टिपें पुशीत होतों, इतकेंच काय तें ! बरें तें असो. त्याच्या दांडगाईच्या मानानें त्याचा अपमान कदाचित् अधिक झाला असेल; नाहीं असें नाहीं. आतां यापुढें असा प्रसंगच येऊं नये अशी खबरदारी घेतली पाहिजे. त्याच्यावर बहिष्कार घालून त्याला लोकांतून उठविण्याचा आमचा संकल्प आहे. म्हणजे मग तो या घराकडे कसा फिरकतो तें पाहूं ! तो तुम्हांला आतां कायमचा अंतरला म्हणून समजा.

चंद्रिका—ते मला कधींच अंतरले आहेत !

हरिहर—त्याच्याबद्दल शोक करणें आतां सोडून द्या. त्याच्या जागीं आम्हीच आहोंत असें समजा. त्याला हृदयांत वागवून आम्हांला दूर कराल तर तुमच्यावर पुन्हां केशवपनाचा प्रसंग येईल. यांत समजा काय तें ! (एकीकडे) इतकी धमकी तूर्त पुरे आहे. (जातो.)

चंद्रिका—(स्वतःशीं) काय मेल्याचीं बोलणीं पहा ! याचा कावा मला पुरता कळून चुकला. पण दादाला सांगायला गेलें कीं याच्या एका बोलण्यांत सुद्धां हा सांपडण्यासारखा नाहीं. आमचा दादा काय !

(झिंझोटी—त्रिवट)

भोळा मनाचा । तो नाथ जणुं उमेचा ॥ ध्रु० ॥ सहज
ठेवि विश्वासातें । दूर करि अकारण त्यातें । संशया उगिच
धरि चित्तें । लहरि मानसाचा ॥ १ ॥

(जाते.)

प्रवेश ४ था.

(मनोहर, चकोर व तरंगिणी.)

मनोहर—चकोरा, तुझा अज्ञानपणाचा हूडपणा अजून गेला नाहीं. माझ्या मेहुण्याचें घर जवळ होतें म्हणून बरें ! नाहीं तर आज फजितीला

पारावार नव्हता. अरे, पण हें काय ? माझ्या मित्राचे कपडे तुझ्या अंगाला मुळींच येत नाहींत. हा पहा अंगरखा सैल व ओंगळ होतो आहे; आणि पगडी लहान झाली आहे. जोडा तर पिशवीप्रमाणें होत आहे. पण ज्याप्रमाणें विवाहाचा त्याचप्रमाणें वस्त्रांचा प्रकार असतो. वधूवरांचें वय, स्वभाव, मतें एकमेकांस अनुरूप नसतील तर तीं जशीं विजोड होतात त्याप्रमाणें वस्त्रें अंगावर बेतलेलीं नसतील तर तीं बेडौल दिसावयाचींच !

तरंगिणी—पण दादा, आमच्यामध्यें तर तसें कांहीं वैषम्य नाहीं ना? असें असून आज पाहिलास ना मजवर केवढा गहजब उडविला तो ? त्यांचा राग मनापासून नसेल या आशेनें मी जवळच राहून त्यांच्या निरोपाची किती तरी वाट पाहिली. पण व्यर्थ !

मनोहर—असें थोडेसें मधून मधून झालें नाहीं तर संसार मिळमिळित वाटतो.

(कारे अति त्वरा०—या चालिवर)

सुख न लाधतें प्रणय-कलह किरण-तिमिर मृदुल-परुष उष्ण-शीत जरि न नांदतें॥ध्रु०॥ निजविरोधि वस्तुवीण। योग्यता न ये दिसून। अंतरिं नच वसत लवण। मधुर तरि न गमत अन्न। प्रेम तवि तें ॥ १ ॥

तरंगिणी—तुझें आपलें जेव्हां तेव्हां असेंच ! कसाही प्रसंग येवो, त्याला पाठ देण्याची तुझी तयारीच असते ! मला आज खरें विचारशील तर प्राण ठेवावासा वाटत नाहीं.

मनोहर—असा जर आपण पदोपदीं प्राण देऊं लागलों तर आपणांला हजार प्राणही पुरणार नाहींत !

तरंगिणी—किंवा असें मनांत येतें कीं निदान त्यांच्यापासून दूर रहावें म्हणजे त्यांना आपण मेल्यासारखेंच आहोंत !

मनोहर—तशी तुझी इच्छा असली तर माझा आश्रम आहेच तयार !

चकोर—दादा, तुमची परवानगी असेल तर मी अशी एक युक्ति सांगतों कीं ताईची इच्छा पूर्ण होऊन चंद्रिकेचीही वैधव्यांतून सुटका व्हावी.

तरंगिणी—हो! मोठा परोपकारीच कीं नाहीं तूं! वन्संची सुटका म्हणजे स्वतःचें लग्न, असेंच कीं नाहीं? बरें कळूं दे ती युक्ति.

चकोर—ताईनें दादासाहेबांना एक पत्र लिहावें कीं मी तुम्हांला नकोशी झालें होतें, म्हणून तुमच्या इच्छेप्रमाणें मी प्राणत्याग केला. हें पत्र दादांनीं त्यांस नेऊन द्यावें.

मनोहर—आणि त्यांनीं मला इत्थंभूत वर्तमान विचारलें तर, खोटें रचून सांगायचें कीं काय? आणि तेंही इच्या वाइटाबद्दल? तें मजकडून प्राणांतींही होणार नाहीं. तरंगिणि, खोटेपणाचे परिणाम तुम्हांला माहीत नाहींत काय?

(आये हो संयाना०—या चालीवर)

निंद्य असे। वंचना। सत्याचि मूल असे नीतिलतेसी। उभयां दाही तीव्र विषें॥ वंचना०॥ध्रु०॥कारि अपाय त्या प्रेरित ज्यावरि। तेविं वंचकातें गृहभेद्यापरि। आत्म-नाश कीं कारि निमिषें॥ १॥

तरंगिणी—पण दादा,

(ओ डगरियां मैको०—या चालीवर)

ही प्रसंगीं मानिति शास्त्रें वंचना। मृत्यु टळत वा लग्न जुळत तरि नच अनुचित करितांना॥ वंचना॥ ध्रु०॥ प्रेमें या वागविलें शिशुपणिं। स्वयें लाड सगळे पुरवोनी। घडत लग्न नच पतिभगिनीशीं तत्प्राण तरी रहा-तीना॥ १॥

आणि हें सारें करायचें कशाकारितां?

मनोहर—मी सांगतों कशाकरितां तें; असें झालें म्हणजे विहारानें आपली प्रतिज्ञा पूर्ण करावी असा चकोर आग्रह धरणार.

तरंगिणी—शाबास! प्रेमाचें वेड लागलेल्या माणसाशिवाय अशी कल्पना सुचावयाची नाहीं. मात्र चकोराला जें वाटतें कीं त्यांच्यांकडून प्रतिज्ञा मोडणें होईल, तसें मला नाहीं वाटत. आजचें एक असो. पण एरव्हीं त्यांचें मजवर कितीतरी निर्मळ प्रेम आहे!

चकोर—पुरुष किती चंचल स्वभावाचे असतात याबद्दल तुझी खात्री होईल.

तरंगिणी—बरें बघूं. पण बाजारांत तुरी आणि भट भटणीला मारी, अशांतलाच आपला हा वाद आहे. अगोदर तें पत्र त्यांच्याकडे कोणीं घेऊन जायचें हें ठरूं द्या.

मनोहर—तें काम चकोरच चांगलें करील.

चकोर—पण मजवर त्यांचा विश्वास कसा बसावा?

मनोहर—लोकांचा आपणांवर विश्वास रहावा म्हणूनच कधीं खोटें भाषण किंवा वर्तन करूं नये. मी जर आज खोटेपणानें वागलों तर उद्यां मजवर कोण भरंवसा ठेवणार आहे?

चकोर—येवढें खरें कीं परकयांच्या कारस्थानांमुळें व स्वकीयांच्या खरेपणामुळें मी आणि चंद्रिका जन्मभर दुःखांत रहाणार!

तरंगिणी-दादा, तुझ्यावरच आतां सारें अडून राहिलें आहे.

मनोहर—माझा काय उपयोग होणार? मी जरी येथून विहाराला फसविण्याच्या उद्देशानें निघालों तरी तो उद्देश फसल्याशिवाय रहाणार नाहीं.

(तनत तन दरेना०—या चालीवर)

अनृतमय वचना वद कसें। वदे वदन मम ज्यांतुनि अजवरि जनिं नच, कधिं अणुभरि वच ये मिथ्या असें ॥ ध्रु० ॥ करहि हा कसा अकार्यकारि अजी होई। जया ठावी न कृति कधिं अनुचित असे ॥ १ ॥

तरंगिणी–दादा, अरे प्रयत्न करून पहा. साधलें तर बरेंच झालें, नाहीं तर ही काय गाजराची पुंगी ! वाजली तर ठीकच, नाहीं तर मोडून खाल्ली !

मनोहर–तुझी इच्छा आणि चकोराचा मजवर बोल राहूं नये म्हणून मी तूं देशील तें पत्र घेऊन जातों; पण या खोट्या कामांत यश मुळींच येणार नाहीं हें मी आधींच सांगून ठेवतों.

तरंगिणी–निदान कोणीं प्रश्न विचारल्याशिवाय आपण होऊनच बोभाटा करणार नाहींस असें तरी वचन देतोस का ?

मनोहर–कबूल ! मी होऊन कोणाला सांगणार नाहीं. कोणीं विचारलेंच तर मात्र सांगितल्याशिवाय रहाणार नाहीं.

तरंगिणी–तर मग मी आज संध्याकाळीं चकोराबरोबर आश्रमांत जाईन. तूं तिकडे जा. पहिल्यानें मला पत्र तयार करून ठेविलें पाहिजे. (जाते.)

मनोहर–(स्वतःशीं) आजवर इतके दुर्धर प्रसंग मजवर आले पण आजच्यासारखा प्रसंग कधीं आला नाहीं. देवा ! यांतून निभावून नेण्याला तूंच समर्थ आहेस ! (जातो.)

चकोर–(स्वतःशीं) आतां दादासाहेबांना ताईकडून असें दुसरें पत्र पाठविलें पाहिजे कीं दादांच्या खिशांत तुम्हांला सविस्तर मजकुराचें पत्र आढळून येईल त्यावरून सायंत मजकूर कळेल. कदाचित् दादा तुमच्या मनाला धक्का बसूं नये म्हणून लवकर कळविणार नाहींत, हें जाणून मुद्दाम लिहिलें आहे. या पत्रानें दादांना खोटें बोलण्याची पाळी कदाचित् येणार नाहीं. तरी पण ही वेळ एकंदरीनें आणीबाणीची खरीच. या ढोंगाचा परिणाम काय होतो तें कळेपर्यंत मनाची हुरहुर कांहीं केल्या रहाणार नाहीं. खोटया कर्माची शिक्षा तें करणारास लागलीच मिळते ती अशी ! पण मला अशी तळमळ तरी कां लागून रहावी ? कारण माझें साधन जरी निंद्य असलें तरी साध्य कांहीं तसें नाहीं. यानेंही माझें समाधान होत नाहीं. शेवटीं आमच्या दादांचा धोपट मार्गच बरा असें ठरतें खरें ! (जातो.)

प्रवेश ५ वा.

(हरिहरशास्त्री.)

हरिहर-(स्वतःशीं) मनोहराला मीं या डोळ्यांनीं पाहिला तेव्हां चूक होण्याचा कांहीं संभव नाहीं. तरंगिणीचा बेत बदलल्यामुळें बहुधा तीं दोघें मधूनच परतलीं असावीं. विहार आणि तरंगिणी हें जोडपें एकंदरींत फार प्रेमळ खरें! लग्नापासून आजपर्यंत त्यांचा कधीं वियोग झाला नाहीं असें म्हणतात. तेव्हां आजचा वियोग तिला असह्य झाला हें योग्यच आहे. मला याचें स्वप्न आधींपासून पडलें होतें, म्हणून बरें झालें. नाहीं तर मनोहराला मारण्याची ही सोन्यासारखी संधि वायां गेली असती. आतां तो तरंगिणीला बरोबर घेऊन इकडेच येईल, व तिला पोहोंचवून परत जाईल. त्या वेळीं त्याला ठरल्याप्रमाणें ठार करून येथून निघून जावें. आजच हें काम उरकलें म्हणजे माझा संशयही कोणास येणार नाहीं. कारण, मनोहर परगांवीं गेला हें माहित असतां मी येथें कशाला टपून बसेन? अरे, पण हें विघ्न कशाला मध्येंच?

भेंकडभट-(प्रवेश करून स्वतःशीं) ज्या गोष्टीचा मला मनापासून तिटकारा तीच गोष्ट नेहमीं माझ्या वांटयाला येते. तरंगिणीबाई आज एकाएकीं माहेरीं निघून गेल्या असें बाईसाहेबांना आतां त्यांच्या नोकराकडून कळलें. पण त्या कां गेल्या हें कळल्यावांचून कांहीं अडलें होतें? पण भेंकडभट मिळाला आहे नां फुकटचा. वाटेल तेव्हां इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धाडायला? मला जर एखाद्या पिशाचानें तोंडांत टाकिलें तर बाईसाहेबांचें थोडेंच कांहीं खर्च होणार आहे? भेंकड मेला तर त्याचा बाप दुसरा तयारच आहे! तो मेला तर त्याचा काका तिसरा! श्रीमंतांमध्यें वारसा नेहमीं वरून खालीं येतो. पण आम्हां नोकरांमध्यें तो खालून वर जातो; म्हणजे मुलाकडून बापाकडे, बापाकडून आजाकडे!

पण असा विचार करण्यांत वेळ घालवून काम थोडेंच चुकतें आहे ? बरें, हा दिवा जो बरोबर आणिला आहे तो तरी धड असायला पाहिजे होता ! सगळ्या मुलखाचा अंधुक ! याच्या काजळानें भोंवतालच्या अंधारांत भरच पडते आहे जशी ! या दिव्यानें आम्हांला पिशाच दिसून पडण्यापूर्वी आम्हींच त्याला दिसावयाचे !

हरिहर–(स्वतःशीं) याचा दिवा मालवून याला थोडेंसें भेवडाविलें कीं झालें काम ! (दिवा मालवून मांजरासारखा ओरडतो.)

भेंकड–अरे भूत रे भूत ! (खालीं बसतो.) दिवा मालवून कसें हुबेहुब मांजरासारखें ओरडलें ! आतां मी काय करूं ? ही धडकी तर मुळींच रहात नाहीं. त्या गडबडींत दिवाही खालीं पडला. आतां अंधारांत जाऊं तरी कसा ? आणि तें भूत जिन्यांतच दबा धरून बसलें असेल तर ? ओरडलों तर उद्यां बायकामुद्धां माझी थट्टा करतील. आतां जिवाचा धडा केलाच पाहिजे. डोळे मिटून चालावें म्हणजे झालें. (तसा चालतो.) बाईसाहेबांनी तरंगिणीबाईबद्दल विचारलें तर सांगावें झालें कीं, त्यांचा भाऊ मांजरानें ओरबाडल्यामुळें मेला असें त्यांच्या माहेरचें पत्र आल्यावरून त्या तांतडीनें निघून गेल्या ! (जातो.)

मनोहर–(प्रवेश करून) मी जसजसा विहाराच्या घराजवळ येऊं लागलों तसतसें माझ्या अंगाला कांपरें सुटूं लागलें आहे; जीभ कोरडी पडून पायांतली शक्ति गेल्यासारखी झाली आहे. खोटें काम करायचें नाहीं असा निश्चय असून केवळ त्याच्या संसर्गानें जर माझी अशी स्थिति झाली आहे, तर ज्यांचा चरितार्थ खोटया कामांवर चालावयाचा, त्यांना काय होत असेल ? रात्रंदिवस सर्पदंशाप्रमाणें वेदना होत असतील ! पण सर्पदंशानें शरीराला जशी अखेरीस बधिरता येते तशी त्यांच्याही मनाला येत असेल.

हरिहर–(स्वतःशीं) माझी शिकार आली एकदांची येथें ! अरे, पण हा एकटाच कसा ? कारण कांहीं का असेना ! हा एकटा आहे हें आपल्या

पथ्यावरच आहे. आतां दाखवावा याला हात! (मनोहर पडद्यांत जातो. त्याच्या मागोमाग जाऊन लागलीच परत येतो.) असा प्रहार दिला आहे डोक्यावर ठेवून कीं तावडतोब गतप्राणच झाला पाहिजे. (पडद्याकडे पहातो.)

भेंकड-(दिव्यासह प्रवेश करून)-(स्वतःशीं) आज माझा घातवार दिसत आहे! एका संकटांतून सुटतों न सुटतों तोंच बाईसाहेबांनीं खालीं काय पडलें हें पहाण्याकारितां पुन्हां धाडिलें आहे. (पाहून) अरे, हें काय! इथें प्रेत कोणाचें पडलें आहे?

हरिहर-(स्वतःशीं) अथवा तो मेला कीं नाहीं हें हात लावून पहावें म्हणजे संशय रहाणार नाहीं. अरे, पण ही ब्याद आली पुन्हां! तर आतां येथून पाय काढावा हाच उत्तम पक्ष! त्याच्या प्राणांबद्दलचा संशय फेडून घेण्याला इथेंच थांबलों तर माझे प्राण संशयांत पडावयाचे! (जातो.)

भेंकड-(स्वतःशीं) तें पहा भूत पळून गेलें याला मारून! आज त्याच्या मनांत कोणाला तरी बळी घ्यायचें होतेंसें दिसतें. माझ्यावरचें मरण याच्यावरच गेलें हें ठीकच झालें; फार चांगली गोष्ट झाली. अरे पण बिचारा विनाकारण प्राणाला मुकला ना! छेछे! मोठी वाईट गोष्ट झाली! पण मी वांचलोंना! अहाहा! माझा आनंद त्रिभुवनांत मावत नाहीं! पण हा मजबद्दल बळी पडावाना! हरहर! मला रडें आवरत नाहीं! (हुंदके देऊं लागतो.)

एक नोकर-(प्रवेश करून)-अहो भेंकडभट, वा:! जिकडे पाठविलें तिकडेच रमलांत वाटतें? बाईसाहेब अगदीं अधीर झाल्या आहेतना! (भेंकडभट बोटानें पडद्यांत दाखवितो. तें पाहून) काय प्रेत! हा काय घोटाळा आहे! भटजी, हें येथें काय पडलें आहे?

भेंकड-मला काय ठाऊकरे बाबा?

नोकर-बरें दिवा करिता का जरा इकडे?(दिवा जवळ नेऊन) काय ! मनोहरपंत? आणि यांना मारलें कुणीं ?

भेंकड-भुतानें !

नोकर-भटजी, मला जरा हात लावा. आपण यांना आंत घेऊन जाऊं.

भेंकड-मी नाहींरे बाबा हात लावायचा !

दुसरा नोकर-(प्रवेश करून)-अरे रावसाहेब आणि बाईसाहेब दोघेंही घाबरून गेलीं आहेत आणि तुम्हीं आपले स्वस्थच ना ?

पहिला नोकर-हे भेंकडभट मला हें उचलूं लागत नाहींत.

दुसरा नोकर-अरे कायरे बाबा हें !

पहिला नोकर-आधीं हें प्रेत आंत घेऊन जाऊं आणि मग सांगतों तुला. (दोघे जातात.)

भेंकड-मला म्हणे उचलूं लाग ! आणि त्या प्रेताला शिवतांच माझ्या अंगांत एखादें पिशाच शिरलें असतें तर ! याच्या बापाचें काय जात होतें ? आतां जलदी जाऊन हें सारें तिखटमीठ लावून आंत सांगितलें पाहिजे. (जातो.)

प्रवेश ६ वा.

(पलंगावर **मनोहर** मूर्च्छित होऊन पडला आहे. जवळ **आनंदराव** उभे व **सरस्वती** बसली आहे.)

आनंदराव-अरे, तोंडाकडे काय पहात उभे राहिलांत ? जारे, कोणी डाक्टराला घेऊन या. (एक नोकर जातो. स्वतःशीं) पण तरंगिणीला पोहोंचवायला हे तिच्या माहेरीं गेले काय आणि इतक्यांत परतले काय ? साराच चमत्कार! यांच्या खिशांत कांहीं कागद सांपडल्यास सुगावा लागेल. (खिसा चांचपून एक पत्र काढितो. तें वाचून) काय ! तरंगिणीनें जीव दिला ! काय मूर्ख बायका असतात पहा. या सटवीमुळें आतां मला कोण

यातायात पडणार आहे ! हें सारें प्रकरण दाबतां दाबतां माझी पुरेवाट होईल. जारे, विहारास लौकर इकडे बोलाविलें आहे म्हणून सांग. आणि तसाच आश्रमांत जाऊन चकोरालाही तोच निरोप सांग. (दुसरा नोकर जातो.) ही बिचारी मघांपासून कशी सारखी मनोहरपंतांच्याच खटपटींत आहे ! रोग्याची शुश्रूषा करावी अशी बायकांनींच ! तशांत मनोहरपंत म्हणजे तिचा आवडता गुरु ! हें पाहिलेंस का ? तरंगिणीनें म्हणे आत्म-हत्त्या केली !

सरस्वती–सुटल्या बिचाऱ्या या संसारांतून ! मोठ्या भाग्याच्या त्य (मनोहराच्या कपाळावर हात ठेवून) अहो, होतील ना हे पुन्हां पूर्वीसारखे चांगले ? अजून नाडी चांगली चालली आहे.

आनंदराव–चांगले व्हावे म्हणून मी सारखी देवाची प्रार्थना करीत आहें.

सरस्वती–अजून मेला डाक्टर येत नाहीं !

आनंदराव–त्यांना कसची घाई आली आहे ! फी पदरांत पडली म्हणजे झालें ! मग रोगी मरेना कां !

सरस्वती–इडापिडा टळो अमंगळ पळो !

विहार--(प्रवेश करून)–(एकीकडे) मी तिला कुठून जायला सांगि-तलें असें मला झालें आहे ! तिनें या शहरांतून निघतांना खांबांत टाकलेलें पत्र नुक्तेंच मला येऊन पोहोंचलें. त्यांत ती लिहिते कीं मी मनोहराबरोबर दुसरें एक पत्र देऊन लवकरच पाठविणार आहें; त्यावरून सर्व मजकूर ध्यानीं येईल. त्या पत्रांत काय मजकूर असेल बरें ? मला वाटलें होतें त्या प्रमाणें तिनें स्वतःच्या जिवाला कांहीं भलतें सलतें तर नाहींना करून घेतलें? ही शंका येऊन पाऊलच उचलत नाहीं. मनोहर इतक्या लवकर परत आला आणि आल्याबरोबर मूर्छित झाला यांवरून धडगत दिसत नाहीं काय नशीबीं असेल तें खरें.

आनंदराव-विहारा, मनुष्यानें विवेकाच्या बळानें मन आवरून धरिलें पाहिजे. या संसारांत असे प्रसंग यावयाचेच !

विहार-बाबा, पण झालें काय असें ?

आनंदराव-संकटीं जो डगमगत नाहीं तोच खरा ज्ञाता ! त्यावांचून सगळे मूर्ख !

विहार-बाबा, आतां माझा अंत पाहूं नका. माझ्या फुटक्या नशीबीं काय आहे तें मला अर्धे मुर्धे कळून चुकलें आहे. (आनंदरावांच्या हातांतील पत्र हिसकावून घेतो. वाचून) हरहर ! हें प्रियेचें अखेरचेंच पत्र तर ? तिनें जीव दिल्यावर हें मनोहराच्या हातीं लागलेलें दिसतें. अरेरे ! माझा अविचारच त्या विचारीला भोंवला ना ? मूर्खा विहारा ! मूर्तिमंत लक्ष्मी तुझ्या घरांत नांदत होती, ती तुला पाहवली नाहीं ना ? आतां काय उरलें आहे ? माझ्या संसाराचें मातेरें झालें, सुखाचा विध्वंस झाला, आनंदाची राखरांगोळी झाली ! आतां जन्मभर रडण्यापलीकडे काय उरलें आहे ?

(बालम मोरा०—या चालीवर)

जीव नकोसा । वाहुं कसा ॥ ध्रु० ॥ ग्रास मधुरसा । मृत्यु ने चोर जसा । पुन्हां सुख सहसा ॥ दावी कैसा ॥ १ ॥

आनंदराव-विहारा, असा शोक करून ती थोडीच परत येणार आहे? आपण कितीही रडलों, आक्रोश केला तरी घसा कोरडा पडण्यापलीकडे काय व्हायचें आहे ? याप्रमाणें आक्रांत चालू ठेविलास तर एकाबद्दल दोन प्राण मात्र जातील; कारण हें पहा, मनोहरपंत मघांपासून कसे निश्चेष्ट होऊन पडले आहेत !

विहार-खरेंच ! हे प्राणसंकटांत पडले असून मी मूर्ख यांच्याजवळ आपलेंच रडगाणें गातों आहें ! धिःकार असो मला !

आनंदराव-तुला इतका शोक होण्याचें कारण तुम्हां उभयतांमध्यें जें अत्यंत प्रेम होतें तेंच आहे. मनुष्यानें याप्रमाणें एकाच वस्तूवर आपलें सुखसर्वस्व कधीं अवलंबून ठेवूं नये. नाहींतर ती वस्तु नाहींशी होतांच त्याला सर्व संसार शून्य वाटूं लागतो. प्रत्येक वाईट गोष्ट ईश्वर आपल्या हिताकरितां धाडीत असतो हें जर खरें असेल तर आजच्या या हानीपासून तुझ्यासारख्या विचारी मनुष्याला एक धडा घेतां येईल. आजपासून आपलें चित्त संसाराच्या विविध अंगांकडे लावण्याचा निश्चय कर. असें केल्याने आत्यंतिक सुख जरी मिळालें नाहीं तरी आत्यंतिक दुःख मात्र खात्रीनें चुकतें.

विहार-बाबा, आपण मला हें चित्त अनेक विषयांकडे लावण्याचा उपदेश करितां हें ठीकच आहे; पण तें आतां मला अशक्य आहे.

(चलते दमका अब नाहीं०-या चालीवर)

यापुढती रुचि कांहिं तुरे या नीरस संसारीं । निर्जन अटवीसम मज भासे जगती ही सारी ॥ ध्रु० ॥ मानस-हंसी कोपुनि जातां । शून्य न होइल का हृत्कासारीं॥१॥ कितिक मनोरथ केले मिळुनी । होति वृथा या काळीं निर्धारीं ॥ २ ॥

(डाक्टर येतो.)

आनंदराव-डाक्टरसाहेब, आपणांला मुद्दाम घाईनें बोलावण्याचें कारण हें पहा. अर्धा घंटा झाला हे असेच बेशुद्ध होऊन पडले आहेत.

डाक्टर-यांना तापही बराच आला आहे. ठेंच लागून पडल्यासारखे दिसतात.

सरस्वती-डाक्टरसाहेब, बरे होतीलना हो हे? दिवसगत लागली तरी हरकत नाहीं. पण चांगले खडखडित बरे झाले पाहिजेत. पैसे वाटतील

तितके खर्च करण्याला आम्हीं तयार आहोंत. मी स्वतः दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून यांच्या पथ्यापाण्याचें करीन. यांना बरें मात्र करा.

डाक्टर–बाई, मनोहरपंतांबद्दल तुम्हांला वाटते तितकीच कळकळ मलाही वाटते.ते आम्हांस सोडून गेले तर आमच्यांतील एक अत्यंत सुशील व परोपकारी गृहस्थ गेल्यासारखें होईल. तुम्ही स्वस्थ असा. कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं. मी आपलें सर्व कौशल्य खर्च करून यांना बरें करीन.

सरस्वती–(एकीकडे) आतां माझ्या जिवांत जीव आला.जय कुळ-स्वामिनी ! यांना लवकर आराम पडूं दे. म्हणजे तुझी ओटी खणानारळांनीं भरीन !

चकोर–(प्रवेश करून)–(स्वतःशीं) दादांना जो हा अपघात झाला तो सारा माझ्या आपलपोटेपणाचा परिणाम ! त्यांनीं आज माझी भयंकर प्रसंगांतून मुक्तता केली तिजबद्दल मीं अधमानें त्यांस चांगलें बक्षीस दिलें! काय त्यांचें मजवरचें निःसीम प्रेम ! (मनोहराजवळ जाऊन) दादा ! दादा ! मी तुमचा चकोर आहें. माझ्याशीं बोला तरी दोन शब्द !

मनोहर–(सावध होऊन) कोण ? चकोर ?

डाक्टर–हं, मनोहरपंत, आतां एक शब्दही न बोलतां स्वस्थ पडून रहा ! नाहींतर ताप विकोपाला जाईल. (चकोर डाक्टरच्या कानाशीं कुजबुजतो.)

चकोर–(स्वतःशीं) डाक्टरच्या सांगण्यावरून कांहीं भिण्याचें कारण दिसत नाहींसें दिसतें. आतां बेशुद्धि जाऊन नुस्ता तापच राहिला आहे.

विहार–(उठून मनोहराजवळ येऊन) मनोहरा, तिनें मरणापूर्वी तुलाही कांहीं सांगितलें नाहीं ना ?

डाक्टर–त्यांच्याशीं कोणी बोलूं नका म्हणून सांगितलें ना ?

विहार–चकोरा, तिचें मुख तरी शेवटचें पहायला मिळेल का ? का तीही आशा राहिली नाहीं ? बोल,-बोल तुला कांहीं माहित असलें तर ?

चकोर–या प्रसंगानें तो प्रसंगही मागें पडल्यासारखा झाला आहे. एका दिवसांत ताई आणि दादा सोडून गेल्यावर मला वेडच लागेल. इकडेच

मला कसें बावरल्यासारखें झालें आहे. तरी पण मी तुम्हांला तूर्त इतकें सांगतों कीं ताईच्या माहेरच्या गांवाला निघाल्यानंतर दोन घटकांच्या आंत व पहिला मुक्काम गांठण्याचे पूर्वींच ताईनें विहीर पाहिली; आणि पंच-नाम्याच्या भीतीमुळें दादांनीं ताबडतोब दहन उरकून इकडे येण्याचें केलें हें त्यांच्या बरोबरच्या चाकरानें सांगितलें.

विहार–हाय ! हाय ! तिचें मुखदर्शनसुद्धां आतां होणें नाहीं ना ? तरंगिणि ! तरंगिणि ! मनोहरपंत, गेलीच ना ती याला सोडून ?

मनोहर–तरंगिणी स्वस्थ आणि खुशाल आहे.

विहार–हो स्वस्थच नाहींतर काय ! मरणाच्या भयांतून कायमची मुक्त झाली बिचारी !

मनोहर–तिच्याबद्दल कांहीं काळजी करूं नका ती सुखरूप आहे.

आनंदराव–हें पहा यांचें मस्तक तापानें भ्रमण करूं लागलें.

मनोहर–माझें मस्तक नाहीं, तर तुमचें मस्तक भ्रमण करीत आहे. मी सांगतों त्यावर पूर्ण विश्वास ठेवा. न ठेवाल तर मागाहून पश्चात्ताप होईल.पुन्हां मला याबद्दल बोलण्याची संधि येणार नाहीं;माझ्या खोटेपणाला देवानें चांगलें शासन केलें.

आनंदराव–अरे अरे ! फारच बहकला !

डाक्टर–यांना आतां मुळींच त्रास देऊं नका. आणि यांच्या वहिणी-च्यां मरणाचा विषय तर हे पुन्हां पूर्णपणें बरे होत तोंपर्यंत यांच्या देखत काढूं नका. त्या मरणाचा यांच्या मनाला चांगलाच धक्का बसला आहे. मी म्हणतों हें जर कबूल करीत असाल तरच मी औषध सुरू करितों.

विहार–मी शपथ घेता त्याबद्दल. दोन वेळां मी यांना *प्रश्न विचारिले ते केवळ शोकावेगामुळें.

डाक्टर–ठीक आहे तर. मी घरून औषध तयार करून पाठवून देतों, तें सुरू करायचें. पंधरा वीस दिवसांत हे पुन्हां पूर्ववत् होतील.

सरस्वती–पथ्यापथ्याचें कसें काय ?

डाक्टर–पथ्य यांच्या बहिणीच्या मरणाच्या विषयाचें ! (जातो. पडदा पडतो. विहार व चकोर बाहेर येतात.)

विहार–चकोरा, आज मी जी अपशकुनी प्रतिज्ञा करून चुकलों, तीच मला बाधली शेवटीं.

चकोर–जाऊं द्या तिचा विचार ! थट्टेंत केलेली प्रतिज्ञा काय मनावर घ्यायची आहे ?

विहार–थट्टेंत ! चकोरा, तूं उदारपणानें मला प्रतिज्ञेंतून मोकळा करूं पहात आहेस. पण माझा निश्चय ठरला कीं माझी अर्धांगी गेल्यामुळें निष्प्रभ झालेला हा देह परोपकारांत झिजवून आमरण संन्यस्तवृत्तीनें रहावयाचें. विधवा जशा केशवपानानें तोंड विद्रूप करून घेतात तसें–

चकोर–तसें म्हणजे ? मुंडन करणार कीं काय ?

विहार–तसें करण्याला मी तूर्त मोकळा नाहीं. परंतु त्याऐवजीं वैराग्याप्रमाणें केंस वाढवून हें काळें तोंड विद्रूप करून टाकणार. सारांश काय, कीं माझी प्रिया माझ्या मरणानंतर ज्या व्रतानें राहिली असती, त्या व्रतानें वागून मी यापुढें कालक्षेप करणार ! (जातो.)

चकोर–(स्वतःशी) दादांनीं ताईच्या कुशलाबद्दल सांगितलें तेव्हां वाटलें कीं आतां आमचें कपटनाटक उघडकीला येणार ! पण पुढें सगळें बिनबोभाट पार पडलें, आतां दादांच्या शुश्रूषेला लागून माझ्या मूर्खपणामुळें उद्भवलेला रोग घालविण्याच्या मार्गाला लागलें पाहिजे.

(साकी)

अदूरदृष्टि स्वार्थवृत्ति मम सुज्ञ उदारहि बंधु ।
नेइ कालमुखिं अन्य मिळेना ऐसा जातां शोधूं ॥
देहा झिजवुनियां । ओढिन मृत्युमुखांतुनि त्या ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक चवथा.

प्रवेश १ ला.

(हरिहरशास्त्री.)

हरिहर-(स्वतःशीं) एकेकाच्या दैवाचा काय जोर असतो पहा ! मनोहराला स्वर्गी पाठवावें म्हणून त्याचा कपाळमोक्ष करण्याचा मीं प्रयत्न केला. पण त्याच्या कपाळीची रेषा घड असल्यामुळे तो या भूलोकींच स्वर्गसुख अनुभवितो आहे. त्याचे नशीब शिकंदर म्हणून त्याच्याकरितां असंभाव्य गोष्टीही घडून आल्या ! मत्सरग्रस्त मनुष्याच्या हातचा सपाटा, पण काळोखामुळें त्याला तो नीट बसला नाहीं. बरें, खात्री करून घेण्याकरितां दुसरा तडाखा लगावावा तों तो सगळ्या मुलखाचा भित्रा भेकडभट, कीं जो साऱ्या जन्मांत दोनचार वेळांच अंधारांत गेला असेल, तो तेथें दत्त येऊन उभा राहिला. लागलीच मनोहराला आंत नेऊन त्याची नीट व्यवस्था लावण्यांत आली. आणि या घटकेला तर त्याच्यासारखा सुखी तोच ! गुडघ्यायेवढा बिछाना लोळायला आणि अप्सरेसारखी स्त्री शुश्रूषा करावयाला ! औषधाच्या घुटक्याबद्दल त्याला एखादे वेळीं चुकून अधरपानच मिळत असल्यास नवल नाहीं. रात्रंदिवस असें सौंदर्य जवळ असल्यावर मनोहराचें तत्त्वज्ञान जागचे जागींच विरघळून गेलें असलें पाहिजे. पूर्वी तरी तो बोले तसा निर्लेप होता कीं नाहीं कुणास ठाऊक ? तुर्कस्थानच्या बादशहाप्रमाणें शंभरापेक्षांही अधिक स्त्रियांचा जनानखाना तयार करणारी ही स्वारी शुक्राचार्याचा अवतार असणें मुळींच संभवत नाहीं. मला सरस्वतीपासून दूर करण्याची कल्पना त्याला निवळ परोपकारबुद्धीनें सुचली नाहीं खास. आणि हल्लीं तर प्रत्येक गोष्टीची अनुकूलता ! मला तर निःसंशय वाटतें कीं त्या दोघांचें मेतकूट या पूर्वी जमले असेल, किंवा लवकरच जमेल. हें मेतकूट सरस्वतीच्या नवऱ्याला प्रत्यक्ष चाखायला मिळेल

तर काय बहार होणार आहे! म्हणजे मनोहरानें जसा आपल्या प्राणसंकटाचा उपयोग करून घेतला तसा मींही आपल्या दुर्दैवाचा उपयोग करून घेतल्यासारखें होईल. पण हें घडावें कसें? मला तर आनंदरावांच्या घरीं जाण्याला मज्जाव. तेव्हां एक तर त्याला घराबाहेर कुठें तरी एकीकडे गांठलें पाहिजे, किंवा घरांत मालकीण नाहीं असें पाहून व चाकरलोकांची मूठ दाबून आपला लाग साधला पाहिजे. या गोष्टीला थोडासा विलंब लागला तरी पुरवला; पण काम मात्र हटकून झालें पाहिजे.

(जातो.)

प्रवेश २ रा.

(मनोहर व सरस्वती.)

मनोहर–सरस्वति, काय म्हणतेस मी पंधरा दिवस सारखा निश्चेष्ट पडलों होतों?

सरस्वती–आतां आपण पुरतेपणीं बरे झालां आहांत, म्हणूनच मीं हें आपणांला सांगितलें.

मनोहर–मला ताप चढल्यावर मी जो बेशुद्ध झालों त्यानंतरचा आणि सावध होण्याच्या पूर्वीचा काळ मला सुखमय निद्रेप्रमाणेंच वाटला. मरण आणि पुनर्जन्म यांचा हा मला एक अनुभवच मिळाला म्हणावयाचा!

(मोहनीकी लागे राम०–या चालीवर)

मम रोगमुक्ति नव जे। पुनर्जन्मशी साजे ॥ध्रु०॥ मूर्छोन्मुक्त पुरुष परिचित जनसमूहिं निजसंज्ञा। पुनरपि मिळविति म्हणुनी तत्स्मृति प्रिय वाटे त्यांना ॥ १ ॥ जनमांतारिं जरि लाधे स्मृति ती पूर्वीची पुरुषा। शून्य गणुनि जग मग तो होता सिद्ध आत्मनाशा ॥ २ ॥

सरस्वती–आपणांला वाटतें कीं पुनर्जन्म अगदीं परक्या लोकांत घडून येतो तसें मला नाहीं वाटत. मरतांना आपली जी वासना असते तिजप्रमाणें दुसरा जन्म मिळतो म्हणतात. आतां मरणकाळची वासना प्रियजनांस सोडून थोडीच असणार आहे ? म्हणून जन्मांतरीं आपल्या भोंवतालची मंडळी पूर्वपरिचयाचीच पण भिन्नदेहधारी असली पाहिजे.

(नैना लगाये मोरे०–या चालीवर)

जिथें परमरुचि । दिसेल हृदयींचे । गतजन्मींची । ओळखची ॥ धु० ॥ अतुल्याविषयीं सप्रेमादर मनिंचा अपरंपार । पाहुनि वाटे जननांतरिंचा यासि असे आधार ॥ धारि आत्मा स्मृति जन्मांतरिं कर्मादिंची ॥ १॥

चकोराचा आणि चंद्रिकेचा असाच जन्मांतरींचा निकट संबंध असून तो मेला निमित्तालामात्र पति झालेला म्हातारा त्यांचा त्या जन्मींचा वैरी असावा. तोच प्रकार विहार आणि तरंगिणी यांचा.

मनोहर–खरंच, विहार हल्लीं कुठें आहे ?

सरस्वती–हल्लीं तरंगिणीच्या मरणामुळें ते अगदीं विरक्त होऊन गेले आहेत. उरलेलें आयुष्य परोपकारांत वेंचायचें असा त्यांचा निश्चय झाला असून त्याप्रमाणें त्यांनीं शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांना शिकविण्याचें सुरू केलें आहे.

मनोहर–(हंसून) हें त्याचें केवळ स्मशानवैराग्य आहे. त्याचा स्वभाव फार प्रेमळ आणि उतावळा आहे. त्यामुळें तो लवकरच कोणत्या तरी तरुणीच्या मोहांत पडल्यावांचून रहाणार नाहीं.

सरस्वती–विधुर प्रेमळ असला म्हणजे तो स्त्रियांच्या सहवासांत आपला निर्धार सोडून चंचळ झालाच पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं. आपलें स्वतःचेंच पहाना ! आपणांला आश्रमांत नेहमीं स्त्रियांचाच सहवास. असें असतांना आपलें व्रत चालूच आहे कीं नाहीं ? आपण आश्रम सोडून

इकडे जरी आलांत तरी माझी कटकट आपल्याभोंवतीं असतेच. आप-ल्या आजारांत तर चकोर आणि मी आपल्याजवळ सारखे बसून होतों.

मनोहर—खरेंच सरस्वति, मी तुझा कसा उतराई होऊं, सांग बरें?

(तुजे मालरानी०—या चालीवर)

खरी जन्मदात्री । झालीस धात्री॥ केलीस सेवा स्वयेंची सुगात्री॥ध्रु०॥दिधलेंसि असुदान । स्वप्राण अवगणुन । देवी असासि कीं न मम अधिष्ठात्री॥१॥असती तव अपार। मजवरति उपकार । फेडूं शकें ते न इह वा परत्रीं ॥२॥

सरस्वती—येवढयाकरितां कांहीं मीं हा विषय काढिला नाहीं. शिवाय मी आपली सेवा करीत होतें ती केवळ मनाच्या उल्लासानें आणि हौसेनें.

मनोहर—तरी पण जाग्रणानें आणि चिंतेनें तुझी काय स्थिति झाली आहे ही !

(दिंडी)

नयन गेले खोल हे काळजीनें । तयांभोंवति परिवेष कृष्ण वर्णे ॥ दिसति पांडुर जागरें गाल हेही । तयांवर-ची रक्तिमा नेत्रिं येई ॥ १ ॥

पुष्कळदां आजारांत रोगी आणि त्याची शुश्रूषा करणारा यांच्या व्यापां-राची अदलाबदल होते. म्हणजे शुश्रूषा करणारा श्रमामुळें रोगी बनतो आणि रोगी त्याची सेवा करूं लागतो. एकापासून मृत्यु जितका दूर जातो तितकाच तो दुसऱ्याच्या जवळ येतो.

सरस्वती—(एकीकडे) इतकें माझें भाग्य कुठचें !

मनोहर—सरस्वति, तूं मला आईप्रमाणें प्राणदान दिलेंस, मुलीप्रमाणें माझी सेवा केलीस, आणि बहिणीप्रमाणें मला प्रेमानें वागविलेंस याबद्दल मी तुला काय देऊं ? देह अर्पण केला तरी कमीच होणार आहे !

सरस्वती—(एकीकडे) आतां धीर करावाच. (उघड) ही तीन नातीं सोडून उरलेलें जवळचें नातें आपणांशीं ठेवण्याची मला मोकळी-

क असावी आणि आपला देह अर्पण करण्याऐवजीं माझ्या देहाचा स्वीकार करावा. आपणांला मला बक्षीस द्यायचेंच असेल तर हें द्यावें.

मनोहर–काय म्हणतेस ?

सरस्वती–यापेक्षां उघड करून काय सांगूं ?

(कैसे कटेरि सजनी०–या चालीवर)

तनु ही स्वीकरुनी । चरणनिहित, प्रणयें भरली हृदय-रमण मम धन्य करा मज सकल युवतिजानें ॥ ध्रु० ॥ व्याकुल शरिं करि भारी स्मर हा । रक्षा मजसी त्यासि निवारुनि ॥ १ ॥

मनोहर–काय ? तुझ्या पतीचा अधिकार बळकावूं ? सरस्वति, हीच का तूं माझ्या मनाची परीक्षा केलीस? तुला पत्नीधर्माची ओळख करून देण्याकरितां मला ठेविलें आहे हें तूं विसरतेस.

सरस्वती–आपण माझ्याशीं पतिधर्मानें वागावें म्हणजे मला पत्नीधर्म निराळा शिकवायला नको.

मनोहर–शिवशिव ! सरस्वति, एकदां बोललीस तें बोललीस. पण,

(मोरे नै लगन०–या चालीवर)

वचना पुन्हां न वद या । अचुल्या मधुरशा शरीरा न मळावें मलिन मतीलि अवसर मनिं देउन॥ध्रु०॥पावित्र्य-शून्यें सतत अंतरंगें । विमल देह भासे खचित मलिन ॥ १ ॥

सरस्वती–महाराज, यांत अधर्म कसचा ? चकोराचा चंद्रिकेशीं विवाह झाला तर तो दुराचरणाखालीं येईल का ?

मनोहर–तिचा पति गत झाला आहे.

सरस्वती–मी भीड सोडून बोलतें, याची क्षमा असावी. पण माझे पतिही मला तसेच झाले नाहींत का ? फार काय सांगूं ? पण त्यापलीकडेही शोचनीय माझी स्थिति झाली आहे !

(काहेको दिनि संया०—या चालीवर)

दोहिकडुनि मज जाच करी ही कांचाणि मेली ॥ ध्रु० ॥
प्रेमलव पतीविषयीं नसतां तत्सेवा ये भालीं॥१॥अपुल्या
पायीं मन वाहियलें दर्शवे न कधिं कालीं ॥ २ ॥

मनोहर—आपल्या स्थितीचा विचार नेहमीं आपणांहून हीन स्थितीशीं तुलना करूनच माणसानें करीत जावा.

(आन परी दरबार०—या चालीवर)

हृदयिं करीं सुविचार । ऐसा ॥ ध्रु० ॥ तव नाथाच्या
सम दुर्मिळ जगिं । स्त्रीप्रेमा अविकार ॥ १ ॥ किति
साध्वींसी तत्पति छळिती । कटुवचनीं अनिवार ॥ २ ॥

सरस्वती—खाटकाच्या गाईपेक्षां मी सुखी आहें खरी !

मनोहर—शिवाय जों जों सुख कमी तों तों त्याच्या नाशाची भीतिही कमीच. पर्वतशिखरीं उभा राहिलेल्यास सभोंवतालच्या रम्य देखाव्याचें दृष्टिसुख अधिक तर खालीं पडण्याची भीतिही फार. दुःखाची आणि सुखाची गोळाबेरीज नेहमीं एक असते. संसारसुख मिळत असलेल्य स्त्रीचा पति आजारी पडून जीवितसंशयांत असला म्हणजे तिला किती काळजी लागून रहात असेल बरें ?

सरस्वती—याचा मला गेल्या पंधरवड्यांत पुरताच अनुभव आला. पण महाराज, अशा स्त्रीचा प्रेमळ पति दुर्दैवानें गत जरी झाला तरी त्याच्या सुखकर सहवासाची आठवणसुद्धां मजसारख्या अभागिणीच्या विवाह-सुखापेक्षां शतपट बरी !

मनोहर—असें म्हणूं नकोस ! आनंदराव आपल्या अर्धांगीच्या अगदीं अर्ध्या वचनांत असतात कीं नाहीं ?

सरस्वती-महाराज, मला आपण त्यांची अर्धांगी थट्टेंतसुद्धां म्हणूं नये अशी विनंति आहे.

मनोहर-इतका तिटकारा येण्याचें कारण ?

सरस्वती-आपण सर्व जाणत असून माझ्या तोंडून वदविण्यांत काय अर्थ ? पण आपली तशी इच्छाच असेल तर ऐका. त्यांनीं माझ्यासारख्या अल्पवयस्क मुलीबरोबर तिच्या इच्छेविरुद्ध लग्न केलें, आणि तिच्या सुखाचें मातेरें केलें हाच त्यांचा सर्वांत मोठा अपराध. वयांमध्यें इतकें अंतर असल्यामुळें साहजिकच त्यांच्या आणि माझ्या मतांत, विचारांत, आचारांत, हेतूंत पदोपदीं अंतर दिसून येऊं लागलें. परंतु हें त्यांना फार उशीरानें कळलें. त्यानंतर मला आपल्या कलाप्रमाणें वागविण्याऐवजीं तेच माझ्या कलाप्रमाणें चालूं लागले; आणि मला भारदस्त करण्याऐवजीं स्वतःच बालिश बनले. मी पैठणीचा हट्ट धरिला कीं त्यांनीं ती आणविलीच. मौक्तिकहार हा शब्द माझ्या कंठांतून निघतो न निघतो तोंच तो पदार्थ माझ्या कंठांत पडला म्हणून समजावा.

मनोहर-हे तर सारें प्रेमाचें दर्शक आहे. यावरून तुझी कृतज्ञता आणि प्रीति जागृत व्हावयास पाहिजे होती.

सरस्वती-यामुळें माझा द्वेष मात्र वाढला. त्यांनीं जर माझा शब्द याप्रमाण झेलला नसता तर त्यांचा तिटकारा करण्याचें समाधान तरी मला मिळालें असतें. पण त्यांनीं माझी प्रत्येक हौस पुरवून मला तेंही समाधान ठेविलें नाहीं.

मनोहर-वाः ! काय ही विचारांची संगति ! तुला तिटकारा येण्याला त्यांनीं जागा ठेविली नाहीं म्हणून तुला त्यांचा तिटकारा येतो ?

सरस्वती-आमचा जोडा जसा विजोड तसेच माझे विचारही विसंगत असल्यास नवल काय ? कडू बीजापासून कडूच फळें निघावयाचीं. महाराज, आपण जर माझ्या दृष्टीस पडलां नसतां तर मी माझ्या दुःखि-

तींतही सुख मानून काळ कसाबसा कंठिला असता; पण आपली मनोहर मूर्ति, उदार मन आणि प्रेमळ स्वभाव हीं जेव्हां माझ्या नजरेस आलीं तेव्हां अशा पुरुषाबरोबर माझें आयुष्य किती सुखांत गेलें असतें, हा विचार घेऊन मला माझ्या पतींचा फारच राग आला. आपण विधुरावस्थेंत आहांत हें पाहून तर त्या रागाला फार भरती आली.

(सखेरी का करुना०–या चालीवर)

बघें मी जइं मधुर मूर्ति ही । वृत्ति सकल तन्मय होऊनी जाति चरणिं आकर्षुनि नच उरतिं त्हदयिं ॥ ध्रु०॥ होय असह्य विवाहपाश मज । गमत फार कटु तुटुं सजे दृढहि ॥ १ ॥

मनोहर–बरें, या थराला गोष्टी येत तोंपर्यंत तुला माझ्या सहवासांत काळ घालवायला सांपडला याला कारण कोण ?

सरस्वती–याला कारण त्यांचा भोळसरपणा !

मनोहर–भोळसरपणा नव्हे तर त्यांचा आपणा उभयतांवरील विश्वास त्यांनीं जो हा आपणांवर विश्वास ठेविला तो आपण विश्वासघात करावा. म्हणून कीं काय ? त्यांनीं आपलें अर्धांगीरूप उत्तमांग माझ्या अंकावर ठेविलें असून मी जर तें त्यांच्यापासून वेगळें करीन तर तें पातक कुठें फेडूं ?

सरस्वती-आपण दृष्टांतांत अर्धांगीला अंकावर घेण्याचें म्हटलेंत तसें खरोखरीच घेऊन मग मला दूर केलें तर मला नाहीं इतकें वाईट वाटणार. पण महाराज, येवढा तरी मजवर अनुग्रह कराच ! आपण मघांशीं म्हणालांत त्याप्रमाणें खरोखरच आपला ताप नाहींसा होऊन तो मजमध्यें संचारला आहे. तर तो आपल्या हिमतुल्य आलिंगनानें नाहींसा करा. मी आपला ताप बरा होण्याचे कामीं उपयोगीं पडलें हें जर खरें असेल तर माझा संताप नाहीं का आपण नाहींसा करणार ?

(मैतो संयाकी प्यारी दुलारी०—या चालीवर)

मानें शंकुं नका सेवुंया यौवना पूर्णबिंबा। प्रिया। करुनि न विलंबा। हा न अवसर पुनरपि निजकरगत होइल चिर। प्राप्त सुसमय थोर सुखमय साधुं संधि ही स्वर्णसंनिभा ॥ध्रु०॥ दाह होई फार देहीं मुळिं धरवेना धीर। दीनपरिपालन तुमचें व्रत राखावें नरवीर॥ बुडें मी नीरिं मला परतीरिं पोंचवा द्या मज निर्धारीं। करालंबा ॥ १ ॥

मनोहर—(एकीकडे) अरेरे ! ही अगदींच अनावर झाली !

सरस्वती—महाराज, आपली जी चोहोंकडे कीर्ति आहे ती खरी करून दाखवा.

(सावरिया मन भायोरे०—या चालीवर)

तुम्ही अनाथांचे कैवारी॥ ध्रु०॥ स्त्रिया आजवरि रक्षियल्या किति। एकचि का भारी ॥१॥ मजसम करुणापात्र मिळेना। जगतिं दुजी नारी ॥ २ ॥

मनोहर—सरस्वति, हल्लीं रात्रीचा अंमल आहे. ज्याप्रमाणें जगतावर त्याप्रमाणें मनुष्याच्या मनावरही ती अंधकार पसरते.

(प्रबल दल साज०—या चालीवर)

तिमिरमय होय रजनी करी कालिं या॥ कृष्णमति हृदयिं अनियंत्र राज्या ॥ ध्रु० ॥ जन करिति समयिं या। घोर कर्में जया। दिनमुखीं स्मरुनियां। वरिति लज्जा ॥ १ ॥

मनुष्यानें नेहमीं अशीं कृत्यें आणि भाषणें करावीं कीं त्यांचा त्यास कधीं पश्चात्ताप होऊं नये.

सरस्वती—माझ्या पतींनीं लहान मुलीशीं लग्न करण्यांत जें निंद्य कृत्य केलें त्याचींच फळें माझे पापी विचार व अमर्याद भाषणें हीं होत. त्यांची जबाबदारी मजवर नाहीं, त्यांजवर आहे.

मनोहर—अशा दुःसह स्थितींत जर तूं शुद्ध आचरण ठेविलेंस तर तुझ्या सद्गुणांची जग वहावा करील. सर्व सुखें अनुकूल असतां सद्गुणी रहाण्यांत कांहीं विशेष नाहीं आणि त्याची लोकांत कांहीं किंमतही नसते.

सरस्वती—जर माझा इष्ट हेतु पूर्ण झाला तर मला लोकांच्या स्तुतीची किंवा निंदेची चाड कशाला पाहिजे ?

मनोहर—आपल्या मनोदेवतेच्या खालोखाल आपणांस समाजाची पर्वा बाळगिलीच पाहिजे. जें कृत्य मनोदेवतेलाही पसंत नाहीं आणि समजालाही नाहीं असें कृत्य केलें असतां मनुष्याला अंतर्यामीं असमाधान राहून बाहेरूनही छळ होतो. आपण समाजसागराचे बिंदु आहोंत तोंपर्यंत आपणांला त्याच्या इच्छेकडे दुर्लक्ष्य करितां येत नाहीं.

सरस्वती—समाजानें माझ्यासारख्या स्त्रियांवर काय दया केली आहे म्हणून त्यांनीं त्यास मान द्यावा ?

मनोहर—अजून आपल्या समाजशासनांत सुधारणा करण्याला पुष्कळ जागा असेल. पण म्हणून समाजाच्या अस्तित्वामुळें आपणांस कांहींच फायदा होत नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे. समाज आहे म्हणून आम्हांला खाणें पिणें, वस्त्रप्रावरणें वेळेवर मिळतात. समाज आहे म्हणून आम्हांस स्वस्थपणें दिवसा व्यवसाय करितां येतात व रात्रीं विश्रांति घेतां येते. समाज आहे म्हणून पत्रें, पुस्तकें, मासिकें इत्यादि मनोरंजनाच्या गोष्टींचा आम्हांस लाभ होतो. फार कशाला, समाज आहे म्हणूनच आम्हांस ईश्वरप्राप्तीचा मार्ग निर्वेधपणें चालवितां येतो. बरें, या सगळ्या कामगिरीबद्दल समाज वेतन किती अल्प मागतो, तर तुम्हीं दुसऱ्याच्या वस्तूस हात लावूं नका, मग ती वस्तु पैसा असो, मिळकत असो, कीं भार्या असो.

सरस्वती—एकमेकांवर प्रेम करणारीं स्त्रीपुरुषें अरण्यांत जाऊन राहिलीं तर तिथें नाहीं का त्यांना सुख मिळणार ?

(कन्हय्या जरा बन्सी बजा०—या चालीवर)

मधुर किति रम्य वनीं वसती । दुर्मिळ लोकीं ती ॥ध्रु०॥
स्वादुफलाशनिं क्षुत्पीडाशम निर्झरजलिंच तृषाशांति॥१॥
घनवृक्षांच्या छायेखालीं सतत वसणें विजनप्रांतीं ॥२ ॥

मनोहर—या नुस्त्या कादंबरींतल्या गोष्टी आहेत; यांत अरण्यवासाचे तोटे जमेस धरिले नाहींत.

(सो तेरीमेरी कैसी बने०—या चालीवर)

विपुल भय ये दिसुनी वनवासीं ॥ ध्रु०॥ आपण कंदफलें भक्षित ते हिंस्रपशुहि अपणांसी ॥ १ ॥ मधुरजला प्राशितसूं आम्ही अहि आम्हांसी ग्रासी ॥ २॥ नरभक्षक पचविति अम्हां जसे आपण अन्नरसासी ॥ ३ ॥

पूर्वीच्या वनवासी ऋषींना राजांकडे वारंवार धांव घ्यावी लागे ती याचकरितां !

सरस्वती—एकूण समाजाचीं बंधनें कितीही जुलमी असलीं तरी तीं पाळणें आमचें कर्तव्यच आहे तर ?

मनोहर—तीं पाळावीं किंवा तीं तोडण्याचें शासन भोगण्याला तयार व्हावें. आणि समाजाच्या शिक्षांइतक्या भयंकर दुसऱ्या कोणत्याही शिक्षा नसतात. पाठीवरचे चाबूक पुरवतात, पण पाठीमागच्या निंदा पुरवत नाहींत. अंधारकोठडींत रहाणें पत्करतें, पण उजेडांतला बहिष्कार पत्करत नाहीं. तोफेच्या तोंडीं गेलेलें परवडतें, पण शेजाऱ्यांच्या तोंडचे उद्गार परवडत नाहींत. विष खपतें, पण अपमान खपत नाहीं. या सर्व शिक्षा भोगण्याला मनुष्यानें कांहीं प्रसंगीं मात्र तयार झालें पाहिजे. ते प्रसंग म्हणजे जेव्हां समाजाचे नियम न्यायास व नीतीस सोडून असतात तेव्हांचे. अशा प्रसंगीं बाह्य शत्रूंशीं लढण्याला अंतरात्मरूप बळकट किल्ल्याचा आपणांला आधार असतो.

सरस्वती–सामाजिक शिक्षांचें आपलें वर्णन ऐकून माझ्या अंगावर कांटा उभा राहिला !

मनोहर–मीं आतांपर्यंत समाजांतील प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य सांगितलें. आतां माझ्यासारख्या ज्या मनुष्यांनें एखादी लोकोपयोगी संस्था काढिली आहे त्यावर त्यामानानें इतरांपेक्षां जबाबदारीही विशेष असते. शंभराहून अधिक लोकांनीं आपल्या मुली, सुना, बहिणी विश्वासानें माझ्या स्वाधीन केल्या आहेत, त्यांच्या विश्वासास मी पात्र आहें असें जर मीं आपल्या वर्तनानें दाखविलें तर लवकरच शंभराच्या पांचशें मुली होतील. पण जर का मी तुझी विनंति मान्य करून आपलें शील सोडिलें, तर मजवर पुन्हां कोण विश्वास ठेवणार आहे ? कोण मला आपल्या घराची पायरी चढूं देणार आहे ? माझ्या अविचारानें मी स्वतःचें नांव घालवीन इतकेंच नाहीं तर माझ्या मागून जे महात्मे अशा संस्था काढतील त्यांच्या मार्गांत मी दुर्लंघ्य विघ्नपर्वत आधींच निर्माण केल्यासारखें होईल.

सरस्वती-पण अशा एकांत स्थलीं व रात्रीच्या शांत वेळीं आपणांकडून जर थोडेंसें वाईट वर्तन झालें तर तें जगजाहिर थोडेंच होणार आहे ! हें पहा !

(कृष्ण मुरारी विनती०–या चालीवर)

रात्रि पसरि निज वसन अवनिवरि ॥ स्वजनदुरित लपवुनि निज गहन तिमिरिं लाज वारि । प्रणतकरुण हृदय धरुन करुनि भवन दीन तारि॥ध्रु०॥ कीटकरव कर्कशतम निर्मुनि रतिकृत निनद पूर्ण करित छन्न निमिषिं तूर्ण । प्रणयिरब्धकलहशब्द बहुत मुग्ध नृपपरिचररविं बुडवित निद्रित करि सृष्टि सारि ॥ १ ॥

मनोहर–सरस्वति,

(मुख मोर मोर०—या चालीवर)

कधिं पापलोप नच होय जगतिं । स्फुट कुकृति पाहिं सकलहि समयिं होति ॥ ध्रु० ॥ अघलव जरि करिं तरि ये कृष्णता मदीय वदनिं । क्षणांत हरुनी मम शुचिचरितकांति ॥ १ ॥

पापानें माझें तोंड इतकें काळवंडून जाईल कीं तूं सुद्धां माझा तिरस्कार करूं लागशील.

सरस्वती—आपण प्रेम केलें म्हणजे इतरही आपणांवर प्रेम करूं लागतात असें आपण एकदां म्हणालां होतां ना ?

मनोहर—तें मीं प्रेमासंबंधानें म्हटलें होतें. कामवासनेसंबंधानें नव्हतें. या दोहोंतील भेद तूं विसरून जातेस.

सरस्वती—महाराज, आपणांपेक्षां थोरांनींही अशीं कृत्यें करण्यांत पाप मानिलें नाहीं. मग आपण तरी कां मानावें ? लहानांनीं अनुकरण करावें हाचना थोरांच्या चरित्रांचा उपयोग ?

मनोहर—तुझें धोरण अजून माझ्या लक्ष्यांत येत नाहीं.

सरस्वती—भगवान् श्रीकृष्णांनीं वृंदावनांत गोपींशीं क्रीडा केली; त्याचप्रमाणें कांहीं देशांत अजूनही स्त्रिया गुरूस आपला देह अर्पण करितात. हें जर खरें असेल तर आपणांलाही माझी सेवा घेण्याला हरकत नसावी.

मनोहर—हा जो देहार्पणाचा प्रकार तूं सांगितलास तो हल्लीं कांहीं लोकांत प्रचलित आहे हें खरें आहे; पण म्हणून तो स्तुत्य आहे असें कोणी समजत नाहीं. उलट तो बंद करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कृष्णाविषयीं म्हणशील तर भक्ताची भगवंताचे ठायीं जी अचल भक्ति असावी लागते, तिची परमावधि रमणीप्रेमासारखी असते, या दृष्टीनें बहुधा व्यासांनीं गोपींची प्रणययुक्त भक्ति वर्णिली असावी असें अनेक विद्वानांप्रमाणें मलाही वाटतें. मजसारख्या पामरांतसुद्धां जर साधारण इंद्रियदमन थोडें बनतें तर तें श्रीकृष्णासारख्या महात्म्यांत कसें नसेल ?

सरस्वती–आपला निर्धार पाहून मला माझ्या निर्लज्जपणाची लाज वाटूं लागली आहे. आतां या विषयासंबंधानें मी आपणांस पुन्हां त्रास देणार नाहीं. मात्र आपणांकडून मला एक वचन पाहिजे आहे.

मनोहर–तें कोणतें ?

सरस्वती–कीं आपलें मन जर कधीं कोणाही स्त्रीविषयीं विरघळलें तर आपण माझे हेतु पूर्ण कराल.

मनोहर–काय चमत्कारिक मागणें हें ! ठीक आहे. सरस्वति, माझी स्वतःच्या निर्धाराबद्दल इतकी खात्री आहे कीं माझ्या चित्तांत कोणत्याही स्त्रीनें चलबिचल उपन्न केली कीं मी तुझें म्हणणें मान्य करण्याचें तुला वचन देतों. खरोखर पाहिलें तर ही प्रतिज्ञा नसून मिथ्याध्यवसिति आहे. आतां मी तुझा निरोप घेतों.

सरस्वती–काय ! अशा रात्रीं आपण जाणार ?

मनोहर–आपलें आज जें भाषण झालें त्यानंतर या घरांत रहाणें मला प्रशस्त दिसत नाहीं; शिवाय आनंदरावही आज घरीं नाहींत, तेव्हां मी आपल्या आश्रमांत जातों.

सरस्वती–अलीकडे आश्रमांत एक सुंदर व तरुण अशी नवीन अध्यापिका आली आहे असें ऐकितें.

मनोहर–(एकीकडे) अरेरे ! तरंगिणीला दिलेलें वचन मला पदोपदीं नडणार !

(अजब प्रांत गुजराथ०–या चालीवर)

पूर्ण न करुनि विचार देउनी चुकलों या वचना ॥ ध्रु०॥
प्रश्न न जोंवरि करील कोणी तोंवरि ही रसना। मूकभाव धरुनी न वदेलचि परमार्थासि जना ॥ १ ॥ स्थिति झाली विपरीत कशी जन कुतर्क घे नाना। सत्यहि गणिती मोहें कपटें वदलों वाक्यांना ॥ २ ॥

(उघड) अशी अपरिचित अध्यापिका आलेली मला नाहीं माहित. बरें, घेतों आतां तुझी परवानगी. (सरस्वती मान हलविते. जातो.)

सरस्वती-(स्वतःशीं) यांच्या स्त्रीजातीवर प्रेम आहे असें तोंडानें म्हणायचें मात्र आणि एखादीनें शब्द टाकिला कीं तिची निराशा करायची.

(तिलककामोद-झंपा)

हृदय मम रमण हा नेत आकर्षुनी । जेविं चुंबक बळें आयसालागुनी ॥ ध्रु० ॥ प्रियलाभ जों कठिण । अनुरागि तों क्षीन । वल्लभाविषयिं मन । होय मम या क्षणीं ॥१॥ जलयंत्रजल वहनि । रोधितां उद्गमनिं । गुणित हो बहु जवनिं । प्रणयगति तेविं जनिं ॥ २ ॥

यांच्या शेवटच्या वर्तनानें मला कांहीं आशाही वाटते.आश्रमांत जी नवी बाई आली आहे तिच्यासंबंधानें प्रश्न केला असतां त्यांनीं बराच वेळ थांबून अशी उडवाउडव कां केली बरें ? चकोर आज त्यांच्याशीं कांहीं वेळ बोलत बसले होते. त्यांनीं अर्थात् तिच्याविषयीं यांना बातमी सांगितलीच असेल. असें असून यांनीं मला तिजबद्दल कांहीं माहित नाहीं असें कां बरें म्हटले ? खास इथें कांहींतरी पाणी मुरतें आहे ! त्या बाईविषयीं माझ्या मनांत एका क्षणास प्रेम तर दुसऱ्या क्षणास मत्सर वाटत आहे ! माझ्या प्रियकराचें प्रेमालिंगन मिळवून देण्याला ती साधनीभूत होणार म्हणून तिला आलिंगन द्यावेंसें वाटतें ! पण मला मिळण्यापूर्वी तें तिला मिळणार या विचारानें तिच्याविषयीं मनस्वी संताप येतो ! विहाराच्या प्रतिज्ञाभंगामुळें चंद्रिकेस चकोराची प्राप्ति आणि माझ्या प्रियकरांच्या प्रतिज्ञाभंगामुळें मला त्यांची प्राप्ति हीं दोन्ही लवकरच घडून येणार असें दिसतें.मला अलीकडे प्रेमापासून होणाऱ्या सुखदुःखांचा अनुभव येत गेल्यामुळें चंद्रिकेबद्दल कितीतरी कळकळ वाटूं लागली आहे. मृत्युप्रमाणें प्रेमामुळेंही

द्वेषादि विकारांचा लय होऊन जातो. असो, आतां मला माझ्या प्रियकरांचा लाभ झाला म्हणजे त्यांची सर्व विद्या मला तेव्हांच उच- लितां येईल.

(ह्यांग कळवा०—या चालीवर)

चुंबुनियां त्यांसि हरिन मधुरशी गिरा । ग्रंथसंघ शीघ्र न दे ज्ञानसागरा ॥ ध्रु० ॥ मिळवुनि त्हृदयाशिं हृदय । आलिंगुनि दृढ निर्भय । करिन आपुली तदीय । मतपरंपरा ॥ १ ॥

नाहींतर हें घोकंपट्टीचें शिक्षण !

(जाते.)

प्रवेश ३ रा.

(विहार.)

विहार—(स्वतःशीं) घरीं दारीं, जेवतांना उठतांना, बसतांना, सग- ळीकडे आणि अष्टौप्रहर माझ्या प्रियेची मूर्ति समोर खेळत असते. प्रिये तरंगिणि, तुझें मजवर जितकें निर्मल प्रेम होतें तितकेंच माझेंही तुजवर आहे. तुझ्या सद्गुणांचें चिंतन करितां करितां मला एकंदर स्त्रीजातीविषयीं इतका कांहीं आदर वाटूं लागला आहे कीं रस्त्यानें कांकणांचा आवाज कानांवर पडला पुरे कीं माझे नेत्र तिकडे फिरलेच म्हणून समजावें. तुझ्या मूर्तीशीं साम्य ज्या ज्या स्त्रींत आढळतें ती ती तुजप्रमाणेंच मला प्रिय वाटते; मग ती कोणत्या का जातीची असेना ! तुझ्यासारखी तरुण व लाव- ण्यवती असली म्हणजे झालें. फार काय सांगूं ? अलीकडे पूजा करितांना- सुद्धां देव आणि देवी यांजमध्यें मला पक्षपात करावासा वाटतो. देवांच्या डोक्यांवर कण्हेरीचीं व झेंडूचीं फुलें टाकून देवींच्या मस्तकीं मात्र गुलाबाचीं

आणि मोगऱ्याचीं फुलें वहातों. तसेंच बेलांचा आणि दूर्वांचा भारा देवांवर सोडून देवींना तुळशीच्या मंजिऱ्या अर्पण करितों. परोपकार म्हणून या मुलांना शिकविण्यास सुरुवात केली तों हाच प्रकार तिकडेही होऊं लागला. गणित शिकवितांना मुलांकडून बेरीज व वजाबाकी वारंवार करून घेतों, आणि गुणाकार भागाकार पडतात लांबणीवर ! भुगोलांतील सामुद्रधुनि, संयोगभूमि यांच्या व्याख्यांवर सारखी झोड सुरू करितों; आणि समुद्र, महासागर वगैरे पुरुष मंडळी ठेवितों तशीच कोकलत ! इतिहासांतील चांदबिबी, मस्तानी यांच्या चरित्रांचीं पारायणें सुरू करून शिवाजीमहाराज, बाजीरावसाहेब यांचीं पवित्र नांवें इतिहासांतल्या इतिहासांतच राहूं देतों ! या प्रकारामुळें मुलेंसुद्धां दांडगीं होऊन माझें ऐकेनाशीं झालीं आहेत. मुलांपेक्षां मुली निःसंशय आज्ञाधारक असतील.

चकोर–(प्रवेश करून)–कसें काय ? दादासाहेब, ठीक चाललें आहे ना तुमचें व्रत ?

विहार–ठीक म्हणून काय विचारतोस ? तुझी ताई हल्लीं कुठें वास करिते आहे हें सांग बरें ?

चकोर–(एकीकडे) यांना आमचें कपट कळलें कीं काय ? (उघड) मला नाहीं माहित.

विहार–अरे माझ्या समोर, मार्गे, उजवीकडे, डावीकडे, सारांश चोहोंकडे तिची मूर्ति मला दिसत असते. अशा स्थितींत माझें व्रत टळणें शक्य तरी आहे का ?

चकोर–(एकीकडे) माझी मोठी भीति दूर झाली ! (उघड) बरें प्रेम असतें तिथें असें असावयाचेंच.

विहार–तिचा जो मला ध्यास लागला आहे त्याची [illegible] परमावधि झाली आहे.

(नच सुंदरि करुं कोपा०—या चालीवर)

अंतर्यहि दिनरजनी। दिसते मज रूपखनि ॥ देवखिम सतत तिला पूजितसें स्वमनीं ॥ ध्रु० ॥ मार्गीं ये संचरतां। कंकणरव कर्णपथा ॥ तरि वाटे निज नाथा। आलि मिळाया कांता ॥ तरखम मुख बघुनि जाइं मी वेडावोनी ॥ १ ॥

हल्लीं मी कोणतेंही पुस्तक वाचायला उघडलें तरी तिची आठवण होते. ज्यांत पुरुष व स्त्री यांचा भेद दाखविणारा नांवें नाहींत अशीं पुस्तकें आणि शास्त्रें तरी कुठें आहेत ?

(चाल सदर)

स्त्रीपुरुषीं भेद दिसे। व्याकरणीं दिसलासे ॥ स्त्रीनरकेसर ऐसे। औषधिमधिं रज खासे ॥

चकोर—खरेंच ! त्यांच्यावांचून त्या शास्त्रांत पानच हालत नाहीं.

विहार—

वेदान्तहि सुना प्रकृति-पुरुषांवांचोनी ॥ २ ॥
गणितीं चिन्हांकांसी। बघुनी होइं उदासी ॥ विद्युन्मीमांसा तशि। स्त्रीनरभेदा लक्षि ॥ यंत्रशास्त्रिं तोचि येइ मळसूत्रीं दिसुनी ॥ ३ ॥

चकोर—तुमचें अध्यापन ठीक चाललें आहेना ?

विहार—माझा व्यवसाय मात्र माझ्या विचारांस फार प्रतिकूळ आहे. मुलांपेक्षां मुलींना शिकविण्याचा मीं पत्कर घेतला असता तर बरें झालें असतें. म्हणजे मी अंतर्बाह्य स्त्रीमय बनून गेलों असतों. बरें, विद्यार्थी मिळाले आहेत ते तरी सुधे आहेत का ? सकाळपासून संध्याकाळपर्यंत मला सारखा त्रास देत असतात. परवां मी खुर्चीवर बसावयास गेलों तों एका वात्रट मुलानें मागची खुर्ची ओढून घेतली; त्यासरसें मला भुईवर लोटांगण मिळालें !

चकोर—मग याबद्दल त्यांना चांगली शिक्षा कां नाहीं करीत ?

विहार—शिक्षा देतांनासुद्धां माझें हंसेंच होतें. मी छडी मारूं लागलों कीं ते ती चुकवितात, आणि यामुळें पुष्कळदां माझे नुस्ते हस्तविक्षेप होतात. मी एखाद्याचा कान पिळायला किंवा गालगुच्चा घ्यायला गेलों कीं माझ्या काखेंत टांचणी टोंचतात. याप्रमाणें खरी शिक्षा मुलांना न होतां मला होते. परवां एक मुलगा घरीं जाण्याची परवानगी मागूं लागला, मी दिली नाहीं. तेव्हां त्यानें त्याबद्दल अगदीं तगादा लाविला. तेव्हां मीं त्याला बांकावर उभें रहाण्याची शिक्षा फर्माविली. ती त्यानें अमान्य केली म्हणून मीं त्याला आंगठे धरून उभा रहा असा हुकुम केला. पण रहात नाहीं असें जेव्हां त्यानें उर्मटपणाचें उत्तर दिलें, तेव्हां सर्वांत मोठी शिक्षा म्हणून मीं त्याला खोलीच्या बाहेर जाण्यास सांगितलें. तेव्हां तो निलाजरा 'मला तरी हेंच पाहिजे होतें' असें म्हणून हंसत हंसत चालता झाला ! या चटोरपणाला काय म्हणायचें ?

चकोर—अरे अरे ! मला तुमची अगदीं मनापासून कींव येते.

विहार—काल एकानें माझ्या छाटीच्या मागचे अंगास टांचणीनें एक चोळीच अडकाऊन दिली. मी फळ्यावर उदाहरणें सोडवून दाखवायला जेव्हां जेव्हां जाई तेव्हां तेव्हां सगळ्या वर्गांत एकच हंशा उडे. चोळी पाठीमागें असल्यामुळें मला दिसेनाही. शेवटीं हीं मुलें आज इतक्या एकोप्यानें कां हंसत आहेत याचा पत्ता काढण्याकरितां एकाला छडीनें चांगला फोडून काढिला; तेव्हां त्यानें सर्व रहस्य फोडलें.

चकोर—अगोदर मला सांगा ही छाटी तुम्ही कां वापरतां ?

विहार—प्रायश्चित्त म्हणून !

(साकी)

यतिवेषीं तुज बघुनी वदलों बहु सकोप उपहासें ।
शासन त्याचें कांताविरहीं ईशें दिधलें खासें ॥
त्याच वदनिं वेषा । परिमार्जिन मम गतदोषा ॥ १ ॥

चकोरा, त्याबद्दल तूं मला पूर्ण क्षमा केलीस ना ?

चकोर–तुम्ही वडील तेव्हां क्षमा करण्याचा अधिकार तुमचा आहे. तें असूं द्या. तुम्ही या मुलांना अगदीं कंटाळलां आहांत ना?

विहार–मला त्यांची अगदीं ओकारी आली आहे. एखाद्या स्नेह्याला मुलगा झाला म्हणजे मला आजपर्यंत आनंद वाटत असे, पण हल्लींच्या अनुभवावरून तो आनंद अस्थानीं होता असें वाटतें.

चकोर–आमच्या आश्रमांत मुलींना शिकविण्यास तयार आहांत?

विहार–अगदीं एका पायावर! पण मी आजपर्यंत मनोहराला याच्या आश्रमाबद्दल इतका तिटकारा दाखविला आहे कीं तेथें मी कोणत्या तोंडानें जाऊं असें मला झालें आहे.

चकोर–दादांच्या मनांत तर त्याबद्दल मुळींच नाहीं. तुम्ही आलांत तर त्यांना उलट आनंद वाटेल.

विहार–तसें असेल तर माझ्याकडूनही ना नाहीं.

चकोर–तेथें जाण्यापूर्वी मला तुम्हांला दोन गोष्टींबद्दल सूचना करून ठेविली पाहिजे.

विहार–त्या कोणत्या?

चकोर–एक ही कीं अजून ताईबद्दलचें वेड दादांच्या डोक्यांतून पुरतें गेलें नाहीं म्हणून त्यांच्याशीं बोलतांना त्याबद्दल ब्र काढावयाचा नाहीं. ही पहिली सूचना. तुम्हांला हल्लीं ताईवांचून कांहीं दिसत नाहीं, म्हणून ही सूचना तुम्हीं विशेष लक्ष्यांत ठेवावी.

विहार–त्याबद्दल तूं काळजी करूं नकोस. दुसरी सूचना कोणती?

चकोर–हल्लीं आश्रमांत एक श्रीमंत बाई आपखुषीनें अध्यापिका म्हणून आली आहे.

विहार–बरें मग?

चकोर–ती तरुण आणि अत्यंत देखणी आहे.

विहार–काय म्हणतोस? तरुण?

चकोर–होय. अठरा वीस वर्षांच्या सुमाराची असेल.

विहार–आणखी काय म्हणलास? अत्यंत देखणी?

चकोर–मीं कांहीं तिला पाहिली नाहीं. कारण ती फार मर्यादशील असल्यामुळें पुरुषांसमोर नेहमीं बुरखा घेते. आणि म्हणूनच तुम्हांला दुसरी सूचना अशी करावयाची कीं तिच्या खोलीकडे तुम्हीं फारच जरूरीच्या कामाशिवाय कधीं फिरकूं नये.

विहार–फार उत्तम ! मला आतां परस्त्रिया मातेसमान आहेत.

चकोर–(एकीकडे) स्वतःच्या मुलाच्या मातेसमान ! (उघड) मग आतां उशीर कां ?

विहार–एकदां मुलांना सांगून टाकतों, आणि मग बाबांना माझा पुढचा पत्ता सांगून नंतर तिकडे जाऊं. अरे केदारा, कल्याणा, भैरवा, (दोन तीन मुलें येतात.) बाकीचीं मुलें काय झालीं ? मल्हार कुठें आहे ? आणि त्याचा मित्र सारंग काय झाला ? तसेंच आपला कानडा दिसत नाहीं तो ? भारी अवघड कारटीं बोवा ! आळवतां आळवतां घसा कोरडा पडतो ! अरे बेटयांनों, सगळ्याजणांना सांगून टाका कीं तुमच्या खोड्यांना त्रासून आजपासून वर्ग बंद केला म्हणून. (एका बाजूनें मुलें उड्या मारीत जातात. दुसऱ्या बाजूनें चकोर व विहार जातात.)

प्रवेश ४ था.

(**मनोहर** व **तरंगिणी**.)

मनोहर–तरंगिणि, आमच्या आश्रमांत तुझे दिवस बरे जातात ना

तरंगिणी–दादा, हें काय विचारतोस ?

(साकी)

अत्रोदक अति निर्मळ त्याहुनि विमल देह हे जेथें ।
शुद्ध अंतरें सर्वांहुनि त्या योगिहि रमल तेथें ॥ १ ॥

इथली व्यवस्था तरी किती सुयंत्र आहे ! मुलींचीं नांवें तरी किती गोड ठेविलीं आहेत ! एकीचें नांव भैरवी, तर दुसरीचें तोडी, आणि तिसरीचें धन्यश्री !

मनोहर—मुली आश्रमांत आल्यावर त्यांचीं आम्हीं निराळीं नांवें ठेवितों तीं बहुधा त्यांच्या स्वभावांवरून ठेवितों. एक मुलगी नेहमीं उदास असते; तिचें नांव जोगी ठेविलें आहे. दुसरी फार लाजाळू, तिला 'ग' ची बाधा मुळींच नाहीं; तिला गंधार वर्ज्य असलेल्या एका रागिणीचें नांव दिलें आहे. एक मुलगी बाहेरून फार दांडगी दिसते, पण आंतून फार कोमल अंतःकरणाची आहे; तिला कोमलस्वरमय भैरवीचें नांव ठेविलें आहे. या मुलींचे पोषाखसुद्धां शक्य तितके संगीतशास्त्रांत वर्णिल्याप्रमाणेंच ठेवीत असतों. यामुळें आश्रमांत वैचित्र्य येऊन मुलींनाही गाण्याचें सहज ज्ञान होतें. तरंगिणि, तुझें नवीन नांव कल्याणी हें सुद्धां त्याच वर्गांतलें आहे.

तरंगिणी—मला तिकडून नेहमीं सांगणें होत असे कीं या आश्रमांत नुस्तें पोपटपंचीचें शिक्षण मिळतें. पण इथें पहातें तों रोजचा स्वैंपाक हिशेबठिशेब मुलीच पाळीपाळीनें करितात; तसेंच वरच्या वर्गांतील मुली खालच्या वर्गांतल्या मुलींना शिकवितात. त्यामुळें शिकण्याबरोबर शिकविण्याचाही त्यांना सहज अनुभव येतो. त्यांच्या सांगण्यांत आणि खऱ्या प्रकारांत मला जमीनअस्मानाचें अंतर दिसून आलें आहे.

मनोहर—हा अनुभव नेहमींच येतो. हें अंतर कितीं आहे हें स्वतः पहाण्याकरितां आज विहारही येथें येणार आहे.

तरंगिणी—अगबाई ! हें ऐकून माझ्या उरांत धडकी भरली ! हें सोंग जर का त्यांना आधींच कळून चुकलें तर पंचाईत व्हायची ! तशांत तुला त्यांनी विचारिलें तर तूं प्राण गेला तरी खोटें सांगायचा नाहींस.

मनोहर—मी येथें बसणारच नाहीं म्हणजे झालें.

एक मुलगी (प्रवेश करून)-महाराज, बाहेर विहार नांवाचे कोणी गृहस्थ आणि त्यांच्याबरोबर दोन बाया आल्या आहेत.

मनोहर–येऊं दे त्यांना आंत. तरंगिणि, मी या दुसऱ्या दारानें जातों बरें बाहेर. (तरंगिणी मानेनें बरें म्हणून खुणाविते. मनोहर जातो.)

तरंगिणी-(स्वतःशीं) हें हृदय त्यांना भेटण्याकरितांच कीं काय धडधड उडूं लागलें आहे. हे डोळे त्यांना पहाण्याकरितां कसे तान्हेले झाले आहेत. त्यांची तृषा शांत करण्याकरितां हे आनंदाश्रु उभे रहातात! अश्रूंनो, तुमच्यानें माझ्या डोळ्यांची तहान कशी निवणार ? अगबाई, आलेच वाटतें!(तोंडावरून बुरखा घेते. **विहार, चकोर, सरस्वती,** व **वेणुबाई** प्रवेश करितात,)

चकोर–कल्याणीबाई, हे माझे मेव्हणे विहार आश्रमांत अध्यापक होऊन आले आहेत.

तरंगिणी-(स्वर बदलून) फार आनंदाची गोष्ट आहे ! सर्वसंगपरित्याग करून आश्रमाची सेवा करणाऱ्या स्वयंसेवकांची आपणांला फार आवश्यकता आहे.

विहार–आपल्यासारख्या गर्भश्रीमंत स्त्रियांनीं आपल्या वैभवावर लाथ मारून आश्रमाची चाकरी पत्करावी हेंच मोठें आश्चर्य ! आपलें मीं अल्प अनुकरण मात्र केलें आहे त्यांत बढाई कसची !

तरंगिणी-(सरस्वतीकडे पाहून) या विहारांच्या भगिनी आहेत वाटतें?

चकोर–नाहीं. त्यांच्या सापत्नमातुश्री आहेत. आम्ही इकडे यावयास निघालों तेव्हां त्याही आश्रम पाहण्याच्या उद्देशानें इकडे आल्या.

तरंगिणी–बाई, मी आपणांस यांची बहीण समजून आपला अपमान केला याबद्दल आपली क्षमा मागतें.

सरस्वती-त्यांत कसची क्षमा मागायची ! (एकीकडे) बाई फार सुंदर आणि लहान वयाची दिसते ! तिकडे मोह खास पडणार !

विहार-मनोहरपंत येथेंच आहेत असें कळल्यावरून आम्हीं येथें आलों. पण आपण एकट्याच असल्यामुळें आपल्या एकांताचा भंग मात्र आमच्याकडून झाला. त्याबद्दल माफी असावी.

तरंगिणी-ते आतांपर्यंत येथेंच बसले होते. आपण येण्यापूर्वीं नुकेच उठून गेले.

विहार-(एकीकडे) स्वारी विरघळली वाटतें ! आणि कोण नाहीं विरघळणार ? इच्या तोंडावर बुरखा असूनही इतर अवयवांवरून इचा नाजूकपणा दिसून येत आहे. चंद्रावर जरी अभ्रपटल आलें तरी त्याच्या चोहोंकडे पसरलेल्या करांवरून त्याच्या कांतीची कल्पना करितां येते. पण माझ्यासारख्या तपस्व्यांना आतां इतक्या बारकाईनें पहाण्याची काय जरूर आहे ?

सरस्वती-(एकीकडे) आम्ही आल्याबरोबर उठून गेले ! ठीकच आहे. माझ्याशीं येवढालीं लांबलांब भाषणें झाल्यावर जर त्यांचा एकांत मला पहायला मिळाला तर तें त्यांना कसें खपणार ?

विहार-बाई, या आश्रमाच्या मालकांना भेटण्याच्या आधीं येथें बसणें योग्य नाहीं. तर आतां आम्हांला मनोहरपंतांकडे जाण्याची परवानगी असावी.

तरंगिणी-आपणांसारख्या ज्ञात्यांची पहिली भेटसुद्धां चित्ताला चटका लावून सोडिते. आपल्या या अल्प सहवासानें अधिक सहवासाची इच्छा होणें स्वाभाविक आहे. तेव्हां-

(काहेको सतावो संया०-या चालीवर)

पुनरपि दर्शन द्यावें लवकरि । सतत घडे जरि ये न वीट तरि ॥ ध्रु० ॥ सज्जनसंगति तृषित जनां करि । शीतल जरि खारि गमत सुधेपरि ॥ १ ॥

विहार-ठीक आहे. पण मी म्हणतों,

(सुन शाम बिनती०—या चालीवर)

चिर वास सुखिं या अशा । मम । बहु भाग्याचा गमत मानसा ॥ ध्रु० ॥ जन्मभरी येथेंचि रहावें । श्रवणिं वचन मधुसम सेवावें । अशिच मनीषा ॥ १ ॥

सरस्वती—(एकीकडे) बाईचा साखर पेरण्यांत हातखंडा दिसतो! ही त्यांना तेव्हांच आपल्या जाळ्यांत गुरफटून टाकणार ! मी बिचारी भोळी सांपडलें म्हणून नाहीं नाहीं त्या तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून मला चकविलें. पण हें प्रकरण म्हणावें निराळेंच दिसत आहे ! संभाळून असा आतां ! (तरंगिणीशिवाय सर्व जातात.)

तरंगिणी—(स्वतःशीं) काय तरी बाई त्यांचा धीटपणा !

(उग्र तपा भंगाया०—या चालीवर)

तीव्र दृष्टि अवगुंठनिं लाविलि मच्चुंबनकांक्षिणी । असे जी समर्थ तद्भेदनां ॥ वदनावरणा छिन्न निजबळें केलें असतें तरी । शरीरें युक्त असति ती जरी ॥ नम्रपणा जरि वचनिं दाविला नयन तरी धीट ते । बघती वेधूं पातें शितें ॥

आणि हेंच का त्यांचें मुजवरचें प्रेम कीं परस्त्री दिसल्याबरोबर त्यांनीं असें धीटपणानें तिजकडे पहात बसावें ? माझा सारा अभिमान गळून गेला ! बायको मेल्यावर पुरुष कसे वागतात याचा मला चांगलाच अनुभव मिळणार असें दिसतें ! पण या सगळ्याचा शेवट चकोराच्या आणि वन्संच्या लग्नांतच होणार ना ? शिवाय त्यांनीं आपली आशाळभूत दृष्टि मजकडेच लाविली होती ना ? मग मला वाईट तरी कां वाटावें ? छेः ! मीं मनाचें किती जरी समाधान केलें तरी त्याची हुरहुर जात नाहीं ती नाहींच. (जाते.)

प्रवेश ५ वा.

(चंद्रिका व वेणूबाई.)

वेणू–ताईसाहेब, ऐकलीत ना माझ्या जन्माची कर्मकहाणी ? त्या मेल्या शाळ्यानें माझें लाडकें बाळ गळा दाबून जिवें मारिलें आणि सरकार त्याच्या तपासांत आहे हें जर चकोरांनीं मघांशी सांगितलें नसतें तर मी हें तुमच्यापाशीं ओकलेंही नसतें. पण काय करूं ? माझ्या बाळाच्या गळ्याला नख लाविलें तेव्हां त्यानें जी किंचाळी फोडली असेल ती आठवून मला तुमच्यापाशीं अंतःकरण मोकळें केल्यावांचून रहावेनाच. त्याच्या प्रत्यक्ष आईनें जेव्हां त्याला त्या कसाबाच्या हातीं अनाथगृहांत पोहोंचविण्याकरितां दिलें, तेव्हां त्या बिचाऱ्याला पुढें वाढलेल्या दुःखाची कल्पनाही नव्हती. बाळा, काय तुझें तें त्या वेळचें गोजिरवाणें आणि हसरें तोंड ! ते मी आतां कुठें पाहूं ? तुझ्या आईला नाहींना तूं आतां पुन्हां भेटणार ? पण मी आई कसची ! त्याची पूर्वजन्मींची वैरीण द्वेष उगविण्याकरितां जन्माला आलें आणि माझें सोनुलें जन्मल्याबरोबर त्याच्य घाताला कारण झालें !

चंद्रिका–वेणूबाई, शोक तरी किती कराल आतां ? कितीही रडलांत तरी तुमचें बाळ परत नाहीं ना येत ?

वेणू–तें कुठचें येणार ! मीच जाईन आतां त्याला भेटायला स्वर्गांत. पण या पापिणीला स्वर्गांत कोण येऊं देणार ! नाहीं येऊं दिलें तरी मी स्वर्गाच्या दाराशीं तसेंच धरणें धरून बसेन आणि काकुळतीला येऊन देवाला म्हणेन, 'देवा, माझें बाळ स्वर्गांत एकटें आहे. तें माझ्या कडेवर येण्याकरितां कसें घावरें झालें आहे. तर हे भक्तवत्सला, त्याची आणि माझी ताटातूट करूं नकोस.' एक तर मला स्वर्गांत येऊं दे, नाहीं-तर त्याला तरी माझ्याबरोबर नरकांत येऊंदे. मी जाईन तेथें माझें बाळ खुषीनें येईल.'

चंद्रिका–वेणूबाई, नकाहो असें बोलूं ! तुमचे बोलणें ऐकून हृदयाला घरे पडतात ! त्यानें एखाद्या दगडालासुद्धां पाझर फुटेल !

वेणू–ताईसाहेब, तुम्ही म्हणतां दगडाला पाझर फुटेल म्हणून. मग त्या मेल्या शाम्ब्याच्या अंतःकरणाला कसा नाहीं हो द्रव आला ? मेल्या, तुला देव परलोकीं बघून घेईल !

चंद्रिका–परलोकीं कशाला पाहिजे ? याच जगांत मेल्याला त्याच्या कर्माचें प्रायश्चित्त मिळेल बरें ! तुम्ही कांहीं चिंता करूं नका.

गर्डी–(प्रवेश करून) ताईसाहेब, बाहेर शास्त्रीबुवा आले आहेत. सोडूं-का त्यांना आंत ?

चंद्रिका–जा, घेऊन ये त्यांना. पण त्यानां इथें सोडल्यावर तूं मात्र जवळच माझ्या हांकेच्या आंत उभा रहा. (गर्डी जातो.) वेणूबाई, तुम्ही आतां जा. जर का तो इतक्यांत तुमच्या दृष्टीला पडला तर तुम्ही संतापानें त्याची निर्भत्सना करून त्याला जागें कराल. (वेणूबाई जाते. स्वतःशीं) दादा आश्रमांत गेल्यापासून ही बिचारी माझ्या सोबतीला येते म्हणून बरें आहे. नाहीतर मला दिवस वर्षाप्रमाणें वाटला असता. इच्या-प्रमाणें आज आमच्यांत कितीतरी बिचाऱ्या विधवा असतील.

(तुने मोहनी कैसी डारी०–या चालीवर)

कितिक अशा योषिता । ज्या पापामधिं रता ॥ धु० ॥
सरळ सुखाचें साधन तुरलें । कुटिलचि सेविति पथा ॥ १ ॥
कपटिकामवासनेनेंसि पडती । बळिःनच त्यां मुक्तता ॥ २ ॥
गुप्तपणें झालेल्या बाळां । करिति दुरी ज्या स्वतां ॥ ३ ॥

हरिहरशास्त्री (प्रवेश करून)–(स्वतःशीं.) जोंपर्यंत मला सरस्वतीचें वेड होतें तोंपर्यंत इच्या मुखचंद्राकडे माझें लक्ष्यच गेलें नाहीं. पण अलीकडे इच्या लावण्याची एक एक नवीन खुबी रोज प्रकट होत आहे. या चेहऱ्यांत निस्तेजपणामुळें जी शोभा आली आहे ती कांहीं अवर्णनीय!

आजपर्यंत कपाळीं कुंकूं नसणें मला शोभाहीन वाटत असे. पण ज्याला कलंकविरहित चंद्रमा पहावयाचा असेल त्यानें इच्या मुखाकडे पहावें. असें शुभ्र कपाळ पाहिलें म्हणजे काम होत नसतें म्हणतात. कशाला होईल? या चेहऱ्यामधून कामाकडे लक्ष्य लागेल तर काम व्हायचें कीं नाहीं ? (उघड) कस काय ? तब्बेत ठीक आहे ना ?

चंद्रिका–माझ्यासारख्या दुर्दैवी बायकांच्या तब्बेतीची चौकशी करून तुमच्या सारख्या पुण्यवान् माणसांस काय करायचें आहे ? माझी तब्बेत नेहमींप्रमाणें चांगली आहे. तिला काय धाड व्हायची आहे ?

हरिहर–तुमच्या चकोरांचीही प्रकृति खुशाल आहे.

चंद्रिका–(एकीकडे) हें ऐकून आनंद वाटण्याऐवजीं त्यांच्या प्रकृती-बद्दल संशय वरिक उत्पन्न होतो. यानें हें मुद्दाम कां सांगितलें असावें ? यांत याचा कांहीं तरी मतलब असावा. (उघड) तुमचें म्हणणें उघड करून सांगा.

हरिहर–माझा आशय कांहीं विशेष गूढ नाहीं. चकोर हल्लीं नेहमीं आनंदांत दिसतात, त्यावरून सहजींच बोलून गेलों. त्यांचा वेळ अलीकडे मोठ्या करमणुकींत जातो असें ऐकितों.

चंद्रिका–(एकीकडे) हें ऐकतांच माझ्या अंतःकरणास डागण्या द्याव्या त्याप्रमाणें कां बरें वाटतें ? त्यांचें सुख तेंच माझें असें मला वाटूं नये का ? चंद्रिके, तुझ्यासारख्या आपलपोट्या स्त्रियेस ते योग्य नाहींत हेंच खरें ! (उघड) ते पुरुष आहेत; तेव्हां त्यांचा वेळ आनंदांत जात अस-ल्यास नवल नाहीं.

हरिहर–हो ! पुरुषांना बायका मिळाल्या म्हणजे करमणुकीला काय तोटा !

चंद्रिका–आश्रमांतील मुली बिचाऱ्या अज्ञानी ! आणि त्यांच्यामुळें ती काय करमणूक व्हायची आहे ?

हरिहर—त्यांना शिकविण्याकरितां एक नवीन चेहरेबाज बाई आल्या आहेत.त्यांच्यापासून चकोर रोज दोन चार घंटे स्वतः शिक्षण घेत असतात. मग तें शिक्षण कसलें असतें कुणास ठाऊक !

चंद्रिका—(एकीकडे) उतावळ्या मना ! असें अधीर होऊं नकोस. वेडे चंद्रिके,

(दिंडी)

जरी त्यांचा अनुराग नसे भाळीं । जसा या जन्मीं तिळक तव कपाळीं॥वस्तु तरि जी दुष्प्राप्य असे तूतें । लाभ काय असे वांछुनी तियेतें ॥ १ ॥

(उघड) आश्रमांत एक बाई आल्या आहेत असें मीं ऐकिले होतें. पण त्यांचा आणि चकोरांचा स्नेह आहे हें मात्र मला ठाऊक नव्हतें.

हरिहर—कसें ठाऊक असणार ! तें कोणालाही कळूं नये म्हणून तीं दोघेंजण दारांना कड्याकुलुपें लावून घेऊन बसत असतात. कांहीं स्नेह असे असतात कीं ते जगजाहीर व्हावे अशी आपली इच्छा असते. उदाहरणार्थ, बडया लोकांशीं स्नेह पण अबलांशीं स्नेह असा असतो कीं त्याचा तिसऱ्याला संशयसुद्धां येऊं नये अशी आपण खबरदारी घेतों.

चंद्रिका—(एकीकडे) मेल्याची जीभ झडून जावो ! (उघड) चकोरांसारख्या विद्वान् पुरुषाचा त्या विदुषीशीं स्नेह जडला हें योग्यच झालें अशा थोर लोकांच्या गोष्टी माझ्यासारख्या सामान्य मुलीला ऐकून आणि तुमच्यासारख्या सामान्य पुरुषास सांगून काय फायदा होणार ?

हरिहर—फायदा इतकाच कीं आपण त्यांपासून धडा शिकावा. चकोरानें जर तुमचा विश्वासघात केला तर तुम्हांला त्याचा कारितां येणार नाही का ? आपल्या लहानपणच्या मैत्रिणीला विसरून तो जर दोन दिवसांच्या

सोबतिणीला इतका भाळून गेला तर त्याचा वचपा तुम्हांला मजसारख्या एकनिष्ठ मित्रावर प्रेम करून काढितां येणार नाहीं का ?

चंद्रिका–(रागानें) काय बोलतां ? पुन्हां बोला पाहूं.

हरिहर–अशा रागावूं नका. हें तुमचें मुसमुसणारें तारुण्य, रतीनेंही पाहून लाजावें असें लावण्य, हीं वैधव्याग्नींत दग्ध होण्याकरितांच आहेत कीं काय ? मनुष्यजन्म वारंवार येत नसतो आणि त्या जन्मांतही तारुण्य फार वेळ टिकणारें नसतें. त्याचा उपभोग आपण स्वत: घेऊन दुसऱ्यास दिला नाहीं तर या जन्माचें सार्थक काय ? तो चकोर एक अरसिक असला म्हणून इतरांचे डोळे फुटले कीं काय ?

चंद्रिका–(एकीकडे) रागानें आतां माझा दम कोंडून प्राण जाणार खास ! (उघड) बायकांना एकट्या गांठून त्यांच्याशीं असें निलाजरेपणानें बोलणें तुम्हांला शोभतें काहो ?

हरिहर–आणि त्या चकोरानें तुम्हांला एकटें गांठलें होतें तें? तेव्हां नाहीं असा संताप आला ?

चंद्रिका–चला या घटकेस येथून निघून जा. एक पळभर रहाल तर तुमची कांहीं धडगत नाहीं. अरे विठ्या, विठ्या, चल लौकर ये इकडे.

हरिहर–बरें आहे ! या उद्धटपणाबद्दल तुझे केंस घेतल्यावांचून रहात नाहीं ! (जातो.)

चंद्रिका–(स्वतःशीं) मला तरी आतां या केसांशीं काय करायचें आहे !

गडी–(प्रवेश करून)–काय हुकूम आहे, बाईसाहेब ?

चंद्रिका–बाहेरच्या दाराला कडी लावून घे, आणि कोणालाही आंत येऊं देऊं नकोस. माझें आज कपाळ दुखतें आहे.

गडी–तो लेकाचा आला होता ना कपाळदुखव्या !

चंद्रिका–आतां तूं आणखीं बोलूं नकोस. जा.

(पडदा पडतो.)

प्रवेश ६ वा.

(विहार बसला आहे. भोंवतालीं भैरवी, असावरी, धन्यश्री, तोडी, जयजयवंती इत्यादि मुली उभ्या आहेत.)

मुली–

(दिरदिर तनन तनदीं०—या चालीवर)

पदिं नमन तव शारदे। वंद्ये ब्रह्मतनये गीतनिरते माते वरवरदे विनवित सविनय॥ ध्रु०॥ तिमिरिं रवि अवनिच्या ठेवि अर्धा। तदनुकृतिसि न आचरीं करिं करुणा। धरी लाज तूं स्त्रीजातीचि वरिं नय॥ १॥ ज्ञानतरणिकिरणीं पुरुष शोभे। तिमिरमय परि छायिका जणुं अबला। त्वरें स्त्रीकलंका क्षालिं करि सदय॥ २॥

(सर्व मुली आपापल्या जागांवर बसतात.)

विहार–(स्वतःशीं) त्या कल्याणीची मूर्ति प्रियेसारखीच असल्यामुळें माझ्या मनांत वरचेवर येते, यांत नवल नाहीं. तिचें बोलणें चालणें अगदीं तिच्याप्रमाणेंच मनोवेधक आहे. तिच्या हसण्याचा मंजुळ ध्वनि बुरख्यांतून येतो तो एखाद्या पिशवींतील रुप्याच्या नाण्याप्रमाणें खणकन् येतो. या नाण्यावर आपल्या मुखाची मुद्रा करण्याचें भाग्य कोणा दैववानाचें होतें कुणास ठाऊक! ती विधवा आहे, त्याअर्थी माझ्यासारख्याच्या कांहीं उपयोगी नाहीं. शिवाय माझा अविवाहित रहाण्याचा संकल्प कालत्रयींही ढळावयाचा नाहीं. चकोर तिच्याबरोबर दोन दोन चार चार घंटे एकांत करीत बसला असतो, त्याअर्थी त्याच्याच मनांतून या नाण्याची चोरी करावयाचा विचार दिसत आहे. याकरितांच बहुधा त्यानें मला तिच्याशीं फारसा संबंध ठेवूं नका म्हणून बजाविलें असावें. असो, आतां या मुलींना नेहमींप्रमाणें एखादी बोधपर कथा सांगावी. (उघड) मुलींनो, काल आपली रामायणाची कथा कुठपर्यंत आली होती?

भैरवी–त्या मेल्या रावणानें सीतादेवीला उचलून लंकेला नेली, तिथपर्यंत कथाभाग आला होता.

विहार–हां बरोबर ! आतां पुढचा वृत्तांत ऐका. याप्रमाणें कल्याणी नाहींशी झाल्यावर–

तोडी–कल्याणी नव्हे, सीता.

विहार–हो हो ! सीता नाहींशी झाल्यावर राम रानोरान शोक करीत भटकूं लागला. शोकामुळें त्याचे डोळे निस्तेज झाले. गालावरचे केंस वाढल्यामुळें आणि स्नान नसल्यामुळें चेहरा मळकट दिसूं लागला. असावरि, तूं माझ्या तोंडाकडे पाहून गालांतल्या गालांत हंसते आहेस. मी समजलों कां तें ! माझाही चेहरा तसाच झाला आहे म्हणून ना ! (असावरी पुन्हां हंसते. एकीकडे) या केसांमुळें माझें तोंड अलीकडे फारच विद्रूप दिसूं लागलें आहे खरें. विधवा आपल्या विद्रूपपणापासून होणारा अपमान कसा सहन करीत असतील त्या असोत ! ही असावरी माझ्या गुढघ्यायेवढी ! पण तिचें हसूं माझें हृदय कापीतच आंत गेलें ! मुलांची थट्टा केवळ दांडगाईची आणि म्हणून सुसह्य असते. पण या पोरींची नाजुक थट्टा सोसण्याला फार कठिण बुवा ! (उघड) याप्रमाणें जानकीच्या विरहानें वेडा झालेला राम शोक करूं लागला, 'हे कल्याणि–'

तोडी–'जानकि'

विहार–पुन्हां चुकलों ! कल्याणी आणि जानकी हे शब्द अगदीं जवळ जवळ आहेत बेटे ! 'क' बद्दल 'जा' 'ल्या' बद्दल 'न' आणि 'णी' बद्दल 'की' हें अक्षर घातलें कीं 'कल्याणी' पासून 'जानकी' शब्द झाला.

भैरवी–काय बाई चमत्कार तरी !

विहार–नंतर जटायूकडून रामास रावणानें सीता चोरून नेल्याची सारी हकीकत कळल्यावर त्यानें सुग्रीवाला त्याच्या भावाशीं लढाई देण्याला मदत केली, आणि त्याला त्याच्या सिंहासनावर बसविलें.

नंतर समुद्रावर सेतु बांधून माकडांच्या साह्यानें कल्याणीला–नव्हे–सीतेला रामचंद्रांनीं परत आणिली. भैरवि, सांग पाहूं मीं सांगितलें त्याचा सारांश.

भैरवी–माझ्या बाई कांहीं लक्ष्यांत राहिलें नाहीं ! माझें सारें लक्ष्य होतें कल्याणीबाईकडे.

विहार–अभ्यासाच्या वेळीं असें भलतीकडेच लक्ष्य ठेवूं नये. बरें, काय ग कल्याणीबाई तुमच्यावर प्रेम करितात का ?

भैरवी–त्या किती प्रेमळ आहेत म्हणून सांगूं ? साऱ्या मुलींशीं आईसारख्या वागतात.

विहार–आणि त्या दिसतात कशा ग ?

भैरवी–तें नाहीं मीं इतक्या बारकाईनें पाहिलें.

विहार–तूं अशीच वेंधळी आहेस झालें ! मघांशीही तुझे लक्ष्य माझ्या गोष्टीकडे नसून कल्याणीबाईकडेच होतें.

भैरवी–(एकीकडे) माझें एकटीचेंच नव्हतें.

असावरी-गुरुजी, कल्याणी आणि जानकी हे शब्द जर सारखे सारखे आहेत, तर आतां नाहीं तुमच्या तोंडीं कल्याणीबद्दल जानकी शब्द चुकून येत !

विहार–अग चूक जर याप्रमाणें नेमानें होऊं लागली तर तिला चूक कोण म्हणेल ?

असावरी–खरेंच बाई ! हें नाहीं माझ्या लक्ष्यांत आलें.

विहार–बरें, आतां कोण सांगतें मघांच्या गोष्टीचें तात्पर्य ?

धन्यश्री–मी सांगतें.

विहार–तूं ? येवढीशी चिमुरडी ! बरें सांग सांग पाहूं ?

धन्यश्री–रामानें रावणाला बचलून नेलें;मग कल्याणी रडूं लागली कीं 'अगे सीते, मला कां सोडून गेलीस?' मग वाटेंत सुग्रीव भेटला;त्यानें राव-

णाला चोरल्याचें वर्तमान सांगितलें. मग सेतूवर समुद्र बांधून सुग्रीवाच्या मदतीनें कल्याणीला सीतेनें सोडवून आणिलें.

विहार–वा: ! सगळें रामायण होऊन सीता रामाची कोण याची वानवाच !

हरिहरशास्त्री (प्रवेश करून)–आपणांशीं जरा एकीकडे चार शब्द बोलावयाचे आहेत. जरा इकडे याल तर बरें होईल.

विहार–मुलींनो, आज तुम्हांला सुट्टी आहे. जा खेळायला. (मुली आनंदानें उड्या मारीत जातात.) शास्त्रीबुवा, आज कुणीकडे ?

हरिहर–आपलें कुटुंब निवर्तल्यापासून आपल्या मनांत मजविषयीं मध्यंतरीं कांहींसा अविश्वास उत्पन्न झाला होता. खरी आहे ना ही गोष्ट ?

विहार–मुळींच नाहीं. जें घडून आलें तें केवळ माझ्या अदृष्टानें घडवून आणिलें.

हरिहर–तर मग आपला मजवरचा विश्वास दाखविण्याची संधि आल्यास आपण त्याची साक्ष पटवाल म्हणायचें ?

विहार–याबद्दल तुम्हांला संशय वाटत असेल तर माझी त्याबद्दल परीक्षाच घ्या म्हणजे झालें.

हरिहर–मी जें आपणांस सांगणार आहें तें आपली परीक्षा पहाण्यापेक्षां माझ्या पूर्वीच्या प्रमादाचें क्षालन करण्याकरितांच सांगणार आहें. ऐका तर. मीं आजपर्यंत आपणांला हजारदां सांगितलें असेल कीं, या चंद्रिकेचा एकदां धर्मोप्रमाणें विधि होऊं द्या म्हणून ! पण आपण तें मनावर घेतलें नाहीं. आपण घरीं नाहींत हें पाहून ती काय चार करूं लागली आहे, कळलें का ? अंगावर सर्व शृंगार करून खिडकीशीं दोन दोन घटका परक्या पुरुषांशीं बोलत बसते.

विहार–काय करिते म्हणतां कारटी ?

हरिहर–मीं सांगितलें यांतील एक अक्षर खोटें नाहीं.

विहार–एकदां तिनें मुलीमुलींच्या खेळांत कपाळाला कुंकूं लाविलेलें मला माहित आहे. बाकी, या थराला गोष्टी जातील असें नव्हतें मला वाटलें.

हरिहर–मी तिला आज यासंबधानें चार उपदेशपर शब्द बोलायला गेलों तां तिनें माझ्यावरच कुभांड घेतलें!

विहार–काय? तुमच्यासारख्या सत्पुरुषावर कुभांड?

हरिहर–तर काय!

विहार–अरेरे! या वेळीं ती समोर असती तर तिची पाठ फोडून टाकिली असती!

हरिहर–स्त्रियांवर आणि हात टाकायचा! शिव शिव!

विहार–तिनें तुमचा उपमर्द करून तुम्हींच तिची कींव करितांना! शाबास आहे तुमच्या औदार्याची!

हरिहर–तिचें एकदां वपन केलें कीं तिच्यांत वांकडें जाण्याचें सामर्थ्यच उरणार नाहीं. घरांत हल्लीं स्वतंत्रता आहे म्हणून हे वेडेचार सुचतात. बाकी, पोरगी मोठी गरीब आहे हो!

विहार–मीच येऊन याचा योग्य बंदोबस्त केला असता. परंतु येथें मला एक निकडीचें काम असल्यामुळें तिकडे येण्यास फुरसत नाहीं. शिवाय तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहेच! तेव्हां यासंबंधानें जें जें कांहीं करायचें तें तें मीं तुमच्यावर सोंपवितों. तुमचें कदाचित् चंद्रिका ऐकणार नाहीं, म्हणून तुमच्याबरोबर तिला एक पत्र देतों. तें तिला दिलेंत कीं तुम्हांला फारशी तसदी पडणार नाहीं.

हरिहर–हा चकोर तर कांहीं गडबड करणार नाहीं ना?

विहार–त्याचा मीं आधींच विचार केला आहे. तो आतां चंद्रिकेबद्दल मागणी करीत नाहीं, कांहीं नाहीं. त्याचे हातपाय आमच्या कल्याणीबाईंना जखडून टाकिले आहेत. (पत्र लिहितो.)

हरिहर–(एकीकडे) याला म्हणतात चोराच्या उलट्या ! या हरिहराच्या इच्छेच्या आड कोणी आलें की त्याला असाच प्रसाद मिळावयाचा !

विहार–हं, हें घ्या पत्र. (देतो.) मात्र तिला समुद्रतीरीं नेतांना बरोबर कोणीतरी सोबतीला असलें म्हणजे बरें. मी पत्रांतही तसें लिहिलें आहे.

हरिहर–तें नको मला सांगायला! ती वेणुबाई आहेना बाबासाहेबांकडे? तिलाच बरोबर नेऊं म्हणजे झालें. (जातो.)

विहार–(स्वतःशीं) या जगांतील सर्व मनुष्यें चंचलवृत्तीचीं आहेत असें दिसतें. चकोर एका पंधरवड्यांत चंद्रिकेला विसरून गेला. तीही तितक्याच वेळांत त्याला विसरून गेली. पण त्यांनाच दोष कां लावावा ?

(मगुमुशाम चुवोन घात०–या चालीवर)

विश्व अखिल चळ सदाहि । त्यातें न विराम कांहिं ॥
भ्रमण दिसे उडुसमूहिं । अविरत खळ त्यासि नाहिं ॥
॥ ध्रु० ॥ बहु चंचळ अवनिगोल । नरदेहीं अणुहि
चपळ । तन्मतिसी काय नवल । दिसुनि जगीं भ्रमण
येइ ॥ १ ॥

देवानें माझ्या अंगीं इतका खंबीरपणा ठेविला आहे हे त्याचे केवढे उपकार आहेत !

चकोर (प्रवेश करून)–(क्रुद्ध मुद्रेनें) दादासाहेब, तुम्हीं काय मांडिलें आहे हें ? मीं आड उभें राहून त्या नीचाचें आणि तुमचें झालेलें सारें संभाषण ऐकिलें. चंद्रिकेला तुम्ही विरूप करणार ?

विहार–अरे बाबा, तिच्या केंसांची आम्ही गय केली कीं येथील कुटाळ लोक आमच्या डोक्यावरचे केंस राहूं देणार नाहींत. आम्हीं जें

करीत आहांत तें सारें तिच्या बन्या करितां आहे. आतां तुला सांगायला कांहीं हरकत नाहीं. अरे, तिला अशीच ठेविली तर ती खास बिघडणार !

चकोर—या नीचाच्या सांगण्यावर तुम्ही जातां कीं काय ? या मतलबी मनुष्याची पापी नजर चंद्रिकेवर आहे. हें त्याच्याच विश्वासांतल्या वेणूबाईकडून मला कळलें. चंद्रिकेला यानें पुष्कळदां वपनाची भीति घातली. ती जेव्हां बधेना, तेव्हां याने तिजवर कुभांड रचिलें आहे. मीं तुमच्या घरावर मारखा पहारा ठेविला आहे. तुम्हांला जेव्हां वाटतें कीं मी कल्याणीबाईशीं बोलत बसलों आहें, तेव्हां मी तिच्याजवळ नसून तुमच्या घराची टेहळणी करीत असतों.

विहार—मग तुमची कल्याणीबाईवर प्रीति नाहीं तर !

चकोर—छेः ! मुळींच नाहीं ! ती कितीही सुंदर असली तरी मला ती सख्ख्या बहिणीसारखी आहे अशीं मी शपथ वहातों.

विहार—ठीक ठीक ! बरें, आतां तुझें म्हणणें तरी काय ?

चकोर—हा नराधम चंद्रिकेला समुद्रतीरावर नेऊन तिची विटंबना करणार ही माझी खात्री आहे. तर मीच तिच्याबद्दल तेथें जाऊन बसतों. आणि तो लाघवी भाषणें बोलून लाडीगोडी करूं लागला कीं त्याला असा चोप देतों कीं त्यानें जन्मांत कधीं पाहिला नसेल.

विहार—पसंत आहे मला हा बेत !

चकोर—पसंत असेल तर चंद्रिकेच्या नांवचें मला एक पत्र द्या. आणि त्यांत हा मजकूर तिला कळवा. ती तुमच्या अर्ध्या वचनांत असते.

विहार—माझ्याकडून कांहीं हरकत नाहीं पत्र द्यायला. (पत्र लिहितो.)

चकोर—(एकीकडे) अगदीं भोळा सांब आहे ! त्यांतून ताईच्या मरणाच्या खोट्या वार्तेनें याचें मन भांबावल्यासारखें झालें आहे. त्या

शाक्यानें मागितल्याबरोबर यानें त्याला पत्र दिलें, आणि मीं मागितल्या-बरोबर मला देत आहे ! पुन्हां तो भेटला म्हणजे त्याला तिसरेंही देईल तर आपणांला याच्यावर उद्यांपर्यंत चांगली नजर ठेविली पाहिजे.(जातो.)

विहार–(स्वतःशीं) चकोराची प्रीति कल्याणीवर नाहीं हें ऐकतांच मला आनंद कां बरें व्हांवा ? ठीकच आहे. त्यानें तिजवर प्रेम केलें तर तो एक प्रकारचा चंद्रिकेचा उपमर्दच होणार आहे. आणि तिचा उपमर्द तो माझाच नाहीं का ? ठीक ! जुळलें ! शिवाय चकोराची कल्याणीवर प्रीति जडूं नये अशा इच्छेच्या मुळाशीं या आश्रमाच्या कल्याणाची इच्छा-ही आहेच. मुलींना शिकविण्यांत वेळ घालविण्याऐवजीं गुरु जर एकमे-कांच्या सहवासांतच घालवूं लागले तर ही संस्था सुरक्षितपणें चालावी कशी ? याप्रमाणें एक खाजगी आणि दुसरा सार्वजनिक असे माझे दोन हेतु आहेत. ते एकदां या मठ्ठ डोक्यांत ठेंचून ठेविले पाहिजेत. नाहींतर प्रसंगीं विसरून जाईन. पहिला हेतु कोणता बरें ? अरे अरे ! गेला डोक्यां-तून निघून ! हांहां ! आला परत ! पहिला हेतु चंद्रिकेचा उपमर्द होऊं नये हा. आणि दुसरा सार्वजनिक स्वरूपाचा उच्च हेतु, कीं जो माझ्या मनांत पूर्णपणें बिंबला आहे तो कोणता बरें ? तो फारच उच्च असला पाहिजे. कारण तो माझ्या डोक्यांतून वरचेवर उडून गेला. असो, आपणांला आतां या हेतूंशीं तूर्त काय करावयाचें आहे ? आपलें नेहमींचें चिंतन चालू ठेवावें झालें !

(दिंडी)

आड केली दृष्टिच्या सखि यमानें ।
तैशि कल्याणी स्वावगुंठनानें ॥
उभय चिंतिनं त्या तुल्यसौष्ठवांगा ।
कल्पनास्मृति चकविति कलानिसर्गा ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक पांचवा.

प्रवेश १ ला.

(चंद्रिका व वेणूबाई.)

वेणूबाई–तुमच्या भावाचें पत्र झालें म्हणून काय झालें ? ते तुम्हांला वाटेल तें करायला सांगतील का ? आणि ते जर तुमची इच्छा गुंडाळून ठेवितात तर तुम्हांला तरी त्यांचा कल पाहूनच कशाला चालायला पाहिजे ?

चंद्रिका–वेणूबाई, बायका नेहमीं कोणाच्याना कोणाच्या तरी ताब्यांत असावयाच्याच.त्यांना स्वतंत्रता कुठची? मी हल्लीं दादाच्या ताब्यांत आहें. तेव्हां मला त्याच्या मर्जीप्रमाणें नको का वागायला!शिवाय बाबांच्या घरीं असतांना माझा अपमान होण्याची वेळ आली होती, तेव्हां त्यापासून माझी सुटका दादानेंच केली ना? तो उपकार मी त्याची अवज्ञा करून फेडूं लागलें तर तें बरें दिसेल का ?

वेणू–मी यःकश्चित् तुमची बटिक ! पण मींसुद्धां कोणाला आपल्या केंसांना हात लावूं दिला नाहीं. तुम्हीं तर चांगल्या थोरा मोठ्यांच्या आहांत. तुम्हीं नाहीं म्हटलें तर तुमच्या अंगाला हात लावण्याची कोणाची आज्ञा आहे ? जिचें नख सुद्धां परक्याला दिसण्याची मारामार, तिनें आपलें डोकें अनोळखी आणि भिकार न्हाव्यापुढें लववावें कीं काय ? हें कोणत्या मुलखाचें शास्त्र ? आमच्या पुरुषांनीं आपला देश परक्यांच्या स्वाधीन केला तो केला, पण बायकासुद्धां परक्यांच्या हातीं देण्याला त्यांना लाज वाटूं नये हें कशाचें लक्षण?आम्ही विधवा बायका जीं आपलीं सौभाग्यचिन्हें काढून ठेवितों तीं त्यांनींच आतां आपल्या अंगावर घालावीं हें बरें !आम्हीं

आमच्या वेण्या डोक्यांवरून उतरतां,त्या त्यांनीं आपल्या नेभळ्या डोक्यांवर चढवून आमचीं कांकणें आपण भरावीं हेंच चांगलें!

चंद्रिका—वेणुबाई,आपल्या देशांत आज इतक्या विधवांचे होम चालले आहेत, त्यांत माझा एक असला म्हणून काय झालें?

(नाहीं कोणीही हुंगियलें०—या चालीवर)

किति असती मजसम नारी। बहु कष्टी ज्या संसारीं।
प्रणयाविण जगती सारी। अटवीसम भासे ज्यांना॥१॥
निज आप्त गणुनी स्वामी। रत असति सदा सत्कर्मी।
प्रियहृदया पारे या जन्मीं॥ धनिनी नच ज्या हतदैवा॥२॥

त्यांतून मला आतां हे केंस ठेवून काय करायचें आहे? ज्यांच्याकरिता ठेवावयाचे त्यांचें तर मजवरचें प्रेम उडून गेलें. माझ्या केंसांना त्यांच्या स्नेहाचा काय तो आधार! तो स्नेह संपल्यावर त्यांनीं कमें जगावें?

वेणू—त्या मेल्या शाकयानें सांगितलें तें मला मुळीं म्हणतां मुळीं खरें वाटत नाहीं. त्याचें कोणतें खरें असतें म्हणून हें खरें मानायचें आहे? त्यांतून चकोरांचा स्वभाव किती प्रेमळ आहे?

चंद्रिका—फार प्रेमळ आहे म्हणून तर ज्याच्या त्याच्यावर प्रेम करीत सुटतात! मला आतां खरें विचाराल तर या केंसांबद्दल मुळींच भीति वाटत नाहीं; तर त्या मेल्या शाकयाबद्दल वाटते. या निमित्तानें मला दूर नेऊन भलतेंसलतें करायलाही मेला चुकणार नाहीं.

वेणू—त्याची तुम्हाला नको काळजी! मी आणि आपले गडी बरोबर असले म्हणजे त्या मेल्याची कांहीं मात्रा चालायची नाहीं.

गडी (प्रवेश करून)—ताईसाहेब, चकोरमहाराज आले आहेत.

वेणु—जा, पाठवून दे त्यांना इकडे. (गडी जातो.) ताईसाहेब, आतां ते आले कीं नाहीं म्हणजे त्यांच्याशीं चांगलें प्रेमानें बोला बरें! यानंतर तुम्हाला त्यांना तोंड दाखविण्याचा प्रसंगही कधीं येणार नाहीं. हीच त्यांची शेवटची भेट असें समजा.

चकोर(प्रवेश करून)-(स्वतःशीं) चंद्रिकेची दृष्टि एखादा निश्चय करून चुकावा त्याप्रमाणें निश्चल दिसत आहे. आमच्यांतील गतभर्तृकांचे निश्चय त्याच पाळूं जाणत ! (उघड) चंद्रिके, दादासाहेबांच्या पत्राप्रमाणें वागण्याचा तुझा निश्चय झाल्यासारखा दिसतो.

चंद्रिका-त्यांची आज्ञा मला शिरसामान्य आहे.

वेणू-हो, ती आज्ञा यांच्या मस्तकानें मान्य केली आहे, इतकेंच नाहीं तर त्यांच्या रोमारोमानेंसुद्धां केली आहे.

चकोर-पण दादासाहेबांनीं आपला बेत हल्लीं बदलला आहे.

चंद्रिका-घटकेघटकेंत आपला बेत बदलणारे दुसरे कोणी असतील ! ते नाहीत हें खास !

चकोर-तर मग तुझा मजवरचा विश्वास पार उडाला ? चंद्रिके,

(शामसुंदर कंसारी०-या चालीवर)

सांडिला विश्वास कसा। प्रेमाचा तो श्वास जसा। श्वास न कीं आत्माचि तसा ॥ ध्रु० ॥ प्रमाद काय मजकडुनि घडला घडवि जो अविश्वास असा ॥ १ ॥

चंद्रिका-विश्वास रहावा कशाच्या आधारावर ? जिकडे आपलें प्रेम उडून गेलें तिकडेच विश्वासही उडून गेला.

चकोर-तूं कल्याणीबाईबद्दल म्हणत असशील.

चंद्रिका-आपण माझ्या मनांतलें बरोबर ताडलें हें मोठेंच नवल ! मी कांहीं त्या बाईचें नांव घेतलें नव्हतें! आणि मला आतां दुसऱ्याच्या नांवाशीं करायचें आहे तरी काय ?

चकोर-माझेंही नांव तूं सोडणार, तर ? हा आपल्या विवाहास कुशकुनच म्हणावयाचा ! कारण बायका आपल्या पतीचें नांव घेत नसतातच !

चंद्रिका—आपण कांहीं आतां लहान नाहीं, म्हणून प्रेम एकीकडे आणि लग्न भलतीकडे असा आपला प्रकार होईल.

चकोर—चंद्रिके, मीं तुझ्या दादाजवळ शपथपूर्वक सांगितलें, तसें तुझ्याजवळही सांगतों कीं, कल्याणी माझ्या सख्ख्या बहिणीप्रमाणें आहे. तिच्याबद्दल जर माझ्या मनांत कधीं पाप आलें असेल तर ही जिव्हा झडून जावो !

चंद्रिका—मग तिच्याबरोबर एकांतांत गोष्टी कशाला करायला हव्या?

चकोर—त्याचा उलगडा मी लवकरच करणार आहें. लोकांच्या मनांत असे भलते भलते संशय यावे हें आश्रमालाही अंतीं अपायकारकच आहे. म्हणून मला याचा लवकरच खुलासा केला पाहिजे. तोंपर्यंत तुझा मजवर-चा अविश्वास असूं दे पाहिजे तर. दादासाहेबांनीं आपला पहिला बेत बदलला याबद्दल तुझी खात्री होत नसेल तर हें पहा पत्र.(पत्र देतो. चंद्रिका वाचते.)

चंद्रिका—उद्यां माझ्या जागीं आपण जाऊन बसणार असें यांत लिहिलें आहे.

चकोर—उद्यांचेंच कशाला ? तूं जेथें असशील तेथें माझें नेहमींच वास्तव्य व्हावें अशी या हृदयाची इच्छा आहे. बरें, उद्यां सकाळीं त्यानें समुद्रावर केव्हां बोलाविलें आहे ?

वेणू—पहांटे चार वाजण्याच्या सुमारास. माझ्यावर त्या मेल्याचा पक्का भरंवसा असल्यामुळें त्यानें त्या वेळेला ताईसाहेबांना नेण्याचें काम निर्धा-स्तपणें माझ्यावरच टाकिलें आहे.

चकोर—संकेतकालावरूनसुद्धां त्याचा दुष्ट आणि पापी हेतु दिसून येतो. पहांटे चार वाजतां, कीं ज्यावेळीं तेथें चिटपांखरूंही नसणार, अशा वेळीं तेथें बोलावयाचें दुसरें काय प्रयोजन असणार आहे ?

वेणू—तें आम्हां बायकांना काय माहित !

चकोर-ठीक आहे तर. उद्यां मी आणि वेणूबाई ठरलेल्या वेळीं संकेत स्थलीं जाऊन बसणार. वेणूबाई, तुमचा अजून सगळ्या पुरुषांवरचा विश्वास उडाला नाहीं ना ?

वेणू-मी मोठ्या आनंदानें तुमच्याबरोबर येईन.

चकोर-त्याबद्दल मी तुम्हांला बक्षीसही चांगलें देईन. त्या दुष्टाला मरे मरे तों मारून तुमचे डोळे निववले म्हणजे झालें कीं नाहीं ? मात्र तुम्ही मजबरोबर यायला चंद्रिकेची संमति पाहिजे. कारण ती जरी माझ्या इच्छेविरुद्ध वागली तरी मी तिच्या इच्छेबाहेर केंसभर सुद्धां वागणार नाहीं.

वेणू-मघांशी तुम्ही ताईसाहेबांच्या मनाविरुद्ध केंसभर वागायला तयार झाला होतां, तें विसरलांत वाटतें इतक्यांत ?

चंद्रिका-आपण जो उलगडा करण्याचें कबूल केलें आहे तो ऐकल्या-वर मग याचा काय तो जबाब देईन. नाहींतर आपला तरी जबाब घेईन.

चकोर-तुझी आज्ञा प्रमाण आहे.

(जातात.)

प्रवेश २ रा.

(हरिहरशास्त्री.)

हरिहर-(स्वतःशीं) मी ज्या संधीसाठीं टपून बसलों होतों ती आली नाहीं ती नाहींच. शेवटीं दांडगाईनें घरांत शिरून आनंदरावांना भेटण्या-शिवाय इलाजच राहिला नाहीं. त्यांच्यासारख्या भित्र्या मनुष्याला माझ्या भेटीचा हेतु कळल्यावर ओरड करण्याचें किंवा मला माराचा धाक दाखविण्याचें धैर्यच होणार नाहीं. शिवाय त्यांच्यासारख्या फाजील शिपाई माणसाच्या मनांत माझें भाषण अंकुरही तेव्हांच धरील. सुसभुषित वाक्-

नींत बी तेव्हांच रुजतें असा नियम आहे. एकदां त्याला संशय येऊन त्यानें माझ्या बोलण्याचा खरेपणा पडताळून पहाण्याची संधि आणिली म्हणजे मग पुढील गोष्टीची मला मुळींच फिकिर नाहीं. कारण मनोहराचें ठाणें सरस्वतीच्या रंगमहालांत बसण्यापूर्वींच तीं परस्परांवर फिदा होतीं. त्यानंतर इतक्या दिवसांचा एकांत सांपडल्यावर त्याचा त्यांनीं उपयोग करून घेतला नसेल हें संभवत नाहीं. तर आतां मनाचा धडा करून शिरावेंच आंत आणि भीडमुर्वत न ठेवितां एकदम सर्व ओकून टाकावें. मी आतां आनंदरावांचा आश्रित नसल्यामुळें त्यांची भीड ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. (पडद्यांत जाऊन पुन्हां प्रवेश करितो.)

आनंदराव—(प्रवेश करून) तुम्हाला सांगितलें ना या घरांत पुन्हां पाऊल टाकायचें नाहीं म्हणून ? अरे कोण आहेरे तिकडे ?

हरिहर—मी घरांत पाउल टाकायचें नाहीं आणि इतरांनीं मात्र घरादारांत वाटेल तेथें प्रवेश करायचा हा कुठला पक्षपात ? आपण ओरडून चार मंडळी गोळा कराल तर त्यांत आपणालाच पश्चात्ताप होणार आहे.

आनंदराव—मला नाहीं उमजत हें तुमचें कुचकें बोलणें.

हरिहर—कुचका आणि आंतल्या गांठीचा मनुष्य पुरवला, पण आपल्यासारखा भोळा सांब नाहीं उपयोगी. अहो, आपलें स्त्रीधन चोरानें चोरून नेलें, आणि आपण स्वस्थ घोरत पडलां आहांत !

आनंदराव—सरस्वतीचें स्त्रीधन कीं काय ?

हरिहर—आपलें स्त्रीरूपी धन ! सरस्वतीचें कुठलें ? ती तर चोराला सामील असणार ! अजून नाहींना लक्ष्यांत येत ? बरोबर आहे ! स्त्रीचें कुकर्म पतीला सगळ्यांच्या मागाहून समजायचें !

आनंदराव—दुष्टा, काय म्हणतोस ? सरस्वतीच्याकडून असें कृत्य ? कधींही होणार नाहीं ! या शब्दांबद्दल तुला मात्र येथल्या येथेंच प्रायश्चित्त देतों.

हरिहर–मी म्हटलें तें खोटें नाहीं. आपली खात्री सर्वांच्या शेवटीं व्हावयाची !

आनंदराव–मूर्खा, नुसत्या तुझ्या शब्दांनीं माझी खात्री होण्याची आशा बाळगतोस ? थांब, तुला नोकरांकडून जेरबंदानें माराविलें पाहिजे.

हरिहर–आणि माझी खात्री केली पाहिजे, असेंच ना ? हें पहा, असे संतापून जाल तर आपली खात्री कशी करायची ? खात्री होण्याला विचारशक्ति जागेवर पाहिजे; आणि ती जागेवर असायला डोकें शांत पाहिजे.

आनंदराव–बरें, तसें कां होईना ! माझ्या स्त्रीधनाचा चोर कोण म्हणतां ?

हरिहर–ज्यानें लोकांच्या शंभराहून अधिक विधवा चोरून त्यांचा जनानखाना बनविला आहे त्या विधवांच्या कनवाळूपेक्षां दुसरा कोणता असणार ? त्याला सरस्वतीबाईचीही कींव आली.

आनंदराव–कोण ? मनोहरपंत ? मग झाली माझी खात्री !

हरिहर–झाली ना अगदीं पूर्ण खात्री ?

आनंदराव–होय ! कीं एकतर तुम्ही वेडे आहांत किंवा हें सारें कुभांड आहे. अहो, त्या पुरुषाची योग्यता काय, तुमची काय, वाटेल त्यानें जीभ उचलावी आणि लावावी टाळूला म्हणजे काय ? अहो, मनोहरपंत म्हणजे सामान्य मनुष्य नव्हे. कोणाला परगांवीं जायचें असलें आणि बायकोला बरोबर नेण्याची अडचण असली म्हणजे खुशाल तिला त्यांच्या हवालीं करून जावें.

हरिहर–आणि परत आल्यावर सव्याज परत घ्यावी असेंच कीं नाहीं ?

आनंदराव–शिवशिव ! काय बोलतां हें ? ज्यांच्या कीर्तीला अजुन निंदेनें स्पर्श केला नाहीं–

हरिहर–त्यानें आपल्या कुटुंबाला कसा स्पर्श करावा म्हणतां ?

आनंदराव–हो हो ! असेंच म्हणतों मी !

हरिहर--अहो, मनोहरपंत म्हणजे वसुधैवकुटुंबकवृत्तीचे थोर गृहस्थ ! सगळी दुनिया त्यांचें कुटुंबच !

आनंदराव-काय घाणेरडे हे शब्द ! हें पहा या गोष्टीचा पुरावा नसेल तर यांपैकीं प्रत्येक शब्द तुम्हाला चांगला जाचेल बरें ?

हरिहर-आपण पुरावा मागतां हें योग्यच आहे. जो मनुष्य हलक्या कानांचा असतो त्याचे कान लांबी मुळे जडही असतात. पण आपणांला पुरावा कसा पाहिजे ? तीं दोघेंजण एका खोलींत एकत्र असलीं तरी आपली खात्री थोडीच व्हायची आहे ? कारण आपण स्वतःच तर शिक्षणाचें निमित्त पुढें करून त्यांना प्रहरन् प्रहर कडयाकुलुपें घालून कोंडून ठेवीत असतां !

आनंदराव-त्यांचें संभाषण तर आड उभें राहून ऐकायला सांपडेल की नाहीं ?

हरिहर-सांपडेल तर ! आणि त्यावरून आपली खात्रीही होईल.

आनंदराव-ठीक आहे. उद्यां रविवार आहे ना ? मनोहरपंत उद्यां सरस्वतीला नेहमींप्रमाणें संध्याकाळचे शिकवायला येतील, त्या वेळीं तुम्ही येऊन मला आमच्या घराचे पिछाडीस भेटा. म्हणजे काय तो सोक्ष-मोक्ष होउन जाईल. मी त्या वेळीं बाहेर गेल्याचा बहाणा करीन म्हणजे झालें.

हरिहर-मला उद्यां मज्जाव मात्र होऊं नये. (जातो.)

आनंदराव-(स्वतःशीं) मीं मूर्खानें माझ्यापेक्षां तिसांहून अधिक वर्षांनी लहान अशा मुलीशीं लग्न केलें याचे परिणाम कोठवर जाणार कुणास ठाऊक ! यापेक्षां मीं तीसपस्तीस वर्षांच्या विधवेशींच लग्न लाविलें असतें तर किती चांगलें झालें असतें ! माझ्या शीला माझ्या उदार वर्तनाचे असंख्य उपकार वाटून ते कसे पेंडू असें होऊन बसले असते. शिवाय समान वयामुळें तिचीं माझीं मतेंही बरीच जुळलीं असतीं. मी

पुनर्विवाह केला असता तर या दुर्धारकांनीं मात्र कुचेष्टा मांडली असती. पण सरस्वतीचें वर्तन खरोखरच गैर असलें आणि तें जगजाहिर झालें तर कोण माझी गय करणार आहे? सुधारक आणि दुर्धारक यांचें माझी थट्टा करण्यांत मात्र एकमत होईल. कारण परस्त्रियांच्या कुटाळक्या करणें कोणाला नको असतें ? आतां माझा सारा भरंवसा मनोहरपंतांवर आहे. आणि ते माझ्या आशेची निराशा करणार नाहींत अशी माझी मनोदेवता सांगत आहे. पण या हरिहरशास्त्र्याला माझें घर बंद करण्याला मनोहरपंतांनींच सुचविलें नव्हतें का ? तें काय म्हणून? सर्व घर निर्मक्षिक करून सरस्वतीशीं एकांत मिळवावा म्हणून तर नसेलना? पण आतां विचार कशाला पाहिजे? हा सूर्य आणि हा जयद्रथ हें पहाण्याची वेळ जवळच आली आहे. (जातो.)

प्रवेश २ रा.

(देवालयांत चकोर लपून बसला आहे.)

हरिहरशास्त्री (प्रवेश करून)—(स्वतःशीं) चंद्रिका या देवळांत माझीच वाट पहात बसली असेल. (वेणूबाई प्रवेश करिते.) कसें काय वेणूबाई ? आहे ना सगळी तयारी ?

वेणू—त्या येथें येऊन बसल्याला कितीतरी वेळ होऊन गेला! अशा कामांत तुमच्याकडूनच उशीर व्हावा हें एक आश्चर्यच म्हणावयाचें !

हरिहर—आतां आणखीं बोलून वेळ घालविण्यांत काय अर्थ? चंद्रिकेला कडकडून भेटावयाला मी कसा उतावळा झालों आहे !

वेणू—(एकीकडे) मेल्या, तुला चांगली कडकडून भेट मिळेल! (उघड) मी आतां जाऊं होतें. दोघांत तिसरें कशाला पाहिजे ?

हरिहर—मीसुद्धां तेंच सुचविणार होतों तुला. (वेणूबाई जाते. देवळांत प्रवेश करून स्वतःशीं) आंत अगदीं अंधार दाटून आहे. पण माझा

कामाला उजेड कशाला पाहिजे ? चंद्रिकेनें माझ्या अंतःकरणांत जो प्रकाश पाडिला आहे त्याहून दुसऱ्या प्रकाशाची येथें कांहीं जरूर नाहीं. देवळांत अशीं कृत्यें करण्याला प्रथम प्रथम मला धैर्यच होत नसे. पण आतां मी इतका निर्ढावलों आहें कीं या गोष्टी देवाला साक्षी ठेवून करण्यांत मला कांहींच दिक्कत वाटत नाहीं.(उघड)प्रिये चंद्रिके,आतां तरी माझ्या म्हणण्याला कबूल हो. म्हणजे अजून तुझी सुटका होऊन तुझा केशकलाप संपूर्ण स्थितींत राहील.तुझ्या मुखचंद्रावरील केशकलापाचा कलंक जर तुला ठेवावयाचा असेल तर तुझ्या आचरणाला थोडासा कलंक लावून घेण्याला तुला तयार झालें पाहिजे.

चकोर–(एकीकडे) अरे दुष्टा !

हरिहर–तुला लोकापवादाची भीति असेल तर अशा गाढ अंधकारांत मला दिलेलें गाढ आलिंगन लोकांना कसें कळणार ? पृथ्वीच्या पाठीवर अशीं किती तरी माणसें आहेत कीं जीं अंधारांत वाटतील तीं कृष्णकृत्यें करून दिवसा उजळ माथ्यानें संचार करितात. तुला देवाचें भय वाटत असेल तर एखाद्या पोथीचें एक जरी पारायण केलेंस, तरी एकच काय ? शेंकडों जन्मांचीं पातकें धुतलीं जातील. तुझा चकोर तर तुझ्या पकडींतून पार निघून गेला आहे.

चकोर–(एकीकडे) दुष्टा, माझ्या पकडींत पुरा सांपडलास आतां !

हरिहर–तर मग आतां आलिंगन देण्याला विलंब कां लावितेस ?

चकोर–(एकीकडे) हा पहा तयारच आहें ! (उभा रहातो.)

हरिहर–काय ? तुला माझी विनंति मान्य झाली शेवटीं ? अहाहा ! धन्य ! धन्य आहें मी आज ! (चकोरास आलिंगन देतो. चकोर त्यास आंवळून मारतो.)

हरिहर–अग वेणे, माझा गळा कापिलास ग !

चकोर—तुला एका अनाथ मुलीची वेणी पाहिजे होती ना ? मग वेणीनें तुझा गळा कापिला यांत काय वाईट केलें ? तूं किती अबलांचे केंसानें गळे कापिले असशील!

हरिहर—मूर्खा चकोरा ! तुला मी दाद देणार आहें कीं काय ? (दोघांची झोंबी सुरू होते. दोघे पडद्यांत जातात.)

वेणुबाई(प्रवेश करून)—काय म्हणतां मीं तुमचा गळा कापला ? मग माझा आणि माझ्या बाळाचा गळा कापतांना नाहीं हो तुम्हांला कांहीं वाटलें ? (हरिहरशास्त्री पडद्यांत ओरडतो.) मर मेल्या ! मर असाच !

चकोर—(प्रवेश करून) वेणूबाई, त्याला बेदम मार देऊन तसाच निपचित ठेवून आलों. फिटलें ना तुमच्या डोळ्यांचें पारणें ? चला तर घरीं.

(जातात.)

प्रवेश ४ था.

(तरंगिणी, जोगी, असावरी, भैरवी.)

जोगी—कल्याणीबाई, तुम्हांला बरें वाटत नाहीं असें कळलें मात्र, आणि मला जें कांहीं झालें तें विचारूं नका !

(नित काग उडादी मैं०—या चालीवर)

मम मानस बावरलें । सगळें धैर्य गळे मुखकांति पळे ॥
॥ ध्रु० ॥ एकाएकीं माता जेवीं । शयनीं रोगें ग्रस्त
पडावी । काळजि तेविं मर्मी उमळे ॥ १ ॥

तरंगिणी—बाळे जोगी, इतकें घाबरण्यासारखी कांहीं मी आजारी नाहीं.

असावरी—नाहीं तर काय ?

(काना न करत मुसे रार०—या चालीवर)

सुटत बहुत या कंप देहीं। घर्म फुटे रोमारोमाप्रति। रोमांच उठे वदनींही ॥धु०॥ रोगाचीं हीं उघड लक्षणें। शंका कां मनिं निपजे ही ॥ १ ॥

तरंगिणी–(एकीकडे) तिकडच्या भेटीच्या उत्सुकतेमुळें माझी झालेली चमत्कारिक अवस्था रोगामुळें झाली असेंच या समजतात! भोळ्या बिचाऱ्या !

भैरवी–तें कांहीं असो, तुम्हीं बऱ्या असा किंवा वाईट असा. आम्हीं तिघींनीं तुम्हांला बरें वाटावें म्हणून या वस्तु आणिल्या आहेत, त्या तुम्हीं अवश्य घेतल्या पाहिजेत.

(माइ सरसती शारदा०—या चालीवर)

आम्हि मिळुनियां आणिली। रम्य सुगंधी सुमांची माळ रचुनि उटिहि करूनी त्या आगळी॥ धु० ॥ द्यावेंत शीत विमल पेय अमृताहुनिही बहुत मधुर साचें। विंझणेहि वाळयाचें। प्रकृति क्षणिं करितिल हीं चांगली ॥ १ ॥

तरंगिणी–(एकीकडे) रंगमहालाची सगळी तयारी आयती झाली ! आतां तिकडच्या येण्याचाच काय तो उशीर आहे ! (उघड) वेड्या कुठच्या ! अग, ताप बरा व्हावा म्हणून कोणी असले का उपाय योजितें? यावरून तुमचें मजवरचें निर्मळ प्रेम मात्र दिसून आलें खरें. बरें, ठेवा तें सगळें साहित्य खालीं आणि जा खेळायला. मला आतां जरा स्वस्थता पाहिजे. (मुली जातात. स्वतःशीं) कल्याणीचा हा आजार शेवटचाच म्हणावयाचा ! कारण आतां दोन घटिकांतच तिचा अंत होऊन तरंगिणीचा पुन्हां जन्म होणार ! तिकडच्या भेटीच्या विचारानें मला एकपरी आनंद आणि दुसऱ्यापरी खिन्नता वाटूं लागली आहे. जर माझे प्रियकर कल्याणीच्या मोहाला बळी पडले नाहींत तर पत्नीच्या नात्यानें आनंद, पण बहिणीच्या आणि भावजईच्या नात्यानें विषाद वाटेल. जर ते त्या सटवीच्या पाशांत पडले तर चकोराचें आणि चंद्रिकेचें लग्न लागणार म्हणून

संतोष, परंतु माझे पति इतक्या चंचल चित्ताचे आहेत म्हणून वाईट वाटेल. पण या अपुऱ्या जगांत एकाचें सुख तें दुसऱ्याचें दुःख असें चाला-वयाचेंच! ही आलीच वाटतें स्वारी! आतां पलंगावर आजाऱ्याचें सोंग घेऊन पडलें पाहिजे.

(पलंगावर पडते. विहार प्रवेश करितो.)

विहार—(स्वतःशीं) चकोरानें ही वार्ता सांगितल्याबरोबर माझी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली!

(जो तूं रचो समान०—या चालीवर)

हें कळे न काय होत। कल्याणी अंगिं आर्त। परिसुनि हें कानिं वृत्त। भ्रांतचित्त बनुनि जात॥ ध्रु०॥ तत्परि-चय परम अल्प। सहवासहि मासकल्प। नच विकल्प। प्राण तरिहि तदायत्त। पूर्ण गमत॥१॥

तिचा आणि माझा अध्यापनाचा उच्च हेतु एकच असल्यामुळें आमचा स्नेह इतका जडून गेला आहे कीं, तिजवांचून मला आणि मजवांचून तिला मुळींच करमत नाहीं. पुरुषापुरुषांचा स्नेह जमतो त्यापेक्षां स्त्रीपुरुषांचा फार लवकर जमतो हें अगदीं खरें आहे. तशांतून तिचें प्रियेशीं सादृश्य असल्या-मुळे तिच्या स्नेहावर माझा एक प्रकाराचा हक्कच असल्यासारखा वाटूं लाग-ला आहे. देवा! हा आमचा निरपेक्ष स्नेह असाच चिरंकाल राहूं दे.(उघड) कल्याणीबाई, तुमची प्रकृति बरी आहे ना?

तरंगिणी—आतांपर्यंत फारशी चांगली नव्हती; पण आपण आल्यापासून जरा बरें वाटायला लागलें आहे.

विहार—(एकीकडे) हिचें मजवर किती तरी प्रेम हें! चकोराशीं जर ती विचित्र प्रतिज्ञा केली नसती तर—शिवशिव! विहारा, या कोण विचाराला हृदयांत थारा देतोस? अरे याच हृदयांत तूं जिवलग तरंगि-णीला स्थान दिलें होतेंस ना? आणि तें असें भ्रष्ट करितोस? धिःकार असो तुला!

(हंसरे राजा ये पिंजरा०—या चालीवर)

अवचित कां विस्मरसी गत गोष्टी । कां भंगिसि शपथ अनुघटी ॥ ध्रु० ॥ परनारी ही त्याज्य तुला रे । न पड तियेच्या कपटीं ॥१॥ लंपट करि तुज मासमात्र का वास इयेच्या निकटीं ॥ २ ॥

मीं एके ठिकाणीं असें वाचिलें आहे कीं ज्याला सद्गुणी व्हावयाचें असेल त्यानें अंनर्यामींच्या इच्छा मारिल्या पाहिजेत.तर आतां हिच्याकडे पहाण्याची जी मला अनावर इच्छा झाली आहे तिचा बीमोड केला पाहिजे. (थांबून) झाला माझा पूर्ण मनोजय झाला!आतां पहिली इच्छा जाऊन हिजकडे मुळींच पाहूं नये अशी नवीनच इच्छा उत्पन्न झाली आहे. पण पहिल्याप्रमाणें याही इच्छेचा भंग करावयास नको का?अलबत केला पाहिजे.तर आतां इच्छेविरुद्ध हिजकडे एकदां डोळे भरून पहावें, आणि येथें आलों आहोंत त्याप्रमाणें नुस्त्या स्नेहाचें वर्तन करून परत फिरावें. (उघड) कल्याणीबाई, मला थोडें वैद्यक समजतें. तुमची परवानगी असेल तर तुमची नाडी पहातों.

तरंगिणी-(एकीकडे) अजून कांहीं सांगवत नाहीं यांचा नेम ! हें सारें शुद्धभावानेंच चाललें असेल. (उघड) मला पतिवियोग झाल्यापासून माझ्या हाताला अजून परपुरुषाचा स्पर्श झाला नाहीं. पण आपला व माझा स्नेह विशेष, म्हणून आपणांला हात दाखवायला माझी कांहीं हरकत नाहीं. हो पहा.

विहार-(नाडी पहात स्वतःशीं) अहाहा ! काय हिचें हें स्पर्शसुख! (डोळे मिटून) मला वाटतें कीं मीं तरंगिणीचाच हात धरिला आहे! (उघड) तुम्ही मजवर इतका विश्वास ठेवितां याबद्दल मी तुमचे आभार मानितों. माझाही तुमच्यावर असाच विश्वास आहे.

(दिंडी)

प्रथम दर्शन अपुलें घडे क्षणीं त्या ।
स्नेह निष्कारण निपजला हृदीं या ॥
अचल वस्तुहि कर्षितें परस्परांसी ।
अयस्कुंबकमणि जेंवि निकटवासी ॥ १ ॥

खरें पाहूं गेलें तर तुम्ही परस्त्रीच. पण आपला स्नेह जडल्यापासून माझ्या मनांतून आपपरभाव अगदीं मावळून गेला आहे. याला कारण पूर्वजन्मींचा कांहीं संबंध नसेल ना ?

तरंगिणी–(एकीकडे) याच जन्मांतला संबंध ! आणि तोही अत्यंत निकट !

विहार–तुमची नाडी पाहिली मीं. पण नाडीपरीक्षेवरून कळलेल्या गोष्टी मुखपरीक्षेवरून पडताळून पहाव्या लागतात. तर तुमची नाखुषी नसेल तर तुमचें मुखकमल–नव्हे मुखचंद्र–तसेंही नव्हे, नुस्तें मुख पाहीन म्हणतों.

तरंगिणी–(एकीकडे) भटाला दिली ओसरी, आणि भट हातपाय पसरी ! (उघड) हें पहा, माझा द्वितीय विवाह होईपर्यंत मी कोणालाही तोंड दाखविणार नाहीं अशी शपथ वाहिली आहे. आमच्या गुजराथेंत कांहीं कुटुंबांत दक्षिणी ब्राह्मण बायकासुद्धां बुरखा घेतात. तो बुरखा मला ही शपथ पाळण्याचे कामीं फार उपयोगीं पडला.

विहार–बरें, अशी शपथ वहाण्याचें कारण ?

तरंगिणी–कारण पुरुष नेहमीं बाह्य सौंदर्यालाच प्रथम भुलून लग्न करितात आणि नंतर आपल्या बायकांचा वीट आल्यावर त्यांना नानाप्रकारें छळतात, असा मला पहिल्या लग्नाचा अनुभव आला. तेव्हां केवळ माझे गुण ओळखून जर कोणी माझ्याशीं विवाह लावील तर त्यालाच तोंड दाखवायचें, इतरांना नाहीं, असा मीं संकल्प केला आहे.

विहार–पण नुस्ता चेहरा बुरख्याच्या आंत लपवून हा कार्यभाग कसा सिद्धीला जाणार ? हे कोमल हात, शरीराची ही ठाकठिकीची ठेवण, मंजुळ आवाज, मोहक गति, या घरभेद्या वस्तु तर लपत नाहींत ना ? वेलीचे कोमल पल्लव पाहून तिच्या पुष्पांविषयीं अनुकूल अनुमान काढणार नाहीं असा एक तरी मूर्ख जगांत दिसून येईल का ?

(बारे दसरथके प्यारे०—या चालीवर)

सुंदर वदन नसेल कसें। अवयव इतर जरी सुरुचिर हे असती लावण्यें खचलेसे ॥ ध्रु०॥ ऐशी अवयवपंक्तिसमस्या। दिधली जरि रसिका उकलाया। पुरविल कल्पुनि मोहक आस्या। संशय यांत न भासे ॥१॥

तुमच्या लावण्याची पूर्ण कल्पना मला यापूर्वीच होऊन चुकली आहे. मग शपथ उगीच शब्दशः पाळण्यांत काय अर्थ ? तर त्वरा करून मला तुमचें मुख पाहूं द्या.

तरंगिणी—बायका पुरुषांप्रमाणें चंचळ नसून एकवचनी असतात.

(लो फूल जानी०—या चालीवर)

बहु चंचला खरी ही। दिसुनी नृजाति येई ॥ सारी ॥ध्रु०॥ विमला निशा ही नारी। अचलव्रतानुसारी। परि चंद्र चंचल भारी ॥ १ ॥ सरिता त्यजि न मर्यादा। अनुसरे पतिसि रागांधा। परि वारिधि निजलहरी॥२॥

विहार—पुरुषांच्या स्थैर्याचे आणि बायकांच्या चंचलपणाचे नाहीं का दाखले देतां येणार ?

(मुलामिटा दिलावे०—या चालीवर)

घन नभीं स्थिर असे पाहीं। चंचला तडिल्लता परी सदाहि ॥१॥ तरु वसे सदा स्थिरदेही। हालते लता समीरहुंकृतींहिं॥२॥ ध्रुव तसा अचल पदिं राही। तारका तदाश्रिता विलोल मोहिं ॥ ३ ॥

पण अशा निरर्थक गोष्टींत वेळ घालवून काय फायदा ? वेळींच परीक्षा न झाल्यामुळें पुष्कळदां रोग असाध्य होऊन बसतात. मला तुमच्या रोगाची फार काळजी लागली आहे. मुखपरीक्षा झाली असती म्हणजे मग औषध सुरू करितां आलें असतें.

तरंगिणी—परीक्षा नीट न झाल्यामुळें माझा रोग विकोपाला जाऊन माझा प्राण जाईल येवढेंच ना ? त्याला माझी तयारी आहे.

विहार–तुमची असेल, पण तुमच्या मित्रमंडळीची नाही ना! काय करावें बोवा? मोठी अडचण येऊन पडली आहे. तुम्ही आपला बुरखा दूर करीत नाहीं. तो दूर नाहीं झाला कीं मुखपरीक्षा होणार नाहीं. ती झाली नाहीं कीं रोग दुर्धर होणार. आणि तसा झाला म्हणजे–छे: ! तो विचारच असह्य आहे! आतां मीही तुमच्याप्रमाणेंच एक प्रतिज्ञा करून चुकलों आहें, कीं पुन्हां लग्न करावयाचें नाहीं. आतां मीं तुमच्याशीं लग्न केलें तरच तुम्ही मला बुरखा दूर करूं देणार आणि मीं लग्न केलें कीं माझी प्रतिज्ञा मोडणार. याप्रमाणें आपल्या दोन्ही प्रतिज्ञांचा कलह सुरू होऊन वेळ मोठया आणीबाणीची आली आहे. आतां माझी ही पक्की खात्री आहे कीं तुम्ही स्त्रीजातीच्या असल्यामुळें आपला हेका कांहीं केल्या सोडणार नाहीं. मलाच आपला सोडावा लागणार. पण लेह्याच्या जिवाकरितां आपली प्रतिज्ञा मोडण्याला काय हरकत आहे? कृष्णानें नाहीं का अर्जुनाकरितां सुदर्शनचक्र हातीं घेतलें? मग मला तरी हें सुदर्शन मुखमंडल स्वीकारण्याला काय प्रत्यवाय आहे?

तरंगिणी–या गोड गोड गोष्टी आतां पुरे झाल्या. गोडाची तेव्हांच तोंडाला मिठी बसते.

विहार–गोडाची मिठी बसते असें तुम्ही म्हणतां, पण तुमच्या गोड हातांची माझ्या कंठाला अजून मिठी बसत नाहीं.

तरंगिणी–पुन्हां तेंच! हं सांगा लवकर आपला निश्चय?

विहार–सुंदरि, झाला माझ्या मनाचा धडा!

(मिउं नको जिवलग सुंदरि०–या चालीवर)

तव पदिं अंकित किंकर वाहीं तनुलागि मम सुंदरि ॥ धृ० ॥ स्थिति तव दुर्धर झाली रोगोपशमा योजि दास निर्धारीं। पुलकित कृश तनु टोंचितसे या हृदया कंप पावते भारी। मुखिं अवगुंठन राहे हो न परीक्षा पूर्ण तेणें अवधारीं। त्यातें दूर करीं ॥ १ ॥

तरंगिणी–पण आपण आपल्या पहिल्या पत्नीच्या मरणानंतर एके महिन्याच्या आंतच दुसरें लग्न करण्याला तयार झालांत यावरून एक तर आपला लहरी स्वभाव दिसतो–

विहार–लहरी ? मुळींच नाहीं.

तरंगिणी–किंवा आपली पहिली पत्नी आपली अशी तशीच असल्या-मुळें तिजवर आपलें प्रेम नसेल.

विहार–हां, असा कांहींसा प्रकार होता खरा ! ती स्वभावानें जरा हट्टी होती.

तरंगिणी–पण मीही तशीच आहें हें आपल्या निदर्शनाला येऊन चुकलेंच आहे.

विहार–शिवाय तिचें रूप या सौंदर्याच्या पासंगालाही पुरण्यासारखें नव्हतें. तिचें तोंड होतें आपलें ओबडधोबडच ! पण बाबांनीं लहानपणीं गळ्यांत बांधिली होती. टाकायची आहे थोडीच !

तरंगिणी–आपण म्हणे पुर्नविवाहाला फार विरुद्ध होतां ?

विहार–प्रथम विरुद्ध होतों, पण मजवर विधुरावस्थेचा प्रसंग आल्या-नंतर माझ्या मनांत त्यासंबंधानें विचार घोळावयाला लागून हल्लीं माझें मत असें झालें आहे कीं विधुराला लग्न करावयाचें असलें तर गतभर्तृकेशींच करावें. त्यांनें बालिकेशीं लग्न करणें म्हणजे तिजवर अकालीं मृत्यु ओढून आणण्यासारखेंच आहे. सुंदरि, आतां यासंबंधानें अधिक चर्चा न करित आपल्या मुखचंद्रावरील परिवेष दूर कर.

तरंगिणी–माझें तोंड पाहिल्यावर घाबराल बरें का ! सांगून ठेवितें. कदाचित् आपल्या पहिल्या कुटुंबाच्यासारखें ओबडधोबडच दिसून येईल.

विहार–काय हा विनय !

तरंगिणी–हा सारला बुरखा बाजूला–(बुरखा काढिते; विहार भीतीनें मागें सरतो.)

विहार–भूत ! भूत !

तरंगिणी–हं, ओरडूं नका. मी आपली धर्मपत्नी तरंगिणी आहें.

विहार–तूं तरंगिणी ? मग कल्याणी कुठें आहे ?

तरंगिणी–तिला मोठा रोग जडला होता त्यानें ती नुक्तीच मरण पावली.

विहार–पण तरंगिणीही मरण पावली होती ! ही काय भुताटकी आहे कोण जाणे ?

तरंगिणी–अजूनही माझी ओळख पटत नाहीं का ?

विहार–माझ्या जागीं जर एखादा श्रद्धाळू असता तर त्यानें तुझीं पावलें उलटीं आहेत का हें पाहिलें असतें.

तरंगिणी–माझें पाउल कधीं कोणाला उलटें दिसायचें नाहीं. असे बावरूं नका.आपल्या प्रेमाची कसोटी पहाण्याकरितां आणि साधल्यास चकोर, चंद्रिकेचा विवाह घडवून आणण्याकरितां मीं मेल्याचें खोटेंच उठविलें आणि कल्याणी हें नांव घेऊन आपली परीक्षा पाहिली तिच्यांत आपण चांगलें उतरलांत !

विहार–प्रिये,

(सर्वांहि सोड राग०–या चालीवर)

लज्जानंद गमति अंतरीं । समयीं एका ॥ पात्र न मी त्वत्प्रेमा तरी । पुनरपि लाधलीस सुंदरि । संसृतिनौका ॥ ध्रु०॥ भार्या गत झालि न तोंवरी । तद्गुणशंका ॥ अंधा चंद्रिका न सुख वितरी । दिन जरी राका॥ परि ती गत होतां मनि करी। खेदचि अंका॥झालिस गुप्त कांहिं दिन भरी । वेडें करुनि मला गुणभरीं । आलिस सुखवाया मज परी । लावुनि चटका ॥१ ॥

तरंगिणी–पुन्हां ओबडधोबड चेहरा मिळाल्याबद्दल खंती वाटत असेल नाहीं ? पण मी म्हणतें,

(तुझी स्मृति मजला०–या चालीवर)

असुं बहु विजोड करुनि गोड घ्या बळें मला । पदरिं अपुल्या पडुनी पवित्र देह जाहला ॥ ध्रु० ॥ धवल चंद्र कृष्ण निशा । सेविति निःसीम अशा । सौख्यशांतिला॥१॥

विहार–प्रिये, कृपा करून असें हिणवूं नकोस. मला तुझा किती ध्यास लागला होता याला चकोरच साक्ष आहे.

तरंगिणी–तो मला वेळोवेळीं सगळें वर्तमान कळवीत आला आहे-

विहार–या त्याच्या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून त्याला चंद्रिका अर्पण करायची.

तरंगिणी–पण अहेर करितांना खणाला कंकू लावून नंतर अर्पण करितात.

विहार–प्रिये, तूं आपल्या हातानें तिला आज कुंकूं लावून व इतर सौभाग्यचिन्हें अंगावर घालून तयार ठेव. आपण आतां बरोबर मिळून बाबांच्या घरीं जाऊं. तेथें मनोहराचीहि गांठ पडेल. मी हीं घाणेरडीं वस्त्रें काढून आणि नेहमींचीं चढवून तयार होतों. (जातात.)

प्रवेश ५ वा.

(आनंदराव व हरिहरशास्त्री.)

हरिहर–हं! आतां येथें नीट उभे रहा. चित्त कावरें बावरें होऊन हातपाय कांपत असतील तर या खांबाला धरा. माझें अंग आज मोडून आलें आहे, म्हणून मीही एक खांब धरून ठेवितों. हें पहा त्यांचें संभाषण नीट ऐकूं येत आहे.

(नंतर पडदा वर जाऊन **मनोहर** व **सरस्वती** दिसतात.)

सरस्वती–महाराज, आतां आपण माझ्या पकडींतून कसे सुटणार? आतां माझी इच्छा आपण पूर्ण केलीच पाहिजे.

हरिहर–ऐकलेंत ना?

आनंदराव–दुर्दैव माझें!

मनोहर–सरस्वति, पुन्हां तुझ्या वेडानें उचल खाल्ली वाटतें? अग, तुला मीं काळजीनें शिकविल्याबद्दल नुकतीच आनंदरावांनीं आश्रमाला चांगली देणगी दिली आहे. आणि त्याच शिक्षणाचा असा परिणाम व्हावा ना!

सरस्वती–अजून सर्वांत मोठी देणगी आपल्या आश्रमाला मिळायचीच आहे.

मनोहर–ती कोणती?

सरस्वती–ही पहा ! (स्वत:कडे बोट दाखविते.) आपणांसमोर मूर्तिमंत उभी आहे ! आपला आश्रम चांगला चालायला पैसा पाहिजे, तशा विधवाही पाहिजेत. हें तत्त्व ओळखूनच माझ्या पतींनीं येवढ्या प्रौढपणीं माझ्यासारख्या मुलीशीं विवाह केला.

मनोहर–सरस्वति, मी तुला निक्षून सांगतों,

(भूप–त्रिवट)

विकल करिति तव बोल हृदय हें। सह्य गमे गरल याहुनि जें शीघ्र देह दाही ॥धु०॥ जननीसम तव अपार पाहीं उपकृति सदये हो परी। मम मति कृतिसि तव न या साही ॥ १॥

आनंदराव–(एकीकडे) शाबास, मनोहरपंत !

सरस्वती–पण आतां आपल्या इच्छेवर राहिलें आहे कुठे कांहीं ? आपण माझ्याशीं परवां जी प्रतिज्ञा केली तिच्यांत आपण सपशेल फसलां. आतां आपल्या मनांत नसलें तरी आपणांला माझा स्वीकार करावा लागेल.

मनोहर–सरस्वति,

(तोंतननन वाजवि०–या चालीवर)

तव वचन गहन हें भासे। आकलन करावें कैसें। मन चिंतित पारि आयासे। नच संशय सोसे। (चाल) प्रकट करुनि निज भावार्थ सहज करिं सदैव मज उपकृतिबद्धाचि निमिषें ॥ १ ॥

सरस्वती–असें वेड पांघरण्यांत काय अर्थ आहे ?

(चाल सदर)

किति अंत पहातां कांता। कां लपवितसां हो स्वांता। निष्कारण ही कातरता। कुणि निकट न असतां। (चाल) वचन दिलें जें पूर्ण करा तें मार्ग न यांतुनि सुटकेचा लव आतां ॥ १ ॥

बरें, आपलें वांकडें पाऊल पडलें असलें तर त्यांत आपणांकडे फारसा दोषही नाहीं. कारण बुद्धिवान् मनुष्याचें डोकेंच इतकें तरतरीत असतें कीं त्यावर प्रत्येक वस्तूचा ग्रह ताबडतोब उमटतो. मग स्त्रियांचें सौंदर्यच अपवाद कसें होईल? तेव्हां आपला भ्रंश झाला असल्यास त्यांत आपणांस वाईट वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

मनोहर–अजून माझ्या डोक्यांत कांहीं प्रकाश पडत नाहीं !

सरस्वती–त्या कल्याणीच्या विरहानें अंधार झाला आहे ! प्रकाश पडावा कसा ?

मनोहर–आतां माझ्या लक्ष्यांत आलें. सरस्वति, हा तुझा संशय निर्मूल आहे.

सरस्वती–हें नुसतें तोंडानें म्हणून नाहीं व्हावयाचें ! सिद्ध करून दिलें पाहिजे.

मनोहर–इतक्या सौकर्यानें आणि इतक्या चांगल्या रीतीनें सिद्ध करून देईन कीं तुझा संशय एका क्षणांत पार फिटून जाईल.

सरस्वती–असें कधीं व्हायचेंच नाहीं !

मनोहर–आणि झालें तर ?

सरस्वती–मग मींही कबूल केल्याप्रमाणें आपल्या पतीशीं मरेपर्यंत एकनिष्ठपणानें वागेन.

मनोहर–माझ्या गळ्याची शपथ वहा.

सरस्वती–आपल्याच गळ्याची शपथ. बाकी, ही शपथसुद्धां वहायला नको होती. कारण,

(तेरे घरमें दूसरी नार०–या चालीवर)

पदिं याच गुंतुनी जाइ सकलही प्रेम मम साचें॥धु०॥
निखिल भुवन लघु मानसिं गणिं मी तुल्य मृत्तिकेचे॥१॥
आपण गिरिपरि दृढ तरि माझ्या भय वारिता कैचें ॥२॥

मनोहर–सरस्वति, हें ऐकून मला मनापासून आनंद होत आहे. तुझें मजवरचें प्रेम जरी अयोग्य आणि निंद्य असलें तरी त्यानेंसुद्धां तुझें अंतःकरण निर्मल केलें.

(टुंक भुज कवन छुप०—या चालीवर)

हो मन शांत खरें प्रणयानें। क्षुब्ध जलधि जैसा स्नेहानें ॥ ध्रु०॥ इतरांविषयीं प्रेम तुझें निष्पाप खरें आहलें। मजवरिचेंही प्रेम तसें होइल अल्पचि काळें ॥ १ ॥

(**आनंदराव** व **हरिहरशास्त्री** समोर येतात.)

आनंदराव—शाबास ! मनोहरपंत, शाबास ! तुम्ही मित्रधर्माला चांगले जागलांत. अरे, सरस्वती मूर्छित होऊं लागली. (तिला सावरून) सरस्वति, तुला लाजण्याचें कांहीं कारण नाहीं. उलट मीच लाजलें पाहिजे. तूं जी माझ्या परोक्ष म्हणून माझी निंदा आणि निर्भर्त्सना केलीस तिला मी पात्रच आहें. या महात्म्याच्या सहवासानें सुबुद्ध आणि सुविचारी झालेल्या माझ्या पत्नीचा मी आनंदानें अंगीकार करीन. मात्र तो या क्षणीं न करितां माझा मित्र तुझी संशयनिवृत्ति करून आपल्या प्रतिज्ञेतून मोकळा झाला म्हणजे करीन.

सरस्वती—आपलें औदार्यच मला जन्मभर उपकारबद्ध करण्याला पुरेसें आहे.

मनोहर—हे शास्त्रीबुवा या ठिकाणीं येण्याचें कारण ? हें घर यांना वर्ज्य होतें ना ?

आनंदराव—या नीचानें तुम्हां उभयतांविषयीं मला खोटेंनाटें सांगून आपल्या म्हणण्याचा प्रत्यक्ष अनुभव आणून देण्यासाठीं येथें आणिलें.

मनोहर—माझ्या सत्वाची कोणी परीक्षा पाहूं लागलें कीं त्यांत मला राग नसून आनदंच आहे !

आनंदराव—बावनकशी सोन्याला अग्नीची भीति कुठून असणार?

हरिहर—यांच्या शिक्षणानें सरस्वतीबाईचें तर मन बिघडलें कीं नाहीं ? माझ्या सांगण्यापैकीं अर्धाभाग खरा ठरलाच कीं !

सरस्वती—मेल्या, माझ्या मनांत अयोग्य विचार यावयाला तूंच खरोखर कारण झालास. (आनंदरावास) हें पाहिलेंत का पत्र ? यावरून या कसाबाच्या करणीबद्दल आपली खात्री होईल.

आनंदराव—अरे मांगा! एकूण तूं मत्सरानेंच प्रेरित होऊन माझें मन कलुषित करण्याला प्रवृत्त झाला होतास? तुला कोणतीही शिक्षा केली तरी ती कमीच होणार आहे.

(**चकोर, चंद्रिका, विहार,** बुरखा घेतलेली **तरंगिणी, हंसिका,** वेणुबाई व एक सरकारी **शिपाई** प्रवेश करितात.)

चकोर—हं शिपाईबुवा, या नराधमाला पकडून तुम्ही आपल्या कामाला लागा. यानेंच तें अर्भक अनाथगृहांत पोहोंचवितों म्हणून तेथपर्यंत जाण्याचे श्रम न घेतां जिवें मारिलें. (शिपाई हारिहरशास्त्र्यास पकडतो.)

शिपाई—हं, अशी धडपड करूं नका. आपणाविरुद्ध पुरावा संगीन तयार आहे.

हरिहर—मी कायद्याच्या तावडींत जाणारा मनुष्य नाहीं. हें पहा. (खिशांतून एक कुपी काढून तिच्यांतील एक गोळी खातो.) या विषापुढें तुमचा काय इलाज चालणार आहे?

शिपाई—बरें, चलचल! ढोंगी कुठचा!

हरिहर—मी तर आतां मरतोंच. पण मरतांनासुद्धां मीं त्या रात्रीं मनोहराला मारून बेशुद्ध केल्यानें मला समाधान वाटेल! (शिपाई हरिहरशास्त्र्यास धक्के मारीत नेतो.)

आनंदराव—असें काय! यानेंच तर तुमच्या प्राणांवर संकट आणिलें होतें? पण याला आतां एकदम पकडण्याचें कारण काय?

चकोर—आपल्याच पातकाच्या जाळ्यांत आपण सांपडला झाले! दुसरें काय?

भेंकड—(प्रवेश करून) शास्त्रीबुवा रस्त्यांतच डोळे पांढरे करून पडले! त्यांना दोन तीन शिपाई उचलून चावडीवर नेत आहेत! त्यांचे डोळे इतके भेसूर दिसत होते कीं आज रात्रीं माझ्या स्वप्नांत मला तेच दिसणार!

मनोहर—जिवंत माणसें कशीं मरतात हा चमत्कार तुम्हीं ऐकलाच. आतां मेलेलीं माणसें जिवंत कशीं होतात हा चमत्कार तुम्हांला प्रत्यक्ष

दाखवितों. (तरंगिणीच्या चेहऱ्यावरचा बुरखा दूर करितो; तरंगिणी आनंदरावांच्या पायां पडते.)

आनंदराव–कोण ? तरंगिणी ?

चंद्रिका–(एकीकडे) माझा तिकडच्या वर्तनाबद्दलचा संशय एका निमिषांत निघून गेला !

सरस्वती–(एकीकडे) माझी सारी शंका कशी लागलीच फिटून गेली.

आनंदराव–हा काय चमत्कार आहे कळूं तरी द्या ! मनोहरपंत, तुम्हीं आपल्या पुण्यसामर्थ्यानें हिला जिवंत केलें असें जरी आम्हांला सांगितलेंत तरी आम्हीं तें खरें मानूं. कारण तुमच्याकडून प्रत्यहीं होणाऱ्या तपाला काय अशक्य आहे ?

मनोहर–माझ्या पुण्यबलानें नाहीं, तर चकोराच्या प्रेमबलानें हा घाट जुळवून आणिला. विहाराची प्रतिज्ञा आपण ऐकिली आहेच. तिचें सत्त्व पहाण्याकरितां चकोरानें तरंगिणी गत झाल्याबद्दल खोटेंच उठविलें आणि शेवटीं या असत्याचा जय झाला ! या सगळ्यांत माझें साह्य मौनापलीकडे फारसें नव्हतें.

आनंदराव–प्रेमांत आणि युद्धांत सर्व कांहीं क्षम्य असतें.

विहार–बाबा, माझें मत आतां पुनर्विवाह इष्ट आहे असें झालें आहे. हिनें आज अशीं कांहीं भक्कम प्रमाणें मजसमोर मांडिलीं कीं तीं कबूल करण्याशिवाय इलाजच राहिला नाहीं.

चकोर–(विहारास) असा प्रत्येकाच्या मतांत थोडा थोडा फरक झाला आहे. तुमचें मत पुनर्विवाहाला जसें अनुकूल झालें आहे तसें, चंद्रिकेचें मत पुरुषांच्या चित्तस्थैर्याबद्दल प्रतिकूल होतें तें अनुकूल झालें आहे. आमच्या ताईला मात्र याच्या अगदीं उलट अनुभव आला.

विहार–(चकोरास) अरे, तसा अनुभव आला म्हणून तर तुला चंद्रिका लाधणार. (आनंदरावांस) बाबा, आतां चकोराच्या आणि चंद्रिकेच्या लग्नाला अडथळा तो कोणता राहिला ?

आनंदराव–या सर्व प्रकाराचा इतरांप्रमाणें मजवरही परिणाम घडला असता तर कदाचित् या विवाहाला मजकडूनच अडथळा आला असता. पण यानें मजमध्यें पूर्वी नसलेलें मनोधैर्य उत्पन्न केलें आहे. आणि उद्यांच्याच मंगल मुहूर्तावर यांचा विवाह स्वत: लावण्याचा माझा संकल्प झाला आहे. सरस्वति, या वाग्निश्चयाची खूण म्हणून या दोघांचे हात एकमेकांच्या हतांत घालूं. (तसें करितात.)

हंसिका–ताई, त्या दिवशीं तूं मला लपूनसुद्धां कुंकूं लावून दे नव्हतीस; पण आतां सगळ्यांच्या देखत लावायला तयार झालीस ना ?

सरस्वती–बाळे चंद्रिके, मीं तुला फार वाईट वागविलें त्याबद्दलचा राग गेला का ?

चंद्रिका–आई, तुझें आतांचें वर्तन इतकें प्रेमळ आहे कीं पूर्वीच्य आठवणीचा त्याची किंमत वाढविण्यापलीकडे कांहींच परिणाम होणार नाहीं.

मनोहर–आनंदराव,गेल्या महिन्यांत घडलेले आणि आजच्या आनंदाच्या दिवसाला कारणीभूत झालेले प्रकार आपणांस केवळ निमित्त म्हणून बाहुल्याप्रमाणें पुढें करून ज्या सूत्रधारानें घडवून आणिले, त्याची आतां मनोभावानें स्वदेशाच्या कल्याणाकरितां प्रार्थना करूं.

सर्वजण–

(जयति जय सुरसरित्०–या चालीवर)

सुभगपण भरतभूप्रति वितरिं ईश्वरा॥धु०॥स्वातंत्र्य म्हणुनि शिरिं। सौभाग्य-तिलक धारिं। क्रूर कालें स्वकरिं। पुशियला तो पुरा॥१॥ स्फूर्ति मंगल जिचे । नृमणिमाला रचे। शून्यकंठा रुचे । तुजसी ती पामरा॥२॥भूतिकबरी विपुल । जाहली परि विरल। विखुरली अतिचपल। सांवरी ती जरा॥ ३ ॥

(पडदा पडतो.)